(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

मु.शी.: सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.दिलीप वळसे पाटील (वित्त मंत्री) : माननीय सभापती महोदय, सन 2009-2010 चा अंतरिम अर्थसंकल्प विधानसभेत मी आणि या सदनात माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी मांडला. त्या आधारावर काल दिवसभरामध्ये सकाळी सात वाजल्यापासून ते सायंकाळी सात वाजेपर्यंत अतिशय चांगली चर्चा झाली. या चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. अनेक उपयुक्त सूचना केल्या. अनेक प्रकारच्या शंका-कुशंका उपस्थित केल्या. जेथे कुठे चूक असेल ती दाखविण्याचा प्रयत्न केला. त्याद्वारे निश्चितपणे माझ्या सारख्या नव्याने वित्त विभागाचा कार्यभार स्वीकारणाऱ्याला एक वेगळ्या प्रकारचा अनुभव मिळणार आहे. सदर अर्थसंकल्प मांडत असताना दोन गोष्टींची पार्श्वभूमी होती. एक म्हणजे लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यामुळे आचार संहिता जाहीर झालेली आहे. त्यामुळे नवीन प्रकारच्या घोषणा करून मतदारांना खुष करणे किंवा त्याचा राजकीय फायदा होईल अशा प्रकारचे वर्तन न करणे या बाबीची काळजी घेतघेत हा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला आहे. पुढचे चार महिने शासन चालवायचे असेल तर त्यासाठी प्लॅन आणि नॉन प्लॅनमध्ये तरतूद करणे आवश्यक आहे. नॉन प्लॅन हा विशेष करून कर्मचाऱ्याचा पगार, वेतन, भत्ते आणि अन्य बाबींचा असतो. तर प्लॅन मध्ये ज्या ऑन गोईंग स्कीम्स असतात, त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. त्याप्रमाणे या अंतरिम अहवालामध्ये प्लॅन आणि नॉन प्लॅनसाठी निधी उपलब्ध करून देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मुळात मी माझ्या अर्थसंकल्पाच्या भाषणात स्पष्ट केले आहे की, अजून 9-10 योजनांसाठी केंद्र सरकार बरोबर चर्चा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

झालेली नाही. त्यामुळे योजनेचे आकारमान ठरलेले नाही. योजनेचे आकारमान ठरवल्याशिवाय आपल्याला पुढच्या वर्षासाठी कोणती कामे हातात घ्यायची, तरतूद कशी करायची याबाबत मर्यादा येते. तरी सुद्धा मंत्रिमंडळापुढे गेल्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळाने एक निर्णय घेतला. योजनेवर चर्चा होईल त्यावेळी होईल. गेल्या वर्षी 26 हजाराची योजना होती. तेवढीच योजना यावर्षी तयार करावी लागेल. त्या योजनेप्रमाणे आपण अंतरिम अर्थसंकल्प मांडताना तशा प्रकारची भूमिका आपण घेतली आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ..

हे सगळे करीत असतांना आणखी काही प्रश्न आपल्या सर्वांच्या समोर आहेत. एक तर जागतिक मंदीचे वातावरण सर्व देशात आणि जगात निर्माण झालेले आहे, रुपयांची घसरण झालेली आहे त्याचबरोबर डॉलरचा भाव वाढलेला आहे. डॉलरची किमत वाढल्यामुळे आणि रुपयांची घसरण झाल्यामुळे साहजिकपणे त्याचा काही परिणाम काही प्रमाणात आपल्याला जाणवत आहे. देशातील आणि परदेशातील अनेक बॅन्का अडचणीत आलेल्या आहेत. अमेरिकेसारख्या राष्ट्राने अनेक मल्टी नॅशनल कंपन्यांना आणि बॅन्कांना बेल आऊट करण्यासाठी पॅकेजेस दिली आहेत. शेअर मार्केटच्या बाबतीत जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय शेअर मार्केटमध्ये जी घसरण झालेली आहे त्यामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधी संभ्रमित अवस्था सर्वांच्या मनात निर्माण झालेली आहे. अमेरिका, युरोप आणि जपानसारखी बलशाली राष्ट्रेसुध्दा आर्थिक मंदीच्या फे-यात सापडली आहेत आणि या राष्ट्रांनासुध्दा कंपन्यांना, बॅन्कांना आणि अर्थव्यवस्थेला काही ना काही बेल आऊट पॅकेजेस द्यावी लागली आहेत. याच धर्तीवर राज्य सरकारकडून आणि केन्द्र सरकारकडून व्यापारी जगताच्या आणि उद्योग जगताच्या तसेच अन्य लोकांच्या काही अपेक्षा आहेत. परंतु राज्य सरकारांना असलेली मर्यादा लक्षात घेऊन केन्द्र सरकारने यामध्ये पुढाकार घेणे अभिप्रेत असते. डॉ. मनमोहन सिंग सरकारने या बाबतीत काही निर्णय घेतलेले आहेत. आर.बी.आय. ने सी.आर.आय. आणि एस.एल.आर.च्या रेटमध्ये कपात करुन अधिक वित्तीय पुरवठा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक राज्यांना आर्थिक शिस्त घालण्यासाठी एफ.आर.बी.एम. हा जो कायदा केलेला आहे त्यामध्ये काही रिलॅक्सेशन दिलेले आहे जेणेकरुन राज्याचे उत्पन्न जरी घटले असले तरी बाजारातून कर्ज रोखे किंवा निधी उभा करुन त्यातून राज्याचा कारभार चालवावा अशा प्रकारची अपेक्षा केन्द्र सरकारने केली होती. या सगळया पार्श्वभूमीवर पुढच्या चार महिन्याचा अर्थसंकल्प मांडावयाचा होता. सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या चर्चेला उत्तर देत असतांना मी अतिशय थोडक्यात 2008-2009 च्या योजनांचा आढावा या ठिकाणी घेतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ..

सभापती महोदय, 2008-2009 चा ज्यावेळी अर्थसकल्प मांडला होता त्यावेळी तत्कालीन वित्त मंत्र्यांनी महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडला होता. 79 हजार 910 कोटी रुपयांची जमा आणि 78 हजार 946 कोटी रुपयांचा महसुली खर्च त्यांनी त्यावेळी दाखविला होता. आता हे वर्ष सपत आलेले आहे आणि वर्ष संपता संपता ज्यावेळी रिव्हाईज एस्टिमेट तयार करतो त्यावेळी महसुली जमा 79 हजार कोटी रुपये धरलेली होती ती आता 82 हजार 689 कोटी रुपयापर्यंत गेलेली आहे आणि महसुली खर्च 78 हजार 946 कोटी रुपयांचा धरलेला होता तो 78 हजार 606 कोटी रुपयापर्यंत जाऊनही 4 हजार 263 कोटी रुपयांचे महसुली अधिक्य त्यामध्ये दिसत आहे. अशा प्रकारे 4 हजार 263 कोटी रुपयांचा महसुली अधिक्य असला तरी 3 हजार 432 कोटी रुपये पाटबंधारे विभागाला गॅरन्टी पोटी दिले होते त्याचे समायोजन करण्यात आल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून महसुली अधिक्य 830 कोटी रुपया पर्यंत सीमित राहील . बाकीच्या ज्या बुक एन्ट्रीज होत्या त्या बुक एन्ट्रीज राहतील. याचा अर्थ असा की, देशात आर्थिक मंदी असतांना सुध्दा या राज्याच्या विकासाच्या कामासाठी जो महसुली खर्च लागणार आहे तो खर्च भागविण्यासाठी आपली तोंड मिळवणी झालेली असली तरी भांडवली खर्च करीत असतांना केन्द्र सरकारकडून किंवा अन्य माध्यमातून काही निधी आपल्याला उभा करता आला.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

आणि म्हणून अनेक माननीय सदस्यांना प्रश्न पडला की, चार महिन्यांकरिता अंतरिम अर्थसंकल्प सादर करीत असतांना त्यामध्ये संपूर्ण वर्षभराचे आकडे कसे दाखविले गेले? 26 हजार कोटींचा हा अर्थसंकल्प सादर करीत असतांना गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक विभागासाठी जी तरतूद करण्यात आली होती तिच्या एक तृतियांश रक्कम प्रत्येक विभागासमोर दाखविली आहे. याचा अर्थ त्या विभागाची रक्कम आपण कमी केली किंवा जास्त केली असा नाही. पावसाळी अधिवेशनामध्ये आपण संपूर्ण अर्थसंकल्प मांडू त्यावेळी त्या त्या विभागाशी चर्चा करुन, नियोजन आयोगाबरोबर चर्चा करुन उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या आधारावर त्या विभागाला किती पैसे द्यावयाचे, कोणत्या विभागाला प्राधान्य द्यावयाचे, राज्याच्या हिताच्या दृष्टीने कोणत्या प्रॉयॉरिटीज आहेत हे ठरविणार आहोत. आणि म्हणून या परिस्थितीमध्ये मागितलेली एक तृतियांश रक्कम ही दोन तृतियांश रक्कमेव्यतिरिक्त असेल ती सर्व रक्कम नियोजन विभागाच्या अगेन्स्ट ठोक तरतूद म्हणून याठिकाणी दाखविली आहे. आणि म्हणून याठिकाणी रेव्हेन्यू असेल किंवा कॅपिटल असेल ती सर्व रक्कम अर्थसंकल्पामध्ये दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे याठिकाणी आकडयांची जग्लरी केली अशाप्रकारची शंका माननीय सदस्यांच्या मनामध्ये निर्माण झाली, ती निर्माण होण्याचे कारण नाही. काल-परवा या सभागृहामध्ये जवळपास 4 हजार 444 कोटींच्या पुरवणी मागण्या नव्याने मांडण्यात आल्या. बऱ्याच वेळा माननीय सदस्यांचा आक्षेप असतो की, आपण सभागृहामध्ये एकाच वेळी अर्थसंकल्प सादर करीत असतांना वारंवार पुरवणी मागण्या कशासाठी मांडता? सभापती महोदय, दोन अधिवेशने किंवा दोन अर्थसंकल्पाच्या मधल्या कालावधीत नवीन गोष्टी राज्य सरकारसमोर येतात, सभागृहामध्ये किंवा सभागृहाबाहेर मागण्या करण्यात येतात त्यावेळी त्यासाठी काही तरतूद करावी लागते. ती तरतूद मग आकस्मिकता निधी किंवा पुरवणी मागणीच्या माध्यमातून करावी लागते. त्यासाठी सभागृहाला ती बाब दाखविण्याची आवश्यकता असते. त्याकरिता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून आपल्याला सभागृहासमोर यावे लागते.

सभापती महोदय, केंद्र सरकारने केलेल्या कर्जमाफीच्या संदर्भात आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या संदर्भात माननीय सदस्यांनी सातत्याने या सभागृहात विषय उपस्थित केला. या आत्महत्त्या कां होतात? याच्या मुळाशी जाण्याची आवश्यकता होती. एका बाजूला पश्चिम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

श्री. दिलीप वळसे पाटील...

महाराष्ट्राची विदर्भ आणि मराठवाडयाशी आपण तुलना करतो. आज पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी संस्था, सहकारी बँका पाहिल्या आणि विदर्भ मराठवाडयातील वित्तीय संस्था पाहिल्या तर त्यामध्ये फार मोठा फरक आहे. सभापती महोदय, ज्यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये मी आणि माननीय नामदार श्री. अजितदादा पवार साहेब आम्ही दोघे पहिल्यांदा निवडून गेलो त्यावेळी त्या बँकेमध्ये 450 कोटींच्या ठेवी होत्या. आज त्या ठेवी साडे चार हजार कोटींच्या आसपास गेल्या आहेत. पुणे जिल्हयात कोणत्याही प्रकारचे कर्ज वाटप करण्यामध्ये अडचण येत नाही. विदर्भातील बँका पाहिल्या, मराठवाडयातील बँका पाहिल्या तर त्या अन्य काही कारणांमुळे व्यवस्थितपणे न चालल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून कास्तकारांना किंवा शेतकऱ्यांना सावकाराकडे जावे लागते. आणि त्यांच्याकडून 24 ते 36 टक्के याप्रमाणे वाटेल त्या व्याज दराने त्यांना कर्ज घ्यावे लागते. जर त्याची नापिकी झाली तर त्याला दुसरे कर्ज मिळत नाही. त्यामुळे त्याची शेती पडीक रहाते. त्यामुळे त्याच्या मनामध्ये वाईट विचार येतात. त्याच्याजवळ आत्महत्त्येशिवाय दुसरा पर्याय नसतो. आणि म्हणून याचा केंद्र सरकारने विचार केला. आत्महत्त्येचा विषय हा गेल्या पाच वर्षात उपस्थित झालेला नाही. गेल्या अनेक वर्षापासून या राज्यामध्ये आणि देशामध्ये असलेला विषय आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली. त्यामुळे या राज्यातील शेतकऱ्यांना त्यांची जी थकित देणी आहेत, ती बाजूला करुन त्याला पुन्हा एकदा नवीन कर्ज कसे मिळेल ही भूमिका केंद्र सरकारची होती. त्यामध्ये आपण आपापल्या परीने 7/12 कोरा करणे, किंवा कर्जमाफी करणे असा अर्थ काढला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

जेव्हा केंद्र शासनामध्ये निर्णय घेतला जातो, तेव्हा पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ किंवा मराठवाडा अशा एखाद्या विभागाचा विचार करुन निर्णय घेतला जात नाही, तर देश पातळीवर विचार करुन निर्णय घेतला जातो. देशातील 80 टक्के शेतकरी हे पाच एकराच्या आतील आहेत आणि त्यांना मदत करण्यासाठी केंद्र शासनाने स्वातंत्र्यानंतर पहिल्यादाच 71 हजार कोटीची कर्जमाफीची योजना राबविली आहे आणि त्या योजनेचा फायदा राज्यातील 38 लाख शेतकऱ्यांना झाल्यानंतर उर्वरित शेतकरी या फायद्यापासून वंचित राहीले, म्हणजेच जे थकबाकीदार होते त्यांना याचा फायदा झाला. ज्या शेतकऱ्यांनी वेळेवर पैसे भरले आहेत, त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, यामध्ये आमची काय चूक आहे ? आम्हाला याचा फायदा का होणार नाही ? याबाबतीत केंद्र शासनाने जो निर्णय घेतलेला आहे आणि त्याचाच एक भाग म्हणून ज्यांनी वेळेवर पैसे भरले किंवा जे केंद्र शासनाच्या योजनेमध्ये सहभागी होऊ शकले नाहीत अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये 6200 कोटी रुपयांच्या कर्जमाफीची योजना जाहीर केली. त्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत, त्याच्या अटी-शर्तीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये काही भूमिका असतील.आपण परवा सदनासमोर पुरवणी मागण्या सादर केल्या.त्यामध्ये शेतकऱ्यांना पैसे परत करण्यासाठी 1718 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. ई.जी.एस.साठी 357 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे.नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये धानाला पैसे दिले पाहिजेत, याला पैसे दिले पाहिजेत, त्याला पैसे दिले पाहिजेत इ.गोष्टीसाठी मागण्या करण्यात आल्या. त्यासाठी राज्य शासनाने 288 कोटी रुपयांची तरतूद केली. विजेसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केली अशा प्रकारे वेगवेगळया स्वरुपाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय,या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सदनामध्ये काल चर्चेला सुरुवात झाली असून आजही त्यावर पुढे चर्चा होईल. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद करण्यात आलेली आहे आणि हा निश्चितपणे वाढलेला अतिरिक्त खर्च आहे. 2008 आणि 2009 मधील योजनांची तुलना केली तर 2008-2009 मधील योजना 26 हजार कोटी रुपयांची होती आणि 2009-2010 मधील योजना देखील 26 हजार कोटी रुपयांची ठरविण्यात आलेली असून, याबाबतीत योजना आयोगाशी चर्चा झाल्यानंतर त्यामध्ये काही बदल होऊ शकतो. पण हे सर्व करीत असताना आम्ही

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

अर्थसंकल्पामध्येही तरतूद केलेली आहे.या सदनाने एका गोष्टीची नोंद घेतलेली आहे.अनेक वर्षे,अनेक वेळा एखाद्या गावातील प्रमुख आरोग्य केंद्राची इमारत असेल, अंगणवाडीची इमारत असेल, शाळेची इमारत बांधण्याची कामे करावयाची असतील, ही कामे जिल्हा परिषदेच्यावतीने करावयाची असतात.गेल्या वर्षीपर्यंत डी.पी.डी.सी.अंतर्गत 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत होती.परंतु त्यानंतर माजी वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांनी निर्णय घेऊन डी.पी.डी.सी.अंतर्गत ही तरतूद 2 हजार कोटी रुपयांची करण्याचे ठरविले.आता या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ही तरतूद अडीच हजार कोटी रुपयांची करण्याचे ठरविलेले आहे.तसेच यापुढे डी.पी.डी.सी.ला दिलेल्या निधीच्या संदर्भातील कोणतीही फाईल मंत्रालयामध्ये येण्याची गरज नाही, मग तो कोणताही विभाग असू दे.त्याबाबतीतील प्रशासकीय अधिकार जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. जर महानगरपालिचे काम असेल तर त्यासंबंधातील अधिकार महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिलेले आहेत.याचे कारण असे की, जिल्ह्यातील लहान-लहान विकास कामांसाठी खर्च झाला पाहिजे आणि तो निधी वेळेमध्ये उपलब्ध झाला पाहिजे.लोकांच्या गरजा भागविल्या गेल्या पाहिजेत. एका बाजूला ह्युमन डेव्हलपमेंट इन्डेक्स् पास करतो आणि आणि दुसऱ्या बाजूला जिल्ह्यामध्ये लहान-लहान कामे होत नाहीत. मध्यंतरी डी.पी.डी.सी.च्या निवडणुका झाल्या, त्यांना अधिकार दिले. त्यानंतर निधी वाढवून देण्यात आला.त्यानंतर छोटे-छोटे पाझर तलाव असतील, छोटे रस्ते असतील, उपकेंद्राची कामे असतील, शाळेच्या खोल्या बांधण्याचे काम असेल तर या कामांनाच प्राधान्य देण्याच्या बाबतीत नियोजन मंत्री म्हणून मी सर्व जिल्ह्यातील नियोजन विभागाचे अधिकारी, कलेक्टर, तेथील माननीय पालक मंत्री यांच्याबरोबर एक बैठक घेतली आणि त्यावेळी याबाबतीत सर्व सूचना देण्यात आलेल्या आहेत.आज जरी अर्थसंकल्पामध्ये बाकीच्यासाठी 1/3 तरतूद केलेली असली तरी डी.पी.डी.सी. साठी पूर्णपणे 100 टक्के तरतूद केलेली आहे.सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे की, तुम्ही दोन-तीन वर्षाचे प्लॅनिंग तयार करावे. तुम्हाला हा निधी नक्की मिळणार आहे. जेणेकरुन छोटी-छोटी कामे मार्गस्थ होतील.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

यानंतर कु. थोरात....

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

आज अर्थसंकल्पात तरतूद न केलेला 15393 कोटी रुपयाचा निधी नियोजन विभागाच्या अगेन्स्ट दाखविण्यात आलेला आहे. राज्याचे नॉन प्लॅनचे 83670 कोटी रुपये आणि प्लॅनचे 27000 कोटीच्या आसपास बजेट आहे ते बजेट सभागृहासमोर मांडलेले आहे. या अर्थसकल्पात राज्याची महसुली तूट 8462 कोटी रुपये दाखविण्यात आलेली आहे. वर्तमानपत्रांना आणि आपल्या सगळयांना सुध्दा असे वाटायला लागले की, हे राज्य कर्जबाजारीपणाच्या दिशेने चालले आहे की काय? जरुर अडचणी आहेत. आपल्या राज्याच्या महसुलामध्ये कमी झालेली आहे ही गोष्ट मान्य आहे. पण मुळातच अर्थसंकल्प तयार करण्याची पध्दत अशी आहे की, राज्याचे उत्पन्न आणि राज्याचा खर्च यामधून शिल्लक राहणारा जो फरक आहे त्यामध्ये केंद्र सरकारकडून मिळणारी पॅकेजेस, केंद्र सरकारकडून मिळणा-या परमिशन्स, केंद्राचा त्याच्यामध्ये असलेला वाटा आणि उपलब्ध कर्ज याच्या माध्यमातून सुध्दा आपण एक प्रकारचा निधी उपलब्ध करीत असतो आणि त्यामधून बाकीच्या सगळया गोष्टी पुढे जात असतात. 8462 कोटी रुपयाची महसुली तूट ही या राज्यासमोरची चिंता असली तरी राज्याचे उत्पन्न कसे वाढवावयाचे. एका बाजूला डॉलरचा दर वाढल्यानंतर दुस-या बाजूला रुपयाचा दर कमी झाला त्यावेळेला त्याचा अल्टिमेट परिणाम म्हणून या देशातला एक्स्पोर्ट परदेशात वाढू शकतो आणि त्यामधून आपल्याला काही फायदा होऊ शकतो. अर्थात बाजारपेठेवर किंवा आंतरराष्ट्रीय मार्केटवर होणारे जे परिणाम आहेत त्या परिणामांच्या माध्यमातून कसे पुढे जावयाचे याचा विचार करणे गरजेचे आहे.

जिल्हयाची योजना 2406 कोटी रुपयाची आणि राज्याची योजना 8199 कोटी रुपयाची केलेली आहे. नियोजन विभागाच्या अगेन्स्ट जे 15393 कोटी रुपये दाखविण्यात आलेले आहेत. त्याच्या संदर्भात जी नवीन कामे या राज्यामध्ये या वर्षामध्ये घ्यावयाची आहेत त्यासाठी उद्याच्या जून महिन्यातील अधिवेशनात निश्चित प्रकारे ज्या तरतुदी करावयाच्या आहेत त्या तरतुदी जरुर करण्यात येतील. केंद्र सरकार आपल्याला एक लिमिट ठरवून देते की, प्रत्येक राज्याने त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या साधारणत: तीन टक्क्यापेक्षा जास्त कर्ज काढू नये. आपले राज्य अजूनही तीन टक्क्याच्या आतमध्ये आहे. देशातील सगळी आर्थिक परिस्थिती पाहिल्यानंतर केंद्र सरकारने कालपरवाच एक निर्णय घेतला आणि तीन टक्क्यावरुन साडे तीन टक्क्यावर जाण्याच्या संदर्भातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

भूमिका घेतली. राज्याच्या सकल उत्पन्नाच्या तीन टक्क्यापर्यंत कर्ज काढण्याची मर्यादा राज्यावर आहे. आज आपले राज्य 3.16 टक्क्यापर्यंत आहे आणि केंद्र सरकारने 3.50 टक्क्यापर्यंत ही मर्यादा वाढविलेली असल्यामुळे विकासाच्या कामासाठी निधी उभा करण्यासाठी आपल्याला कुठल्याही प्रकारची अडचण येईल असे आपण मानण्याचे काही कारण नाही. सभागृहात अनेक गोष्टीच्या संदर्भात आपण चर्चा करतो. कर्ज माफीच्या संदर्भात आपले समाधान नाही. 6000 कोटी रुपये खर्च केल्यानंतर सुध्दा आज कर्जमाफीच्या संदर्भात सगळयांचे समाधान नाही. आज 6 वा वेतन आयोग लागू केल्यानंतर एवढे हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर सुध्दा आज सरकारी कर्मचाऱ्यांच्या किंवा बाकीच्या कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये समाधान नाही. दुस-या बाजूला आपण सगळे जण मग कांद्याचे पीक अडचणीत आले तर कांद्याला मदत करा. कापसाचे पीक अडचणीत आले तर कापसाला मदत करा, दुधाला अडचण आली तर दुधाला मदत करा. उभ्या ऊसाला अनुदान द्या. अमुक करा. तमुक करा. वेगवेगळया प्रकारच्या सबसिडी द्या, अशा मागण्या करीत असता. मग शेती मालाला असलेल्या सबसिडी असू देत, शिक्षणासाठी असलेल्या सवलती असू देत किंवा बाकीच्या गोष्टीसाठी असलेल्या सवलती असू देत, या कामामध्ये मोठया प्रमाणात पैसा खर्च केल्यामुळे आज विकासाच्या कामावर त्याचा परिणाम होतो आणि विकासाच्या कामाला तेवढा निधी उपलब्ध होत नाही. आणि मग इरिगेशनचे प्रकल्प पाठीमागे राहिले, रस्त्याचे प्रकल्प पाठीमागे राहिले, बाकीच्या गोष्टी पाठीमागे राहिल्या अशा प्रकारची चर्चा या सभागृहामध्ये करतो. एकदा आपण सगळयाच पक्षांनी एकत्रित बसून पायाभूत सुविधांना जास्त प्राधान्य द्यायचे की सबसिडीच्या क्वान्टमला जास्त प्राधान्य द्यायचे, याचा विचार करण्याची वेळ निश्चितपणे आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

राज्यामध्ये वीज कमी आहे ही गोष्ट खरी आहे. दरवेळेला आपण गुजरात आणि महाराष्ट्राची तुलना करतो. आज महाराष्ट्रामध्ये 21 टक्के विजेचा तुटवडा असेल तर...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांचे निवेदन व्यवस्थित चालू आहे त्याबद्दल शंका नाही. आता माननीय मंत्रिमहोदय असे म्हणाले की, आम्ही अमुक मागतो, तमुक मागतो, द्राक्षासाठी मागतो, कांद्यासाठी मागतो आणि शेतकऱ्यांना आम्हाला एवढे द्यावे लागले त्यामुळे विकासाची गती थांबते, विकासासाठी पैसे मिळत नाहीत. असे सांगणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. ते वक्तव्य त्यांनी मागे घ्यावे. सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे विकास होत नसेल तर ते म्हणणे एकवेळ ठीक आहे परंतु आपण शेतकऱ्यांच्या अडीअडचणीमध्ये धावून आलो अशी जाहिरात करतो आणि या ठिकाणी मात्र त्यामुळे राज्याचा विकास थांबलेला आहे अशी व्यथा मंत्रिमहोदय मांडत असतील तर ती बाब शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे, हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यामध्ये शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा मुळीच प्रश्न नाही. जेव्हा जेव्हा शेतकरी अडचणीत आले तेव्हा तेव्हा शासनाने मदत केली आहे. मग अतिवृष्टी झाली तरी सरकारने शेतकऱ्यांना मदत केली. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली तरी शेतकऱ्यांना मदत केली. एखादे पीक अडचणीत आले तरी सरकारने शेतकऱ्यांना मदत केली.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात गेल्या पाच वर्षात शासनाने शेतकऱ्यांना किती फायदा दिला की, ज्यामुळे विकास थांबला याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, काल सकाळी 11.00 वाजल्यापासून सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत मी या सभागृहात बसलो होतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक तास भाषण केले. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुध्दा काल भाषण केले. साधारणपणे आपली अशी पध्दत असते की, चर्चेला मंत्री उत्तर देत असताना आपण त्यांना थांबवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

सन्माननीय सदस्यांच्या काही शंका असतील तर उत्तराच्या शेवटी त्यांनी विचाराव्यात. मी आपल्या प्रश्नांची उत्तरे देईन.

श्री. दिवाकर रावते : मी फक्त आपल्या निदर्शनास आणून दिले.

श्री. दिलीप वळसे-पाटील : मी व्यथितपणाने हे अजिबात मांडत नाही. मी मोकळेपणाने परिस्थिती सदनासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण औद्योगिक घटकांना मदत करतो, कर्मचाऱ्यांना मदत करतो, कर्ज माफ करतो, पीक अडचणीत आले तर त्यासंदर्भात मदत करतो. अतिवृष्टी झाली तर त्यासंदर्भात मदत करतो. एका बाजूला मदत केली तर त्याचा परिणाम दुसऱ्या बाजूला होणार आहे. आज राज्यामध्ये जरी विजेची टंचाई असली, आपण गुजरात आणि महाराष्ट्राची तुलना करीत असलो तरी महाराष्ट्र राज्यामध्ये 21 टक्के विजेची टंचाई असेल तर गुजरातमध्ये 18 टक्के विजेची टंचाई आहे. तरी सुध्दा गुजरात राज्य आज ज्या पध्दतीने पुढे जात आहे त्याच पध्दतीने उद्योगाच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य पाठीमागे राहिलेले नाही. महाराष्ट्र राज्य सुध्दा त्याच पध्दतीने पुढे जात आहे. थेट परदेशी गुंतवणूक किंवा मेगा प्रोजेक्टच्या माध्यमातून राज्यामध्ये एका बाजूला येणारी गुंतवणूक आणि दुसऱ्या बाजूला त्यामधून होणारी रोजगाराची निर्मिती या सगळ्या गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. मी पाच वर्षाचा आराखडा मांडला. ते आपल्याला थोडेसे चुकीचे वाटेल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले की, गेल्या चार वर्षात किती मदत केली ? त्याबाबतची आकडेवारी मी सभागृहासमोर ठेवणार आहे. गेल्या चार वर्षात राज्यामध्ये उद्योगाला 1696 कोटी रुपयांचे प्रोत्साहनात्मक अनुदान राज्याने दिले. कारण या राज्यामध्ये प्रोजेक्ट्स आले पाहिजेत. दुसऱ्या राज्यामध्ये 1 नॅनोचा प्रोजेक्ट गेला. मुळात नॅनोचा प्रोजेक्ट महाराष्ट्र राज्यात कधीच येणार नव्हता. तो प्रोजेक्ट कलकत्त्यामध्ये जाणार होता. तो प्रोजेक्ट नंतर गुजरातमध्ये गेला. त्याची चर्चा झाली. परंतु गेल्या दोन तीन वर्षात पिंपरी चिंचवड परिसरात ऑटोमोबाईलच्या सगळ्या कंपन्या आल्या परंतु त्याबाबत शासनाला शाबासकी देण्याचा प्रयत्न आपण केला नाही. राज्यामध्ये एवढी अडचणीची परिस्थिती असताना या राज्यामध्ये उद्योग येऊन गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

शासनाने अल्पसंख्यांक विभागासाठी तरतूद केलेली आहे. रस्ते विकासासाठी राज्यामध्ये कामे हाती घेतलेली आहेत. आपदगस्तांना केलेली मदत, ग्रामविकास क्षेत्रासाठी केलेली मदत, सिंचनाच्या क्षेत्रासाठी केलेली मदत, आदिवासी विकासासाठी केलेली मदत, महिला आणि मागासवर्गीयांच्या विकासासाठी केलेली मदत या सर्व गोष्टी आहेत. या समाजाच्या लोकसंख्येइतके कमिटेड बजेट त्या विभागाच्या मंत्र्यांच्या हातामध्ये देणारे महाराष्ट्र हे कदाचित देशातील एकमेव राज्य असेल. माननीय श्री. शरद पवार हे पुलोदचे मुख्यमंत्री असताना या राज्यामध्ये निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

आजपर्यन्त बाकीच्या सगळया विभागाच्या मंत्र्यांना नियोजन आणि वित्त मंत्र्यांपर्यन्त यावे लागत होते. परंतु आदिवासी विकास मंत्र्यांना किंवा या राज्याच्या समाजकल्याण मंत्र्यांना नियत व्यय दिल्या नंतर तो खर्च करण्याच्या संदर्भात निश्चित अशी भूमिका घेतलेली आहे. ती तरतूद त्या विभागाच्या अधिनस्थ केली जाते. शहराच्या विकासाकडे या सरकारने दुर्लक्ष केले असे काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. खरे म्हणजे या सभागृहापेक्षा खालच्या सभागृहामध्ये अशी भूमिका मांडली गेली की, या बजेटमध्ये मुंबईसाठी काही नाही. मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे असे आपण म्हणतो. मुंबईच्या सुरक्षेसाठी आणि महाराष्ट्राला लाभलेल्या 720 कि.मी.च्या सागरी किना-याच्या सुरक्षेसाठी गृह विभागाने जेवढी तरतूद मागितलेली आहे तेवढी ती नियोजन विभागाने उपलब्ध करुन दिलेली आहे. पुढील वर्षी गृह विभाग मुंबई आणि महाराष्ट्राच्या सुरक्षेसाठी जेवढी तरतूद मागील तेवढी ती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल. आज मुंबईमध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातून विकास कामे होत आहेत. मुंबई महानगरपालिकेला मिळणा-या अनुदानातून मुंबईमध्ये विकास कामे होत आहेत. एमएमआरडीअेच्या माध्यमातून 2 हजार कोटी रु. विकास कामावर खर्च केलेले आहेत. एमयूटीपीच्या माध्यमातून 700 कोटी रुपये आणि एमयूआयपीच्या माध्यमातून 300 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. मोनोरेलसाठी 1 हजार कोटी रुपये आणि मेट्रो रेलसाठी 650 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये या शहरासाठी केन्द्र सरकारने व्हायबिलिटी फंडिंग गॅप 400 कोटी रुपये दिलेले आहेत. दरवर्षी जसजशी कामे होत जातील त्याप्रमाणे निधी देण्याचे केन्द्र सरकारने कबूल केलेले आहे. या मुंबई शहरामध्ये जलप्रलय झाला. त्या पार्श्वभूमीवर मुंबईमध्ये ब्रिमस्टोवॅड प्रकल्प घेण्यात आला. त्यासाठी 200 कोटी रुपये खर्चाचा प्लॅन केला गेला. यामध्ये शंभर टक्के रक्कम केन्द्र सरकार खर्च करणार आहे. सन 2007-08मध्ये 400 कोटी, 2008-09मध्ये 100 कोटी 2009-10मध्ये 400 कोटी आणि 2010-11मध्ये 300 कोटी याप्रमाणे 1200 कोटी रुपये खर्च करुन ड्रेनेजची व्यवस्था करण्याच्या संदर्भात भूमिका घेतलेली आहे. आमचे लर्नेड मित्र श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, मुंबईसाठी काहीही पैसे दिले नाहीत. सभापती महोदय, डीपीडीसीची तरतूद एका बाजूला राज्य सरकारची तरतूद एका बाजूला, महानगरपालिकेची तरतूद एका बाजूला, म्हाडाची तरतूद एका

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील.....)

बाजूला आणि खाजगी क्षेत्रातून घेतलेली कामे आपण पाहिली तर निश्चित प्रकारे मुंबईचे शांघाय करण्याचे स्वप्न आपण पाहिलेले असले तरी सुध्दा सर्वसामान्य माणसाला सन्मानाने रहाता येईल अशा प्रकारची स्थिती निर्माण करण्याच्या कामी या लोकशाही आघाडीच्या सरकारने या 5 वर्षाच्या काळामध्ये नियोजन केलेले असून त्याचा निश्चितपणे फायदा सर्वसामान्य माणसाला होत आहे.सभापती महोदय आपणाला केवळ पुणे किंवा मुंबईकडेच बघून चालणार नाही. ज्याप्रमाणे मुंबईला मदत करण्याची आपण भूमिका घेतलेली आहे त्याप्रमाणे अन्य नगरपालिकांनादेखील वैशिष्टयपूर्ण अनुदान देऊन त्यांच्याही विकासासाठी काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : मुंबईसाठी केन्द्राचे पैसे आलेले आहेत....

श्री. दिलीप वळसे-पाटील : केन्द्रामध्ये श्री. वाजपेयीसाहेबांचेही सरकार होते....

श्री. मधुकर चव्हाण : एकेक मुद्दा दोन-दोन मिनिटामध्ये संपवू नका. एकेका मुद्याची आम्हाला चिरफाड करता येऊ शकते...

....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : या सदनात काल सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे एक तास बोलले त्यावेळी पाणी पिण्यासाठी सुध्दा मी सभागृहाच्या बाहेर गेलो नाही. या सभागृहात मी काल 11.00 वाजेपासून सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत बसून होतो. लर्नेड फ्रेंड म्हटल्यानंतर असे मध्येच उठून प्रश्न विचारावयाचे नसतात.

सभापती महोदय, मुंबईच्या पाणी प्रश्नाच्या बाबतीत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला गेला. जेएनएमयूआरएम अंतर्गत मुंबई महानगरपालिकेला केंद्र सरकारने आजपर्यंत जे अनुदान दिले आहे. त्यात मध्य वैतरणा प्रकल्पासाठी 169 कोटी रुपये, मलबार हिल स्टेशनसाठी 12 कोटी रुपये, मरोशी टनेलसाठी 36 कोटी रुपये, मलनि:स्सारण प्रकल्पासाठी 45 कोटी रुपये, घनकचरा व्यवस्थापनासाठी 22 कोटी रुपये असे एकूण 284 कोटी रुपये अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. मुंबई शहरावर अन्याय झाला असे कोणाला म्हणता येणार नाही. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत चालली आहे. तालुक्यांच्या ठिकाणी सुध्दा लोकसंख्या वाढत चालली आहे. पुणे जिल्हयातील चाकण, शिरुर या परिसरात मोठया प्रमाणात उद्योग उभारले जात आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढत चालली आहे, ग्रामपंचायती क्षेत्रामध्ये देखील लोकसंख्या वाढत चालली आहे. महानगरपालिका, नगरपालिका, तालुका तसेच ग्रामपंचायती क्षेत्रात लोकसंख्या वाढत चालली असल्यामुळे नागरीकरणात देखील मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढत असलेल्या नागरीकरणास मदत करण्याची भूमिका शासनाकडून घेतली जात आहे. पुणे महानगरपालिकेमध्येसुध्दा 14 प्रकल्पांच्या माध्यमातून 2440 कोटी रुपयांची कामे आज सुरु आहेत. 3 प्रकल्पाची 261 कोटी रुपयांची कामे पुणे जिल्हयाचे पालक मंत्री माननीय श्री.अजितदादा पवार यांनी केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविली आहेत. अहमदनगर शहराचा देखील असाच आराखडा तयार केला आहे. नागपूर शहराचा देखील असाच आराखडा तयार केलेला आहे. अमरावती, औरंगाबाद शहरांचा देखील असाच आराखडा तयार केलेला आहे. महाराष्ट्रातून मोठया प्रमाणात महसूल जमा होतो. या मुंबई शहरातून मोठया प्रमाणात कर केंद्र शासनाकडे पाठविला जातो. परंतु केंद्र सरकारकडून महाराष्ट्र शासनाला काहीही तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत नाही. केंद्र सरकार या राज्यासाठी अर्थसंकल्पात काही तरतूद उपलब्ध करुन देत नसले तरी केंद्र सरकार वेगवेगळया प्रकल्पाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देत असते. वेगवेगळया केंद्र शासनाच्या योजनांसाठी मोठया प्रमाणात निधी आणण्याचे काम गेल्या पाच वर्षात आघाडी सरकारने केलेले आहे. शहरी आणि

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

ग्रामीण भागांचा पायाभूत विकास करण्याचे सूत्र या राज्य सरकारने स्वीकारलेले आहे. एक गोष्ट खरी आहे की, जागतिक मंदीचे वातावरण निर्माण झाल्यानंतर राज्याच्या उत्पन्नामध्ये घट झालेली आहे. आज मुद्रांक शुल्काचे उत्पन्न गेल्या वर्षापेक्षा 2736 कोटी रुपयांनी कमी झालेले आहे. मुंबई शहरात एका वेळेला असे वातावरण निर्माण झाले होते की, बिल्डर्स मुंबई शहरात मोठया प्रमाणात इमारतींची बांधकामे करीत आहेत. सगळया महाराष्ट्रात इमारती बांधण्याची कामे सुरु होती. आता जमिनी विकण्यासाठी अनेक जमीन मालक तयार आहेत, परंतु ती जमीन खरेदी करण्यासाठी खरेदीदार मार्केटमध्ये उपलब्ध नाहीत. घेतलेली प्रॉपर्टी पुन्हा विकावयाची म्हटली तर ती प्रॉपर्टी विकली जात नाही अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. जागतिक मंदीचा परिणाम काही दिवस आपल्याला सहन करावा लागणार आहे. पूर्वी बँकांची माणसे घरी येऊन वाहने देऊन जात होती. वाहनावरील करासाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी माणसे दोन-दोन वाहने विकत घेत होती, ती माणसे आता एक वाहन तरी खरेदी करावे की नाही यासंबंधीचा विचार करु लागले आहेत. विक्रीकरामध्ये सुध्दा जवळपास 600 कोटी रुपयांच्या आसपास घट झालेली आहे. ही घट जरी झाली असली तरी मी मुद्दाम मी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 2005-06 मध्ये 9.59 टक्के कररुपाने उत्पन्न वाढले होते. 2006-07 मध्ये 19.56 टक्के एवढे उत्पन्न वाढले होते. 2007-08 मध्ये 18.53 टक्क्यांनी उत्पन्न वाढले होते. 2008-09 मध्ये 5.39 टक्के उत्पन्न वाढेल असा अंदाज आहे. 2009-10 म्हणजे पुढच्या वर्षात 1.79 टक्के उत्पन्न वाढेल असा अंदाज आहे. आधी 19.56 टक्क्यांपर्यंत आपण गेलो होतो. जागतिक मंदीच्या वातावरणामध्ये पुढच्या वर्षी या वर्षाच्या उत्पन्नाच्या 1.79 टक्के एवढेच उत्पन्न वाढेल. उत्पन्न कमी होण्यास वेगवेगळी कारणे आहेत. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती कमी केल्यानंतर चारच मोठया कंपन्या राज्य शासनाकडे सेल्स टॅक्स भरतात. डिझेल आणि पेट्रोलच्या किंमती कमी झाल्याबरोबर राज्याचे सेल्स टॅक्सचे उत्पन्न मोठया प्रमाणात कमी होते ही बाब सभागृहाने लक्षात घेतली पाहिजे. राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्या बाबतीत आपल्याला सर्वांना एकत्रितपणे काम करावे लागणार आहे. शासन तर उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

करीत आहे यात शंका नाही. सेल्स टॅक्स तसेच इतर क्षेत्रातील टॅक्स यातून जास्त उत्पन्न कसे मिळेल यासंदर्भात आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु. महाराष्ट्र हे शिस्तीचे राज्य आहे. काल कोणी तरी मुद्दा काढला की,

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.....

1995 साली युती सरकार सत्तेवर आले आणि 1999 पर्यंत आम्ही राज्य चालविले. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे उभारला व मुंबई शहरामध्ये उड्डाण पूल बांधले. परंतु त्यासाठी कर्ज काढले होते. बॉण्ड विक्रीस काढले होते. पहिली पाच वर्षे आधीच्या सरकारने घेतलेली कर्जे आणि व्याज फेडण्यासाठी राज्याचा मुख्य महसूल त्यामध्ये खर्ची पडत होता. एका बाजूला राज्याची आर्थिक परिस्थिती सावरणे आणि दुस-या बाजूला राज्याची आर्थिक स्थिती आणि महसुली उत्पन्न वाढविणे, त्या माध्यमातून राज्यातील विकासाची कामे हाती घेणे या गोष्टी करण्याचा राज्य सरकारने निश्चितपणे प्रयत्न केला. म्हणूनच सर्विस सेक्टरवर सुध्दा परिणाम झालेला आहे. कालपर्यंत आम्ही अभिमानाने सांगत होतो. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरामध्ये आय.टी.कंपन्या आल्या. मी माझ्या भाषणात सांगितले की, इंजिनिअरिंगच्या जागा वाढविल्या, आय.टी.च्या जागा वाढविल्या, पॉलिटेक्नीकच्या जागा वाढविल्या, आय.टी.आय.च्या जागा वाढविल्या. आता अमेरिकेतील जागतिक मंदीनंतर मोठया प्रमाणात अमेरिकेत किंवा परराष्ट्रात जाऊन आमचे जे तरुण महत्वाच्या जागेवर बसले आहेत, ते परतीच्या दिशेला लागलेले आहेत. त्यांच्या माध्यमातून त्यांनी तेथे मिळविलेला पैसा या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये येत होता. आता ही तरुण मंडळी या देशात परत आल्यानंतर त्याचा निश्चित परिणाम या देशाला जाणवणार आहे. पुण्यासारख्या शहरामध्ये आय.टी.हब आहेत त्याठिकाणी अनेक तरुणांना कॉल सेंटरमध्ये नोकरी करण्याची संधी मिळत होती. त्या माध्यमातून मिळणारा पैसा मार्केटमध्ये येत होता. तो पैसा मार्केटमध्ये येणे कमी झाल्यामुळे निश्चितपणे राज्यावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, याठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, 2009-2010 ची आमची जी योजना आहे त्या योजनेमध्ये जी वाढ झालेली आहे त्याची काही प्रमुख कारणे आहेत. त्यात वेतनामध्ये झालेली सगळ्यात मोठी वाढ हे एक प्रमुख कारण आहे. वेतनासाठी 9397 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. व्याज प्रदानामध्ये 2044 कोटी, निवृत्ती वेतनामध्ये 499 कोटी आणि वेतनेतर सहाय्यक अनुदान यासाठी 801 कोटी रुपयांच्या आसपास पैसा द्यावा लागणार आहे. हे करीत असताना जी कमिटमेंट होती त्यासाठी म्हणून पुरवणी मागणीद्वारे 1711 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्या पध्दतीने 2009-2010 च्या अर्थसंकल्पामध्ये जसजसे प्रस्ताव प्राप्त होतील त्यासाठी 2500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक विभागाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.....

विभागवार तरतूद कशी केली आहे याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. परंतु निश्चितप्रकारे या राज्याची अर्थव्यवस्था आज अडचणीच्या परिस्थितीतून जात असताना देशाची आणि जगाची अर्थव्यवस्था देखील अडचणीच्या परिस्थितीतून जात आहे. त्या संदर्भात आपल्याला निश्चितपणे उपाययोजना कराव्या लागणार आहेत. राज्यावरील वाढणारे कर्ज ही आपल्या सगळ्यांची चिंतेची बाब आहे. या वर्षाअखेर साधारणपणे 1,58,519 लाख कोटी रुपयांचे कर्ज या राज्यावर असणार आहे. त्याची चिंता करण्याचे कारण यासाठी नाही की, या कर्जातील 9120 कोटी रुपयांचे कर्ज केंद्र सरकारकडून 6 टक्के व्याजदराने घेतलेले आहे. राष्ट्रीय अल्पबचतमधून 72,851 कोटी रुपयांचे कर्ज घेतलेले असून त्यापैकी 50 टक्के केंद्र सरकार आणि 50 टक्के राज्य सरकार देते. वित्तीय संस्था आणि बँकांकडून घेतलेले कर्ज 6875 कोटी रुपयांचे असून रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून बाजारातून घेतलेले कर्ज 28,674 कोटी रुपयांचे आहे. भविष्य निर्वाह निधी, राखीव ठेवी आणि अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेले कर्ज 5214 कोटी रुपये इतके असून मार्च, 2008 अखेर 1,44,827 कोटी आणि 2009 वर्षअखेर 1.58 लाख कोटी रुपयांचे कर्ज असले तरी अल्पबचत निधीतून घेतलेल्या कर्जाच्या व्याजाचा दर 9.5 टक्के, भविष्य निर्वाह निधीतील कर्जाच्या व्याजाचा दर 8 टक्के आहे. बाजारातून घेतलेले कर्ज हे 17-18 टक्के व्याजाच्या दराचे नसून 6.5 ते 8 टक्के व्याजदराने घेतलेले कर्ज आहे. हे सगळे कर्ज पर्सनल निगोशिएशन करुन घेतलेले नाही. रिझर्व्ह बँकेने बॉण्ड फ्लोट करुन त्या माध्यमातून राज्य शासनाने कर्ज घ्यायचे ही भूमिका आहे. परिस्थिती अडचणीची असली तरी गेल्या 3 वर्षात या राज्यावर एकदाही ओव्हर ड्राफ्ट घेण्याची वेळ आलेली नाही. या राज्यातील व्याजाचा बोजा साधारणपणे 12 हजार कोटी रुपयांच्या आसपास असणार आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

काल सभागृहात काही सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, येणारा रुपया खर्च कसा होतो, त्यातून व्याजावर किती पैसा खर्च होतो आणि सॅलरीवर किती खर्च होतो ? यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, येणाऱ्या रुपयाचे खर्चाशी प्रमाण आणि उत्पन्नाशी प्रमाण अशी दोन गणिते आहेत. या अनुषंगाने मी प्रथम एकूण खर्चाशी असलेले प्रमाण सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. राज्यात एकूण खर्चाशी असलेले प्रमाण 30.58 टक्के, पेन्शन 6.16 टक्के, इंटरेस्ट 12.95 टक्के, रिपेमेंट ऑफ पब्लिक डेब्ट 6.11 टक्के, सबसिडी 5.67 टक्के, ग्रांट इन एड व नॉन सॅलरी 10.04 टक्के यामध्ये ज्या बाबी समाविष्ट नाहीत या सर्व बाबींचे प्रमाण 28.09 टक्के असे आहे. ॲक्चुअली उत्पन्नाशी असलेले प्रमाण यापेक्षा थोडेसे जास्त आहे. त्यात सॅलरी 42.54 टक्के, पेन्शन 8.46 टक्के, इंटरेस्ट 17.78 टक्के, पब्लिक डेब्ट 8.39 टक्के, सबसिडी 7.79 टक्के, ग्रांट इन एड म्हणजेच नॉन सॅलरी 13.90 टक्के हा आकडा जरी 98 टक्के असला तरी आपली रेव्हेन्यू रिसिप्ट सन 2009-10 मध्ये 80710 कोटी आणि टोटल खर्च 1,10,836 कोटी म्हणजेच 138 टक्क्याच्या आसपास हा खर्च होतो. म्हणून गेल्या तीन वर्षांमध्ये महसुली अधिक्य असलेले आपले राज्य जाणुनबुजून किंवा नाईलाजाने घेतलेल्या निर्णयांमुळे राज्याचे महसुली अधिक्य कमी होत जाणार असले तरी राज्यसरकारच्या समोर आपले उत्पन्न वाढविण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नाही. सभागृहात कोणी तरी असा मुद्दा उपस्थित केला होता की सरकार ॲक्चुअली एक्स्पेंडिचरवर किती खर्च करते ? याबाबत मला असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की, प्लॅन एक्स्पेंडिचरवर सन 2007-08 मध्ये 7108 कोटी, सन 2008-09 मध्ये 11755 कोटी, सन 2008-09 मध्ये 14085 कोटी, सन 2009-10 मध्ये किती खर्च करावयाचा यासंबंधीचा निर्णय उद्याच्या अधिवेशनात मी मांडणार आहे.

महोदय, पोलिसांच्या आधुनिकीकरणाचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. त्यासाठी असलेल्या 100 कोटींपैकी 90.20 कोटीचा आराखडा आपण मान्य केला आहे. तो आराखडा 87 कोटीपर्यंत खाली आणला. त्यात केंद्राचा हिस्सा 68 कोटीचा राहणार आहे आणि बाकीची रक्कम राज्यशासनाची आहे व ती अद्याप वितरित करण्याचे राहिले आहे. एका बाजूला ज्या मुंबईला आपण आर्थिक राजधानी म्हणतो, त्या मुंबईच्या विकासाला दिशा देण्याचे प्रयत्न शासन करीत आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

त्यात राज्यशासनासमोर आज सुरक्षिततेचा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यासंदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. त्या अनुषंगाने मुंबई तसेच राज्यातील सागरी किनाऱ्यांचे संरक्षण असेल अथवा इतर संरक्षणासंबंधीचे जे जे प्रस्ताव गृह विभागाच्या माध्यमातून सरकारसमोर येतील त्यांचा विचार करुन मदत करण्याची भूमिका शासन घेणार आहे.

महोदय, यानंतर राज्यात सर्वात महत्वाचा आणि संवेदनशील असा प्रश्न कोणता आहे तर तो म्हणजे वेगवेगळ्या भागातील अनुशेषासंबंधीचा आहे. त्यात विदर्भ, मराठवाडा, कोकण, खान्देश अथवा पश्चिम महाराष्ट्र अशा सर्वच भागात कशाचा ना कशाचा तरी अनुशेष आहेच. हा अनुशेष दूर करण्याचीच सातत्याने शासनाची भूमिका राहिली आहे. यासंदर्भात मी काही गोष्टी नमूद करु इच्छितो. प्रामुख्याने सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, इंडिकेटर बॅकलॉग समितीचा अहवाल प्रथम आघाडी सरकारने स्वीकारला होता. त्यापूर्वीच्या काळात हा अहवाल स्वीकारलेला नव्हता. हा अहवाल स्वीकारल्यानंतर राज्यात वेगवेगळ्या भागात असणाऱ्या अनुशेषाच्या संदर्भात काय काय तरतुदी करायला पाहिजे त्या त्या करण्याचे काम देखील गेल्या पाच वर्षांच्या काळात केलेले आहे. तसेच जी कामे करावयाचे ठरविले त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

राज्य सरकारने इरिगेशनच्या बॅकलॉगच्या पोटी सन 2002-2003 मध्ये 5 हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला होता. सन 2003-2004 मध्ये 4484 कोटी रुपये, सन 2004-2005 मध्ये 3660 कोटी रुपये, सन 2005-06 मध्ये 1800 कोटी रुपये आणि सन 2006-07 मध्ये 980 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते आणि त्यामुळेच आज इरिगेशनच्या क्षेत्रात 796 कोटी रुपयांचा बॅकलॉग महाराष्ट्रात शिल्लक आहे. अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांचे आकडे असतील, आपल्याकडेही आकडे असतील ते सर्व आकडे आपण एकदा तपासून घेऊ. युती शासनाच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात अनेक पाटबंधा-याच्या प्रकल्पाचे काम सुरु झाले होते परंतु केवळ बॅकलॉगच्या बंधनामुळे या प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यासाठी पैसे मिळू शकत नसल्यामुळे ते प्रकल्प पुढे जाऊ शकत नाहीत. या प्रोजेक्टमध्ये शासनाची मोठया प्रमाणात गुंतवणूक झाल्यानंतरही त्या प्रोजेक्टचा फायदा शेतक-यांना मिळू शकत नसेल तर ते चांगले नाही. ही परिस्थिती पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, कोकणामध्ये किंवा अन्य भागामध्ये असली तरी त्या संदर्भात मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांगितले होते की, मार्च महिन्याच्या पूर्वी बॅकलॉगचा प्रश्न मी संपविणार आहे. बॅकलॉगचा प्रश्न मी मार्च महिन्याच्या पूर्वी संपवू शकलो तर निश्चित प्रकारे पुढच्या काळामध्ये इरिगेशनच्या येणा-या तरतुदीच्या माध्यमातून विदर्भ, मराठवाडयासह जे सूत्र माननीय राज्यपाल महोदयांनी घालून दिलेले आहे किंवा राज्य शासनाचे जे काही सूत्र आहे त्या सूत्राच्या अंतर्गत राहून सर्व विभागांना इरिगेशनच्या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देता येईल यासंदर्भात लक्ष केंद्रित करण्याचे मी ठरवलेले आहे. माझी खात्री आहे की, या राज्यात मग आरोग्याचा बॅकलॉग, सिंचनाचा किंवा अजून कोणताही बॅकलॉग असू दे तो बॅकलॉग दूर करण्याची भूमिका आपण निश्चित प्रकारे आपण घेत आहोत.

सभापती महोदय, कर्ज माफीच्या संदर्भात ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. कर्जमाफीच्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, आपण कर्जमाफीच्या संदर्भात एकमेकांची खिल्ली उडवण्याचे काम करु नका. केंद्रसरकारने थकबाकीदार शेतक-यांना योजना लागू केली होती. या योजनेचा फायदा राज्यातील 38 लाख खातेधारकांना, शेतक-यांना झालेला आहे. 38 लाख शेतक-यांपैकी 31.65 टक्के शेतक-यांना 100 टक्के कर्ज माफीचा लाभ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

झालेला आहे. या कर्जमाफीची रक्कम 6,134 कोटी रुपये एवढी आहे. 6.35 लक्ष खातेधारकांना 1737 कोटी रुपयाच्या रकमेच्या परतफेडीची सवलत मिळाली. या सवलतीमध्ये जे जिल्हे बसत नव्हते त्या जिल्हयाच्या संदर्भात राज्यसरकारने निर्णय घेऊन, आपल्या बजेटमधून 141 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. आपण ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, जर साता-याची बँक सक्षम असेल, पुण्याची बँक सक्षम असेल, कोल्हापूरची बँक सक्षम असेल, सोलापूरची बँक सक्षम असेल आणि तेथे कर्जाचे वाटप मोठया प्रमाणात होत असेल तर साहजिकपणे सवलत देण्याचे काम केंद्राने केले किंवा राज्यसरकारने केले तरी त्याचा लाभ त्या परिसरातील शेतक-यांनाच मोठया प्रमाणात होणार आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील सहकारी संस्था सक्षम नसतील, त्या ठिकाणच्या अनेक भूविकास बँका बंद पडलेल्या असतील, त्या ठिकाणच्या पतसंस्था चांगल्या रीतीने चालविल्या जात नसतील तर त्यामध्ये संस्थाचालकानी संस्था कशी चालवली याबद्दल त्यांना दोष देण्यापेक्षा जो शेतकरी थकबाकीदार झालेला आहे, ज्या शेतक-याला आपल्या शेतातून उत्पन्न काढता येत नाही त्याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, स्वातंत्र्यानंतर म्हणजे माननीय शरद पवार हे कृषी मंत्री होईपर्यंत या देशातील शेतक-यांना पीक कर्जासाठी 60 हजार कोटीच्या आसपास मिळत होते परंतु आता देशातील शेतक-यांना 2.80 हजार कोटीच्या आसपास पीक कर्जाचे वाटप केले जाते. माननीय शरद पवार कृषी मंत्री नव्हते तेव्हा देशातील शेतक-याला 13 टक्क्याच्या दराने पीक कर्ज घ्यावे लागत होते परंतु आता केंद्र सरकारने पीक कर्जाचा दर 7 टक्क्यावर आणला, या पीक कर्जामध्ये राज्य सरकारने 1 टक्का झळ सोसण्याचा निर्णय घेतला, जो शेतकरी वेळेवर कर्जाची परतफेड करेल त्याला 2 टक्के सबसीडी देण्याची भूमिका घेतली. याचा अर्थ आता या राज्यातील शेतक-याला 4 टक्के दराने 3 लाख रुपयापर्यंतचे पीक कर्ज त्याच्या जमिनीच्या पर्सेंटेजच्या प्रमाणात मिळण्याची सोय झालेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

एका बाजूला आर्थिक पतपुरवठा वाढवला. दुसऱ्या बाजूला व्याज दर कमी केले. केंद्र सरकारने काय काय कमी केले ते देखील मी आपल्याला सांगतो. केंद्र सरकारची जबाबदारी दोन गोष्टींसंबंधी असते. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या की, केंद्रीय कृषि मंत्री यांच्या विरोधात आवाज काढण्याऐवजी आमच्याबद्दल बोलला असता तर आमच्या मनामध्ये काहीही राहिले नसते. एका बाजूला शेतीचा पतपुरवठा 2 लाख 80 हजारावर नेण्यात आला. 13 टक्के व्याजाचे दर 7 टक्क्यावर आणण्यात आले. खतासाठी मोठ्या प्रमाणावर सबसिडी देण्यात आली. काल कुणी तरी म्हटले की, महागाई वाढली आहे. एका बाजूला आपण महागाई वाढते असे म्हणता, दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळाला पाहिजे असे म्हणता. 630 रूपयाच्या वर शेतकऱ्याच्या गव्हाला कधीही भाव मिळाला नव्हता. यासंबंधी केंद्रीय कृषि मंत्र्यांनी निर्णय घेतला. आज गव्हाची आधारभूत किंमत रुपये 1080/- च्या आसपास जाऊन पोहोचली आहे. ऊसासंबंधी निर्णय घेतला. श्री.वाजपेयी साहेबांच्या काळात ऊसाची किंमत रुपये 50/- ने वाढली होती. आज महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रूपये 1500/- इतका दर मिळत आहे. धानाच्यासंबंधी देखील तीच भूमिका आहे. कापसाच्यासंबंधी देखील तीच भूमिका आहे. अन्य पिकांसंबंधी देखील तीच भूमिका आहे. फूड सिक्युरिटीचा मुद्दा केंद्र सरकार सातत्याने मांडत आहे. मागच्या वेळी आपणच या सभागृहामध्ये लाल गहू दाखवत होता. या देशातील शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी 227 दक्षलक्ष टन गव्हाचे उत्पादन केले. आज या देशातील 110 कोटी जनतेला अन्नधान्याच्यासंबंधी चिंता नाही. यावर्षी अन्नधान्याचे उत्पादन थोडेसे वाढेल अशा प्रकारचे अंदाज केंद्र सरकारने व्यक्त केले आहेत. जागतिक मंदीची चर्चा शहरामध्ये सुरू आहे. महागाईची चर्चा शहरामध्ये सुरू आहे. असे जरी असले तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये जनतेमध्ये यासंबंधीची चर्चा नाही. काल विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कांद्याचा भाव रूपये 1500 झाला. कांद्याचा भाव पडल्याने सरकार गेल्यामुळे आपल्या डोळ्यामध्ये पाणी आले होते. आज नवीन कांदा बाजारात आला तरी कांद्याचा भाव पडला नाही. शेतकऱ्याला चार पैसे मिळायला लागले. आज शेतकऱ्यांच्या मनामध्ये या गोष्टीचा आनंद आहे. शेतकऱ्याच्या ऊसाला कधीही रूपये 1500 भाव मिळाला नव्हता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

सोयाबीनला कधीही पैसा मिळाला नव्हता. आपल्या विदर्भामध्ये कापसाला यावर्षी रूपये 2800 ते 3000 इतका दर मिळाला आहे. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यासह सर्व सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे आनंद झाला असेल. केंद्र सकारने स्वीकारलेल्या धोरणामुळे आज हे सर्व होऊ शकलेले आहे, ही गोष्ट देखील आपण लक्षात ठेवली पाहिजे. आर्थिक मंदीमुळे उद्योग बंद पडत आहेत, असे आपण सांगता. त्यासंबंधी मी मुद्दाम येथे सांगू इच्छितो की, सन 2005 पासून तीन प्रतिष्ठित प्रकल्पांसह 135 प्रकल्पांना मान्यता दिली होती. आपण काल म्हणालात नुसती मान्यता दिली, शिफारस केली हे सांगू नका. प्रत्यक्षात किती प्रकल्प सुरू झाले हे सांगा. म्हणून मुद्दामहून मी उद्योग विभागाकडून माहिती मागवून घेतली आहे. 2005 पासून तीन प्रतिष्ठित प्रकल्पांसह 135 प्रकल्पांना राज्याने मान्यता दिली होती. त्यापैकी 31 प्रकल्पाचे प्रत्यक्षात उत्पादन सुरू झाले आहे. 47 प्रकल्पांची उभारणी सुरू आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, किती प्रकल्प बंद झाले हे मी विचारले होते. प्रत्यक्ष किती प्रकल्प सुरू झाले हे मी विचारले नव्हते. गेल्या वर्षभरामध्ये किती प्रकल्प बंद झाले यासंबंधी माहिती विचारली होती.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, 47 प्रकल्पांची उभारणी सुरू आहे. 28 प्रकल्पांनी जमीन संपादन केली आहे. कार्यान्वित झालेल्या 31 प्रकल्पातील गुंतवणूक रूपये18730 कोटी इतकी आहे आणि रोजगार 23219 इतका आहे. एक गोष्ट खरी आहे की, काही प्रकल्प बंद झाले आहेत. टेल्को सारखी कंपनी आठवड्यातून पाच दिवस बंद ठेवण्यात येत आहे. त्यामुळे या कंपनीवर आधारित असेलेले छोटे पुरवठादार आहेत, त्यांच्यावर निश्चितपणे परिणाम होणार आहे. बजाज कारखाना बंद पडलेला नाही. बजाजचा कारखाना चाकणला शिफ्ट झाला आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील .....

सभापती महोदय, या विशाल प्रकल्पापैकी जनरल मोटार्स, डेमलर्स ॲन्ड क्रॅशलर्स, जिंदाल, पॉलीफिल , हुंदाई , व्होक्स वॅगन इत्यादी कंपन्यांनी आपले उत्पादन सुरु केलेले आहे. सरकार येत असते तसेच जात असते, राजकारण होत असते , निवडणुकासुध्दा होत असतात हे ठीक आहे.परंतु कंपन्या मात्र कायम स्वरुपी राहत असतात . महाराष्ट्रातील वातावरण चांगले नाही असे जर म्हटले तर देशातील उद्योगपती आणि परदेशातील उद्योगपती येथे येणार नाहीत परंतु आता परदेशातील थेट गुंतवणुकीच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर असे सांगता येईल की, मंजूर झालेल्या थेट गुंतवणुकीच्या 4 हजार 92 प्रकल्पापैकी 1659 प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत.तसेच केन्द्र सरकारनेसुध्दा या सर्व प्रकल्पांना वेळोवेळी मदत केलेली आहेत.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचा निधी दुसरीकडे वळविण्याच्या संदर्भात काल या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. परंतु रोजगार हमी योजनेचा निधी दुसरीकडे वळविण्यात आलेला नाही. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, कर उत्पन्नातून निधी कडे जेव्हा रक्कम वळवत असतो तेव्हा प्रत्यक्ष कामासाठी ही रक्कम खर्च करीत असतांना क्रेडिट आणि डेबिट अशा प्रकारे अकाऊन्टीग एन्ट्री करावी लागते त्यामुळे काही जणांचा गैरसमज होण्याची शक्यता असते. एक गोष्ट मला मान्य करावी लागेल की, एम.आर. ई.जी.एस. मध्ये आज जेवढया प्रमाणात खर्च व्हावयास पाहिजे तेवढया प्रमाणात खर्च महाराष्ट्रात आपण करु शकलेलो नाही. 2006-2007 मध्ये 892 कोटी रुपये, 2007-2008 मध्ये 1119 कोटी रुपये, 2008-2009 मध्ये 704 कोटी रुपये या योजनेवर आपण खर्च केलेला आहे. आज राज्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लहान लहान कामे आपल्याला घ्यावयाची आहेत त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला खूप कमी वेळ मिळाला आहे. तरीसुध्दा नियोजनाच्या दृष्टीकोनातून बांधकाम विभाग असो वा नियोजन विभाग असो या दोन्ही विभागांना एकत्र करुन एम.आर.ई.जी.एस.मधील निधी असो वा पी.एम.जी.एस.वाय. मधील निधी असो वा अन्य निधी असो तो राज्यामध्ये जास्तीत जास्त कसा आणावयाचा याबाबतीत शासन निश्चितपणे निर्णय घेणार आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील ....

सभापती महोदय, या नंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. महिलांच्या बचत गटाच्या संदर्भात या ठिकाणी बरेच बोलले गेले आहे. सरकारने यासंबंधी जो निर्णय घेतला तो अत्यंत प्रामाणिकपणे घेतला आहे . सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या ठिकाणी उपस्थित असून त्यांना याची माहिती आहेच. सरकारने जरी प्रामाणिकपणे चांगला निर्णय घेतलेला असला तरी त्याबाबतीत लोकांना सामजावून सांगण्याच्या कामात आपण कमी पडत असतो. महिला बचत गटांना 4 टक्के दराने कर्ज देण्यात येईल असे सरकार ज्यावेळी सांगते त्यावेळी महिलांच्या बचत गटांना आम्ही हे सुध्दा सागितले पाहिजे की, राष्ट्रीयकृत बॅन्के कडून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केकडून वा अन्य वित्तीय संस्थेकडून 11 टक्के व्याजाने कर्ज मिळत असले तरी तुम्ही ते कर्ज घ्यावे. त्यातील त्यांनी फक्त 4 टक्के व्याज आणि मुद्दलाची रक्कम द्यावयाची आणि उरलेल्या 7 टक्के रकमेच्या बाबतीत सबधित बॅन्क आर्थिक विकास महामंडळाच्या मार्फत शासनाकडे मागणी करील आणि त्या बॅन्केला हे पैसे मिळतील. या संदर्भातील जी.आर. शासनाने पाठविला आहे परंतु तो जी.आर. त्यांच्यापर्यंत न पाहोचल्यामुळे वा त्यांना यासंबधीची माहिती नसल्यामुळे अनेक बचत गटांना हा निधी उपलब्ध होत नाही. या राज्यातील 50 टक्के महिलांच्या कल्याणासाठी महिला धोरण माननीय श्री.शरद पवार या राज्याचे मुख्यमंत्री असतांना जाहीर केले होते . महिलाच्या सबलीकरणासाठी आपल्याला ज्या अडचणी येतील त्या दूर करुन त्यातून पुढे जाण्याचे काम करणे गरजेचे आहे. असे मला या निमित्ताने आपल्याला सांगावयाचे आहे. 2005-2006 मध्ये कोणकोणत्या बॅन्कांनी किती निधी उपलब्ध करुन दिला होता याचे स्टेटमेन्ट मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. त्याबाबतीत मी अधिक वेळ बोलून मला सदनाचा वेळ घ्यावयाचा नाही.

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी याठिकाणी उपस्थित केलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे मला देता येणे शक्य नसले तरी माननीय उपसभापतींनी देखील याठिकाणी प्रश्न उपस्थित केला होता. या राज्यामध्ये मॅनेजमेंटच्या किंवा सरकारी कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे काही बँका, पतसंस्था अडचणीत आल्या आहेत. त्यामध्ये ठेवीदारांची चूक नाही. त्या बँकांवर किंवा पतसंस्थांवर विश्वास ठेवून ठेवीदारांनी आपली संपूर्ण आयुष्यभराची पुंजी त्याठिकाणी जमा केलेली असते. अशावेळी त्या बँकाच्या व्यवस्थापनामध्ये काही अडचण निर्माण झाली असेल तर गरज पडल्यास राज्याचा अर्थमंत्री म्हणून त्याबाबत केंद्र सरकारबरोबर बोलणी करण्यात येतील. आणि गरज पडल्यास आमच्या पातळीवर सहकार खात्याच्या माध्यमातून यामध्ये ज्या अधिकाऱ्यांचे चुकले असेल तर त्याबाबत दखल घेऊन निश्चितपणे त्याबाबत काय करता येईल याची नोंद घेतली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी याठिकाणी मुद्दा मांडला होता. अन्य राज्यामध्ये जेंडर बेस्ड बजेट करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्याप्रमाणे आपल्या राज्यात देखील करण्यास आपण सुरुवात करणार आहोत. आपण आता बऱ्याच स्टिमुलेशनमधून जात असल्यामुळे त्याचे काय परिणाम होतील यादृष्टीने आपल्याला एकत्रित बसून चर्चा करावी लागेल. माननीय सदस्यांनी मांडलेली सूचना स्वागतार्ह असल्यामुळे त्याबाबतीत आपले निश्चितपणे कमिटमेंट राहील. आणि राज्य सरकार त्याबाबतीत जरुर विचार करील एवढेच याठिकाणी सांगू इच्छितो. माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे याठिकाणी मांडले आहेत. त्यामध्ये माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी राज्य सहकारी बँकेच्या संदर्भात याठिकाणी चर्चा केली. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी याठिकाणी कर्ज कशासाठी घेतले याचे विश्लेषण केले. घेतलेल्या कर्जामध्ये भांडवली रक्कम आणि व्याजावर किती खर्च झाले याबाबत विचारणा केली. माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी समुद्र किनाऱ्याच्या परिसरातील पोहता येणाऱ्या तरुणांना संरक्षणाच्या कामामध्ये कसे सामावून घेता येईल या संदर्भात भूमिका मांडली. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फीच्या प्रतिपूर्तीसंदर्भात विषय मांडला. त्याबाबत समाज कल्याण विभाग असेल किंवा आदिवासी कल्याण विभाग असेल, उच्च व तंत्र शिक्षण विभाग असेल यांच्या बाबतीत आम्ही एक सिस्टीम तयार केली आहे. प्रत्येक विभागाच्या सचिवांनी ही रक्कम रिलिज करण्याऐवजी वर्षाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. दिलीप वळसे पाटील...

सुरुवातीला सर्व रक्कमेची एकत्रितपणे तरतूद करुन ती विद्यार्थ्यांपर्यंत कशी जाईल यासाठी आम्ही सिस्टीम तयार केली आहे. त्याचा निश्चितपणे फायदा झाल्याशिवाय रहाणार नाही. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी देखील अनेक प्रश्न उपस्थित केले. माननीय सदस्य हे नेहमी सातत्याने सामाजिक प्रश्नाच्या बाजूने उभे राहिले आहेत. आपल्या मनामध्ये असलेले विचार आपण याठिकाणी उपस्थित करुन त्याबाबत आपण उत्तराची अपेक्षा जरी धरली असली तरी आचारसंहितेचा भंग होऊ नये, किंवा त्याबाबत आश्वासन दिले, कमिटमेंट केली या चक्करमध्ये न सापडता मी सांगू इच्छितो की, ज्यांचा ज्यांचा पगार राहिला असेल तो त्यांना मिळाला पाहिजे, कारण तो त्याचा हक्क आहे. त्यामुळे त्याबाबत निश्चितपणे मदत करण्यात येईल आणि त्यांचा पगार वेळेवर कसा होईल या संदर्भात जरुर विचार करु. त्याचप्रमाणे कायद्यामध्ये बदल करण्यासंदर्भात सूचना करण्यात आली आहे. कामगार विभाग अधिक गतिमान करण्यासंदर्भात सूचना करण्यात आली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करण्यात येईल. सभापती महोदय, मला सांगण्यास आनंद वाटतो की, या सभागृहामध्ये नेहमी एखादा विषय आल्यानंतर त्यावर अतिशय शांतपणे आणि वरच्या पातळीवर चर्चा केली जाते. काल देखील अशाच पध्दतीने या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यात आली.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गजानन महाराज यांच्या संदर्भात दोन मुद्दे उपस्थित केले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे हे शताब्दी वर्ष आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासंबंधी शासनाने कमिट्या सुध्दा स्थापन केलेल्या आहेत. परंतु शासनाने या शताब्दी वर्षाच्या बाबतीत कोणताही कार्यक्रम जाहीर केलेला नाही. कोणत्याही कमिटीची बैठक झालेली नाही.तसेच शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दीचे हे वर्ष आहे. देहू,आळंदी,पंढरपूर, तुळजापूरच्या धर्तीवर याठिकाणी एखादे प्राधिकरण करुन शेगावचा विकास आराखडा तयार करण्याच्या संबंधात मी मागणी केली होती. त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केलेला नाही. तेव्हा कृपया याबाबतीत खुलासा केला तर बरे होईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काल शेगावच्या संदर्भात, संत तुकडोजी महाराजांच्या संदर्भात, तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जेजूरीच्या संदर्भात आणि इतर सन्माननीय सदस्यांनीही याबाबतीत निश्चितपणे काही अपेक्षा व्यक्त केलेली आहे. त्याचे मूळ कारण म्हणजे देहू, आळंदी, पंढरपूर, तुळजापूर येथील आराखडयाबाबत अर्थसंकल्पाच्या भाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे सहाजिकच सर्व सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, आपापल्या भागातील योजना देखील मार्गी लागाव्यात. खरेतर यापूर्वी शेगावच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. त्यासाठी समितीही स्थापन झालेली आहे. पण समितीची बैठक का झाली नाही ? कशामुळे झाली नाही ? याबाबतीत जरुर विचार करु. परंतु ग्रामविकास विभाग आणि पर्यटन विभाग या दोन विभागांच्या बाबतीत सांगावयाचे तर ग्रामविकास विभागाकडे तीर्थक्षेत्र विकासासाठी असलेला निधी आणि पर्यटन विभागाकडे पर्यटनाच्या अंतर्गत असलेला निधी + राज्य शासनाच्या स्टेट बजेटमधील निधी असे तिन्ही निधी एकत्रित करुन या सर्व संतांना कसे वंदन करावयाचे याबाबतचा निर्णय निवडणुकीनंतर करु शकू.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपल्याला आचारसंहितेचे बंधन आहे याची जाणीव माननीय मंत्री महोदयांना आणि सन्माननीय सदस्यांनाही देखील आहे.परंतु मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, मी सदनामध्ये एक गोष्ट पत्रानिशी, तारीखनिशी सांगितली होती. मी त्याचा पुन्हा उल्लेख करीत नाही.अर्थसंकल्पातील परिच्छेद क्र.8.2 मध्ये असे म्हटलेले आहे की,"सुधारित वेतन संरचनेचा लाभ राज्य शासकीय, जिल्हा परिषदा, अनुदानित शाळा, कृषी व कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्न अशासकीय महाविद्यालये, तसेच इतर अनुदानित संस्थातील 14

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

लक्ष कर्मचाऱ्यांना मिळणार आहे." त्या महाविद्यालयांच्या बाबतीत अजून जी.आर.काढलेला नाही. तो केव्हा काढण्यात येणार आहे ? हे मी विचारत नाही. पण मी काल माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक सांगितले होते. एकच वर्ग असा आहे की, ज्याच्याबाबतीत केंद्र शासन 80 टक्के अर्थसहाय्य देणार आहे. त्यांनी राज्याच्या चीफ सेक्रेटरींना 31 तारखेला जी.आर.पाठवून सांगितले की, आम्ही 80 टक्के भार सहन करण्यास तयार आहोत, आचारसंहिता लागल्यानंतर सुध्दा. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये त्यांनी सर्व पैसे युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनकडे सोपविले आणि मग त्यांनी राज्याच्या सचिवांना पत्र दिले की, यावर्षी आम्ही 40 टक्के रक्कम देणार आहोत, तेव्हा 31 मार्च पर्यंत आपण ही रक्कम घेऊन जावी. आता ती रक्कम त्यांना द्या किंवा काय वगैरे बाबी मी विचारत नाही. कारण आचारसंहितेचा प्रश्न आहे. मी त्यावेळी पत्राचे नंबर देखील कोट केले होते, त्याची प्रत माझ्याजवळ आहे. ते तुम्हाला 31 मार्च पर्यंत 80 टक्क्यापैकी 40 टक्के रक्कम देण्यास तयार आहेत आणि यासंदर्भात त्यांनी फेब्रुवारीमध्ये पत्र पाठविलेले आहे. आपण तो निधी घेऊन येण्याच्या बाबतीत व्यवस्था करणार आहात काय ? एवढाच माझा प्रश्न आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय,मी कालच सन्माननीय सदस्यांकडे त्या पत्राची प्रत मागितली होती. आपण भाषण करीत होता, त्यामुळे कदाचित ती प्रत द्यावयाची राहून गेली असेल. आपण ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. मी जरुर याबाबतीत लक्ष घालतो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामामध्ये एक कोटीचा भ्रष्टाचार झाला होता, त्यासंदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबतीत खालच्या स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात आले, परंतु तेथील कॅफोंना सस्पेंड करण्यात आलेले नाही. 20 लाख रुपयांचे काम झाले आहे ही बाब रेकॉर्डवर आली आहे, पण प्रत्यक्षात त्यांनी एक कोटीची बिले काढलेली आहेत. त्यामुळे तेथील कॅफोंना सस्पेंड करणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही बाब तपासून घेऊन जर ते दोषी असतील तर कारवाई करु.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे मी आता सदरहू पत्राची प्रत माननीय मंत्री महोदयांना दिली आहे.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी पूर्वीच्या बजेटच्या भाषणातील आणि आताच्या बजेटच्या भाषणातील अनेक डिस्क्रेपन्सी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिल्या आहेत. मग विजेसाठी दिलेले पैसे असतील किंवा जीवनदायी योजना असेल किंवा आणखी काही असू दे. माझा एकच स्पेसिफीक प्रश्न आहे की, ज्यावेळी आम्ही अधिकाऱ्यांना पत्राव्दारे प्रश्न विचारतो की, अमुक बाबतीत काय झाले ? याबाबतीत खर्च कसा केला आहे ? संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे काय ? याबाबतीत पत्रे पाठवून देखील आम्हाला महिना-महिनाभर उत्तरे मिळत नाहीत. अशा प्रकारे उत्तरे न पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे काय ?

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत . . . .

आश्रमशाळेचा मोठा घोटाळा गेल्या दोन वर्षापासून सुरु आहे. साधारणपणे या आश्रमशाळेच्या माध्यमातून दोन हजार कोटी रुपये आदिवासी विकास महामंडळाला मिळतात. आश्रमशाळेचा मोठा घोटाळा मी माझ्या भाषणात मांडला होता. गेली दोन वर्षे त्या लोकांवर कारवाई होत नाही. ती कारवाई होणार काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील :अध्यक्ष महोदय, सरकारला लिहिलेली पत्रे आहेत. त्या पत्रांचे स्वरुप बघणे गरजेचे आहे. जरुर आपण जी पत्रे पाठविलेली आहेत ती मला द्यावीत. त्यामध्ये जाणीवपूर्वक विलंब झालेला आहे की, कोणत्या कारणामुळे विलंब झालेला आहे, त्या पत्रांची उत्तरे का गेली नाहीत, हे तपासून घेता येईल. आश्रमशोळेच्या संदर्भात मला असे वाटते की, आपण याबाबत एकत्र बसून चर्चा करु.

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

श्री. भगवान साळुंखे : मी काल माननीय अर्थमंत्र्यांचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधले होते. महाराष्ट्रात कायम विनाअनुदान तत्वारील 6000 शाळा आहेत, त्या शाळांच्या बाबतीत माननीय मुख्य मंत्र्यांनी डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये शब्द दिला होता की, आठ दिवसात या शाळा अनुदानीत करण्यात येतील. माननीय शिक्षण मंत्र्यांनी सुध्दा उत्तर दिले होते की, या संदर्भात गेल्या तीन महिन्यात अनेक बैठका झाल्या आहेत. यासंदर्भात शासनाने शब्द दिला होता पण प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही, ती त्वरित करण्यात यावी, अशी विनंती आहे. तसेच महाराष्ट्रात केंद्रीय आश्रमशाळा जवळ जवळ 300 च्या आसपास आहेत. त्या आश्रमशाळांना फंडिंग करण्याचे महाराष्ट्र शासनाने मान्य केले आहे. परंतु अद्याप त्याबाबतची कार्यवाही झालेली नाही तेव्हा या दोन्हीं बाबींचा विचार करण्यात यावा.

श्री. दिलीप वळसे-पाटील :नवीन बर्डनची कमिटमेंट मी आता येथे देऊ शकत नाही.

ॲड. उषा दराडे : अध्यक्ष महोदय, बजेटच्या कामाच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांना रविवारी सकाळी 10.00 वाजता बोलावून रात्री 1.30 वाजेपर्यंत काम करुन घेतले आणि रात्री 1.30 वाजता तुम्हाला जाता येत असेल तर जा असे सांगितले.....

श्रीमती मंदा म्हात्रे :सभापती महोदय, रविवारी सकाळी 10.00 वाजता बोलावून रात्री 1.30 वाजे पर्यंत थांबवून ठेवणे आणि रात्री 1.30 वाजता तुम्हाला जायचे असेल तर जा असे सांगणे हे बरोबर नाही. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय अर्थमंत्र्यांनी या ठिकाणी धोरणात्मक बाबी मांडल्या आहेत. मला याठिकाणी माननीय मत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आपण पश्चिम महाराष्ट्रातील बँकांच्या संदर्भात उल्लेख करताना पुण्याच्या बँकेत 4500 कोटी रुपयाच्या ठेवी आहेत. इतरही बँका सक्षम आहेत असे सांगितले, हे मला मान्य आहे. पण त्यामुळे कर्जमाफीमध्ये पश्चिम महाराष्ट्राला फार लाभ झाला अशी तुम्ही खंत बाळगू नका. विदर्भ आणि मराठवाडयातील बँका नादारीत असल्या कारणाने तेथे कर्ज मिळत नाही, हा मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री. वरपूडकरसाहेब सुध्दा आहेत. मला या ठिकाणी अत्यंत नम्रपणे निदर्शनास आणावयाचे आहे की, परभणीच्या बँकेचा बँडबाजा का वाजला ते तपासण्यात यावे. नांदेडची बँक कोणी लुटली या संबंधीचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी सर्व अधिवेशनामध्ये या ठिकाणी मांडत होते. धाराशिव बँक, उस्मानाबाद बँक, वर्धा बँक, अकोला बँक, या बँकांची जी लुटालूट झालेली आहे त्यासंदर्भात शासनाकडून काही कारवाई झालेली नसल्यामुळे त्या लुटीचा संदर्भ लागत नाही. सात-आठ वर्षापासून त्या बँका नादारीमध्ये कां आल्या? त्यांच्याकडे पैसेच नसल्यामुळे त्या कर्ज देणार कोठून? हा प्रश्न आहे. त्यामुळे आमच्याकडील बँकावर कारवाई न करता राजकीयदृष्टया त्यांच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे, असा माझा आक्षेप आहे. म्हणून आपण आपली पाठ थोपटत असताना आमच्याकडच्या बँका नादारीच्या परिस्थितीत कां आल्या? तसेच अनुशेषाचा अहवाल हा माझाच अहवाल होता. तो सन 1998 साली देण्यात आला. आमचे सरकार गेले म्हणून तुमच्या सरकारने ते काम केले. म्हणून मागच्या सरकारने काही केले नाही, असा याठिकाणी उल्लेख करण्यात आला तो बरोबर नाही, एवढेच मला निदर्शनास आणावयाचे आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील :अध्यक्ष महोदय, मुळातच विदर्भातील शेतकरी हा मोठे कर्ज घेणारा शेतकरी नाही तर तो लहान कर्ज घेणारा शेतकरी आहे. म्हणून विदर्भातील किंवा मराठवाडयातील जे थकबाकीदार शेतकरी होते त्यांच्या बाबतीत मी मघाशीच सांगितलेले आहे की, महाराष्ट्रामध्ये 38 लाख शेतक-यापैकी 31 लाख शेतक-यांना केंद्र शासनाच्या योजनेमध्ये 100 टक्के कर्जमाफी मिळाली आणि राज्याच्या योजनेमध्ये आपण 20 हजार रुपयांपर्यंतचीच मर्यादा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

ठेवलेली होती. तरी आता सगळेच कर्ज माफ होणार आहे अशी भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण व्हायला लागली होती. बँका पण टिकल्या पाहिजेत आणि शेतकरी पण टिकाला पाहिजे, नाही तर नंतरच्या वर्षी कोणालाच पीककर्ज मिळाले नसते.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

आधीच्या सरकारने अनुशेष ठेवला ही भावना माझ्या मनामध्ये नव्हती. परंतु 1999 मध्ये लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर नागपूरला जे पहिले अधिवेशन झाले त्या अधिवेशनामध्ये बॅकलॉगच्या संदर्भातील अहवाल स्वीकारला गेला आणि त्यानंतरच सरकारची कमिटमेंट सुरु झाली आणि त्याप्रमाणे शासनाने बॅकलॉग दूर करण्याचा प्रयत्न केला.

उपसभापती : अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

उपसभापती : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. रविवारी सकाळी 4.00 वाजता महिला अधिकाऱ्यांना बोलवून रात्री दीड वाजता कामावरुन जावयाचे असेल तर जाऊ शकता अशा प्रकारचे वर्तन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत झाले असल्याबद्दलची बातमी 6 तारखेच्या लोकमत दैनिकामध्ये देण्यात आलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना या मुद्याचे महत्व वाटले नाही त्याबाबत मी काही करु शकत नाही. परंतु माननीय सभापतींनी ऐकून घ्यावे आणि त्याबाबत निर्देश द्यावेत अशी मी विनंती करते. त्या महिला कर्मचाऱ्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी 7.00 वाजेपर्यंत मंत्रालयात राहावे लागले. त्यांच्या जेवणाची आणि चहापाण्याची साधी व्यवस्था करण्यात आली नव्हती. पूर्वसूचना न देता अशा प्रकारे महिला कर्मचाऱ्यांना जे ठेऊन घेतले त्याचा पहिल्यांदा तीव्र शब्दामध्ये मी निषेध करते आणि संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधामध्ये शासनाने ताबडतोबीने कारवाई करावी अशा प्रकारची मागणी मी या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने करीत आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या दोन तीन दिवसांपासून हा मुद्दा सभागृहात उपस्थित करीत आहेत. त्याबाबत सभागृहामध्ये खुलासा झाला पाहिजे. त्याला आचारसंहितेचे काही बंधन नाही.

उपसभापती : यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत योग्य ती कारवाई केली जाईल.

--

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. द्राक्ष वायनरीच्या संदर्भात मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. काल सुध्दा मी हा विषय मांडला होता परंतु आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT/

श्री. पाशा पटेल ....

माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणामध्ये त्याचा उल्लेख झालेला नाही. विषय असा आहे की, साडेनऊ हजार एकरमधील शेतकरी अस्वस्थ आहेत. त्यांना काही तरी आश्वासन द्यावयास पाहिजे होते. त्या शेतकऱ्यांनी स्वत:हून द्राक्ष लागवड केलेली नाही. त्या शेतकऱ्यांकडे जाऊन आपण सांगितले की, वाईनची द्राक्षे लावावीत. ज्या वाईन कंपन्या स्थापन झाल्या त्या कंपन्यांनी रोपे पुरवली. ती रोपे पुरवत असताना छोट्या कांडक्यासाठी 50-50 रुपये आगाऊ घेतले आणि पुन्हा सांगितले की, आपल्या बागेमध्ये एकरी पाच टन माल आला तरच तुमचा माल घेऊ नाही तर घेणार नाही. कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी स्वत: जाऊन कात्री हातामध्ये घेऊन ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये एकरी एकरी 20-20 टन माल आला होता तो माल कात्रीने कापून फक्त पाच टन माल ठेवला. कारण काय तर आम्ही आपल्याला 40 रुपये भाव देणार असे सांगितले. 40 रुपयांच्या अपेक्षेपोटी शेतकऱ्यांनी उघड्या डोळ्यांनी घळ कापत असताना पाहिले. एवढे सगळे करुन शेवटच्या दोन महिन्यामध्ये ज्या पध्दतीने धोका दिला गेलेला आहे, करार मोडण्यात आलेले आहेत त्यासंदर्भात माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, ज्या कंपन्यांनी करार मोडलेले आहेत त्याचे परवाने शासनाने रद्द करावेत. शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्याची पूर्णपणे नुकसानभरपाई भरुन मिळाली पाहिजे. यामध्ये सरकारच्या तिजोरीतून पैसे जाण्याचे काही कारण नाही. त्या कंपन्यांनी प्रचंड नफा कमावलेला आहे. पाऊण लीटरची बाटली 1100 रुपयांना विकलेली आहे.

उपसभापती : हे आपल्याला कसे काय माहीत ?

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी त्याच्यातला आहे.

उपसभापती : कशातला ? वाईनमधले काय ?

श्री. पाशा पटेल : नाही, मी घेत नाही. मी उत्पादक आहे. मी 3 एकरमध्ये कष्टाने बाग लावलेली आहे. बँकेचे कर्ज घेऊन बाग लावलेली आहे. अजून कर्ज फिटलेले नाही. माझे स्वत:चे नुकसान झालेले आहे.

उपसभापती : आपण नंतर मला येऊन भेटावे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी येतो. आपण मला तेवढी मदत करावी.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल.....

पहिली बाब अशी आहे की, त्या वायनरीवाल्याला शिक्षा झाली पाहिजे. त्यांचे लायसन्स रद्द झाले पाहिजे. शेतक-यांचे झालेले नुकसान भरुन निघाले पाहिजे. ज्या बँकांनी द्राक्ष उत्पादकांना कर्ज दिलेले आहे ती कर्ज वसुली तात्काळ थांबविली पाहिजे आणि जे कर्ज थकलेले आहे त्याचे नुतनीकरण करुन त्यांना पुन्हा नव्याने ट्रीट केले पाहिजे एवढेच मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला सांगत आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ नीलम गो-हे : सभापती महोदय माझा औचित्याचा मुद्दा आहे. 10वी आणि 12वीच्या परीक्षांचे फारच थोडे दिवस आता शिल्लक राहिलेले आहेत. गेल्या काही दिवसामध्ये बेफिकीर कारभाराचा फटका संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना आणि अनेक शिक्षण क्षेत्रातील संस्थांना बसला असून त्यासंदर्भात उच्च न्यायालयाने देखील ताशेरे मारलेले आहेत. 539 भारनियमनग्रस्त परीक्षा केन्द्रापैकी फक्त 287 केन्द्रावर पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे. ही बाब सरकारच्या वतीने सचिव श्री. संजीव कुमार यांनी उच्च न्यायालयामध्ये सांगितली. शिक्षण सचिवांनी याबाबतीत अनुदानित शाळांचा उल्लेख केला. आपण विनाअनुदानित शाळा अनुदानित केल्या जाव्यात म्हणून या ठिकाणी सातत्याने संघर्ष करीत असतो. परंतु ज्या शाळांना अनुदान मिळालेले आहे त्यांनी देखील इन्व्हर्टर किंवा जनरेटर अशा प्रकारची उपकरणे उपलब्ध करुन ठेवलेली नव्हती. इतकेच नव्हे तर 1389 परीक्षा केन्द्रावर दिवे, पंखे यांचा देखील अभाव असल्याचे दिसून आले. या औचित्याच्या मुद्याद्वारे मला या गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, उपसभापती महोदय, आपण स्वत: ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात लक्ष घातल्याचे मी दूरचित्र वाहिन्यांवरुन पाहिलेले आहे. परंतु असा प्रश्न निर्माण होतो की, अनेक वेळेला हा प्रश्न विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये उपस्थित झालेला असताना या बाबतीत शालेय शिक्षण विभाग काय करीत होता ? या विभागाने परीक्षेच्या संदर्भात अगोदर कोणती देखरेख केली ? ज्यावेळी शाळांचे इन्स्पेक्शन करण्यात आले त्यावेळी ज्या शाळांमध्ये ही साधने उपलब्ध नव्हती त्या बाबतीत शालेय शिक्षण विभागाने कोणती कारवाई केली ? म्हणून या औचित्याच्या मुद्याद्वारे या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते की, या महत्वाच्या प्रश्नाकडे ज्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुर्लक्ष केले त्या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे. उच्च न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत की, कोणत्याही परिस्थितीमध्ये भारनियमनाचा फटका विद्यार्थ्यांना बसता कामा नये. अजूनही शालेय विद्यार्थ्यांच्या काही परीक्षा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा बाकी आहेत. उपसभापती महोदय, आपण महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांना संरक्षण मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून लक्ष घालावे आणि या बाबतीत कडक कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे.

उपसभापती : यापूर्वी मागील अधिवेशनामध्ये देखील हा पश्न चर्चिला गेला होता. त्यावेळी सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनंतर मी शासनाला यासंदर्भात निर्देश देखील दिले होते. अर्थात त्यावेळी दिलेले निर्देश हे आयत्या वेळी दिलेले होते त्यामुळे कदाचित त्यांची अंमलबजावणी होऊ शकली नसेल. विद्यार्थ्यांच्या जेव्हा परीक्षा असतात त्यावेळी किमान वीज जाऊ नये अशा प्रकारचे निर्देश मी दिले होते. ते निर्देश माझ्या अजूनही स्मरणात आहेत. कधी कधी या ठिकाणी निर्देश दिल्यानंतर त्यावर टीकाटिपणीही झाली. परंतु जनहितार्थ जे काही निर्देश दिले गेले त्यावर झालेल्या टीकाटिपणीची मी कधी क्षिती बाळगली नाही. मी या ठिकाणी दिलेल्या दोन-तीन निर्देशांची सभागृहाला जाणीवही करुन देईन की, ते निर्देश न्यायालयाने देखील नंतर उचलून धरले आणि त्यामधील हा एक निर्देश आहे. आता 10वी आणि 12वीच्या परीक्षा जवळपास आटोपल्या आहेत. परंतु बाकीच्या महाविद्यालयीन आणि अन्य परीक्षा अजूनही शिल्लक आहेत. परीक्षेच्या काळामध्ये वीज पुरवठा खंडित होऊ नये अशा प्रकारच्या सूचना यापूर्वी मी दिल्या आणि न्यायालयाने देखील त्या दिल्या. मला असे वाटते की, ज्या ठिकाणी वीज पुरवठा खंडित होणारच आहे याची खात्री आहे त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. पहिली गोष्ट अशी आहे की, वीज मंडळाचे अधिकारी हे पूर्ण माहितीनिशी येत नाहीत हा माझा स्वत:चा अनुभव आहे. या परीक्षेच्या काळात मी स्वत: दोन-तीन वेळा हा अनुभव घेतलेला आहे. या संदर्भात मी स्वत: मागणी केलेली होती आणि त्याबाबतीत मिटींगही बोलाविण्यात आलेली होती. परंतु मिटींगमध्ये कबूल करुन देखील असे प्रकार घडलेले आहेत त्याबद्दल मी या ठिकाणी निश्चितपणे खेद व्यक्त करतो. या ठिकाणी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून जो मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे त्याची शासनाने दखल घ्यावी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती...)

आणि परीक्षेच्या काळामध्ये परीक्षा केन्द्रावरील वीज जाऊ नये ही जशी एमएसईबीची जबाबदारी आहे तशी ती शिक्षण संस्थाचालकांची देखील जबाबदारी आहे. त्यामध्ये कोणी कसूर केली तर त्यांना कुठल्याही प्रकारे क्षमा करता कामा नये. याबाबतीत एक-दोघांना जरी शासन झाले तरी बाकीचे याबाबतीत निश्चितपणे अंमलबजावणी करतील. कृपया शासनाने याची गंभीर दखल घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यात अतिशय गंभीर घटना घडलेली आहे, त्या अनुषंगाने मी औचित्याचा मुद्दा या ठिकाणी मांडतो आहे. ज्यावेळी इंग्रजांच्या काळात क्रांतीकारांनी आंदोलन सुरु केले त्यावेळी "लहुजी राऊत" यांनी मोठा सक्रीय सहभाग घेतलेला आहे. "लहुजी राऊत" सारख्या क्रांतीकारकांनी इंग्रजा विरुध्द ठराव करण्यासाठी येरवडयाच्या जंगल परिसरामध्ये सशस्त्र तुकडया तयार केल्या. "जगेन तर देशासाठी व मरेन तरीही देशासाठी " अशा प्रकारचा मंत्र ज्या क्रांतीकारकांनी देशात आणि राज्यातील जनतेला दिला. अशा क्रांतीवीर "लहुजी राऊत" यांची समाधी दिनांक 16 फेब्रुवारी 2009 रोजी साईरामा हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक श्री. सदानंद शेट्टी यांनी उद्ध्वस्त केली. ही समाधी 1881 या वर्षी बांधलेली होती. जवळपास दीडशे वर्षापूर्वीची ही समाधी होती. एवढी जुनी समाधी एक हॉटेल मालक तोडतो, क्रांतीकारकांचा अवमान करतो ही बाब अतिशय खेदजनक आहे. त्या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले आहेत. तसेच या घटनेच्या बाबतीत विधानभवनावर मोर्चा काढण्यात आला होता. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, त्या ठिकाणी "लहुजी राऊत" यांची समाधी ज्या जागेवर होती, ती जागा शासनाने अधिग्रहीत करुन तेथे नव्याने समाधी बांधून इंग्रजा विरुध्द लढलेल्या एका क्रांतीवीराचा सन्मान करावा अशी या माध्यमातून मी शासनास विनंती आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्यात तथ्य आहे. ती समाधी उद्ध्वस्त केल्यानंतर मी स्वत: त्या ठिकाणी व्हीजीट करण्यासाठी गेलो होतो. क्रांतीवीर "लहुजी राऊत" यांची त्या ठिकाणी नव्याने समाधी व्हावी अशी भावना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व्यक्त केलेली आहे. त्या ठिकाणी खाजगी विकासकाची जागा जिल्हाधिका-यांच्या मार्फत अधिग्रहीत करुन तेथे चांगले स्मारक होईल अशी योजना शासन करीत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती फौजिया खान : उप सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा यह है कि, हाल ही में नांदेड़ में शिव जयंती के अवसर पर जुलूस निकाला गया था. जुलूस के दौरान दो समाजों में आपस में टकराव पैदा हो गया था. उस समय पुलिस ने एक समाज को टार्गेट किया था. उस समय पुलिस ने कुछ दुकानों को तोड़ा. कुछ पुलिसवालों ने मस्जिद में जूते पहन कर घुसकर महिलाओं और बच्चों को मारा. पुलिस ने सैकड़ों घरों में घुसकर मारपीट की और अत्याचार किए. इसलिए मेरी यह मांग है कि इस मामले की न्यायालयीन जांच की जाए. इस घटना की सीडी और अन्य मटेरियल मेरे पास है.

उप सभापति : आप वह सीडी और मटेरियल मुझे दीजिए.

श्रीमती फौजिया खान : उप सभापति जी, मैं यह सीडी और मटेरियल आपको देती हूं. इस सिलसिले में माननीय सदस्य श्री कमल किशोर कदम जी ने माननीय सभापति जी से बातचीत की है. मेरी यह मांग है कि इस मामले की न्यायालयीन जांच की जाए.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रिसिझ्रीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या औचित्याच्या मुद्याकडे मी आपले लक्ष केंद्रीत करु इच्छितो आणि आपले अभिनंदन करतो. एका 90 वर्षे वयाच्या महिलेला न्याय देण्यासाठी केलेली विनंती आपण अनेकदा मान्य केली. मलकापूर, जि.अकोला येथील श्रीमती शकुंतला कोठारी या महिलेची 20.5 एकर जमीन म्हाडाने 1.11 लाख रुपये देऊन संपादित केली. त्या महिलेचे वय आज 90 वर्षाचे आहे. फक्त 4245 चौरस मीटर जागा दोन अटींवर देण्याचे म्हाडाने मान्य केले. पहिली अट अशी होती की, त्या महिलेने कोर्टातील प्रकरण मागे घ्यावे आणि दुसरी अट अशी होती की, शासनाकडे म्हणजे पर्यायाने म्हाडाकडे 14.76 लाख रुपयांचा भरणा करावा. या महिलेने कोर्टातील प्रकरण मागे घेतले व 14.76 लाख रुपये म्हाडाकडे भरले. त्यानंतर म्हाडाने ठराव पारित केला. म्हाडाच्या उपसभापतीनी सांगितले की, सर्व अटींची पूर्तता झाली आहे त्यामुळे ही जागा परत करावी. असे असूनही अद्याप जागा परत करण्यात आलेली नाही. हा मुद्दा याच सभागृहात यापूर्वी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून, विशेष उल्लेखाच्या माध्यमातून व लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मागील तीन वर्षाच्या काळात उपस्थित झालेला आहे.

सभापती महोदय, आपण सभापतीस्थानी असताना सुस्पष्ट निर्देश दिले होते की, ही जागा या महिलेला परत करण्यात यावी.

उपसभापती : मला आपला औचित्याचा मुद्दा कळला आहे. श्रीमती शकुंतला कोठारी या 90 वर्षे वयाच्या महिलेच्या जमिनीसंदर्भात मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना चर्चेसाठी माझ्या दालनात बोलावले होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया हे देखील त्याठिकाणी उपस्थित होते. त्या बैठकीत हेही ठरले की, सदरहू प्रकरणी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर ताबडतोब चर्चा होऊन यांना निश्चितपणे निर्णय द्यावा. हा निर्णय अत्यावश्यक आहे. त्या खात्याचे संबंधित मंत्री हे माननीय मुख्यमंत्री असल्यामुळे तो निर्णय त्यांनी घेणे क्रमप्राप्त आहे. सभागृहात एखाद्या बाबीवर बाब एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर पाच-सहा वेळा चर्चा होते, माझ्या दालनात बैठक घ्यावी लागते. उठसूठ माझ्या दालनात अशा प्रकरणांबाबत बैठक घेणे मला देखील योग्य वाटत नाही. सभागृहात एखाद्या प्रकरणी चर्चा झाली आणि सुस्पष्ट निर्देश दिलेले असतील किंवा जी चर्चा झाली असेल त्या चर्चेच्या अनुषंगाने संबंधित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

खात्याने ताबडतोब पावले उचलणे हे त्या खात्याचे कर्तव्य आहे. याबाबत अद्याप निर्णय न होणे हे शासनाला फारसे भूषणावह नाही. आचारसंहितेचा काळ असल्यामुळे कदाचित शासनाला निर्णय घेणे अवघड जाईल. परंतु हा आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर किंवा ही बाब आचारसंहितेचा भंग करणारी नसेल तर 15 दिवसात या प्रकरणाची तड माननीय मुख्यमंत्री स्तरावर लावावी आणि श्रीमती शकुंतला कोठारी या महिलेला निश्चितपणे न्याय द्यावा. त्यांची जमीन गृहनिर्माण विभागाने घेतली होती. ती जमीन परत मिळावी म्हणून त्यांनी म्हाडाकडे पैसे भरले आहेत. म्हाडाने पैसे घेतले परंतु जमीन अद्याप परत दिलेली नाही. या सगळ्या बाबी अत्यंत गैर आहेत. म्हणून श्रीमती शकुंतला कोठारी या महिलेला न्याय देण्याच्या संदर्भात मी शासनाला सुस्पष्ट निर्देश देत आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : होय.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी अत्यंत महत्वाच्या आणि गंभीर विषयाकडे आपले आणि सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर हा भाग दिवसेंदिवस विकसित होत आहे. लोकसंख्या वाढत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या भागामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या संदर्भात अनेकवेळा चर्चा करुन, अनेकवेळा मागणी करुन, निवेदन देऊनही कोणत्याही प्रकारचा दिलासा या भागातील नागरिकांना मिळालेला नाही. म्हणून या भागामध्ये राहणारे नागरिक पाणी टंचाईमुळे प्रचंड त्रस्त आहेत. त्यांच्या मनामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्याचा केव्हाही स्फोट होऊ शकतो. दुर्दैवी घटना घडू शकते. म्हणून लोकक्षोभ थांबविण्यासाठी पाणी टंचाईचा हा प्रश्न तातडीने सुटावा यासाठी आपण या प्रकरणात लक्ष घालण्याची आणि शासनाला निर्देश देण्याची गरज आहे. म्हणून मी विनंती करतो की, या महत्वाच्या विषयावर आपण तातडीने शासनाला निर्देश द्यावेत.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य प्रा. रामनाथ मोते यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला त्याच मुद्याच्या अनुषंगाने मला अशी सूचना करावयाची आहे की, याच परिसरात कोकणातील विशेष करुन चिपळूण व रत्नागिरीमधील असंख्य नागरिक राहतात आणि त्यांच्याकडून देखील अनेक तक्रारी आपल्यापर्यंत आल्या आहेत. यासंदर्भात शासनाने गांभीर्याने व तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य प्रा. रामनाथ मोते यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केला त्यासंदर्भात गेले दोन चार दिवस सातत्याने वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत. या भागातील पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अतिशय स्फोटक बनलेली आहे. याची मलाही कल्पना आहे. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या दोन तीन महिन्यात या सर्वच भागातील लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी एक बैठक घेतली होती व त्या बैठकीत काही उपाययोजनाही सुचविलेल्या होत्या. मीरा-भाईंदर येथे जी पाण्याची भीषण परिस्थिती होती ती परिस्थिती आपणा सर्वांना आठवतच असेल. त्या भागात पिण्याच्या पाण्यावरुन दंगली पेटल्या होत्या आणि त्यावेळी राज्यशासनाचे व जनतेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अशीच परिस्थिती या भागात सुध्दा निर्माण झाली याची मला जाणीव आहे. म्हणून यासंबंधी ठोस उपाययोजना व्हावी या अनुषंगाने काही गोष्टी मला निश्चितपणे सुचवाव्याशा वाटतात. माझ्या असेही निदर्शनास आले आहे की, शासनाच्या विविध संस्थांमार्फत जो पाणीपुरवठा या परिसरात केला जातो तो तेथील स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून होतो. आणि त्यांच्याकडे असलेली वितरण व्यवस्था ही तशी सदोष आहे. पहिली गोष्ट म्हणजे शासनाकडून या संस्थांना जो पाण्याचा कोटा मंजूर आहे तो कोटा काही ठिकाणी कमी आहे म्हणून तो वाढवून देण्याची गरज आहे. तसेच वाढवून दिलेला कोटा जनतेपर्यंत व्यवस्थित पोहचणेही तितकेच आवश्यक आहे. यासाठी दोन्ही यंत्रणांनी येत्या दोन दिवसात एकत्र बसून याबाबत ठोस उपाययोजना आखावी व त्याची अंमलबजावणी करावी. मागील काळात एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांबरोबर मी चर्चा केली असता मला त्यांच्याकडून असे सांगण्यात आले होते की, त्यांच्याकडील जलवाहिन्या व पंप नादुरुस्त आहेत ते दुरुस्त होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना बोर्डाची मंजुरी घ्यावी लागेल. अशा सर्व गोष्टींना वेळ लागेल आणि त्याचा परिणाम या परिस्थितीत भर टाकण्यात होऊ शकतो. अशा प्रकारे नाहक व कारण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

नसतांना या भागातील पाण्याची परिस्थिती गंभीर होऊ शकते म्हणून दोन्ही यंत्रणांनी एकत्र बसून याबाबत ठोस उपाययोजना आखावी. जेणेकरुन तेथील जनतेचे हाल संपुष्टात येतील आणि ही ठोस उपाययोजना ताबडतोब अंमलात आणावी. त्याचप्रमाणे जांभुळ तलाव आणि शहाड अशा दोन्ही ठिकाणाहून जे पंपिंग होते त्यात शहाड येथील पपिंगची क्षमता संपलेली असल्यामुळे जांभुळचे पाणी पंपिंग करुन शहाडसाठी पाठविता येईल अशा प्रकारची उपाययोजना आखणेही आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्या व्यतिरिक्त यामध्ये शासनानेही हस्तक्षेप करण्याची गरज आहे. जर राज्यशासनाने हस्तक्षेप केला नाही तर ही परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून मी या निमित्ताने शासनाला आणि संबंधित विभागाला असे सुस्पष्ट निर्देश देऊ इच्छितो की, यासंदर्भात तातडीने लक्ष घालून सर्व संबंधित यंत्रणांची बैठक बोलवावी व ठोस उपाययोजना सुचवावी. तसेच राज्यातील अन्य भागात तीव्र पाणी टंचाई जाणवू लागलेली आहे त्याचादेखील राज्य शासनाने गांभिर्यपूर्वक विचार करावा आणि आवश्यक ती उपाययोजना करावी. शासन योजीत असलेल्या उपायांबाबतची माहिती जनतेला अवगत करावी.

श्री. चंद्रकांत हंडोरे : महोदय, हे खरे आहे की, मुंबईबाहेरील लगतची शहरे झपाट्याने वाढत चालली आहेत आणि या शहरांचा पाण्याचा प्रश्न बिकट होऊ लागला आहे. ज्याप्रमाणे नवी मुंबईचा प्रश्न मोरांबे धरण बांधून सोडविण्यात आला. मीरा-भाईंदरचा प्रश्न आपण सूर्या प्रकल्पाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर या ठिकाणच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत देखील शासन गांभीर्याने विचार करीत आहे आणि या शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा योग्य प्रकारे कसा होईल यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या सदनामधील पीठासीन अधिकारी हे पद सर्वोच्च आहे पीठासीन अधिका-याचे पद आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ व सर्वोच्च असल्यामुळे व त्या पदाबाबत एखादी गोष्ट घडणे हे आम्हाला असहय होणारे, यातना देणारे ठरेल. आता आपण पीठासीन अधिकारी म्हणून आम्हाला न्याय देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. गेल्या पधंरा दिवसापासून, महिन्यापासून आपण कल्याणचे हितचिंतक तसेच कल्याणचे खासदारकीचे उमेदवार असल्याचे आम्ही टीव्ही वरुन पाहत आलेलो आहे. आपण त्या भागातील गोष्टीच्या संदर्भात विस्तृतपणाने सुस्पष्ट निदेश दिलेले असल्या कारणाने आचार संहितेचा कोणताही दोष श्री. वरुण गांधी सारखा आपल्यावर झाला तर आम्हाला तो यातना दायक होईल एवढेच मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

उप सभापती : भुकेलेल्या माणसाला अन्न आणि तहानलेल्या माणसाला पाणी देणे हे तुमचे आणि आमचे परम कर्तव्य आहे. शेतक-यांचे प्रश्न सभागृहात उपस्थित झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रावतेसाहेब पोटतिडकीने शेतक-यांचे प्रश्न मांडत असतात. शेतक-यांच्या प्रश्नावर अनेक मार्गाने काम करणारे संपूर्ण महाराष्टातील आपणच एकमेव राजकारणी आहात असे वाटते. आपण शेतक-यांना न्याय मिळण्यासाठी दिंडी काढता, किंवा पोटतिडकीने काम करता, तुमच्या पायाला आलेले फोड आम्ही पाहिलेले आहे. तुमच्या पायाला आलेल्या फोडांच्या वेदना तुम्हाला जरी झ ालेल्या असल्या तरी त्या वेदना आम्हालाही झालेल्या आहेत. मराठीत असे एक गाणे आहे की, "हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे, हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे." सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांच्या कार्याचा मी यथोचित गौरव करतो. आपल्या पावलावर पाऊल टाकून काम करण्याचा प्रयत्न मी करीत आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाच्या संदर्भात आचार संहितेचा भंग तर सोडाच परंतु आचार संहितेचेच आपण पालनच करीत आहोत. पाण्याच्या प्रश्नाबाबत कोठेही आचार संहिता लागू होत नाही. जनतेलाच नव्हे तर विरोधकाना देखील पाणी पाजण्यासाठी कोणतीही आचार संहिता नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सर्व सन्माननीय सदस्यांना मी औचित्याचे मुद्दे मांडण्याची आज संधी देणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती :सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी औचित्याच्या मुद्या द्वारे आपले आणि सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. नव्या मुंबईला मुंबईची जुळी बहीण म्हटले जाते. मुंबईची जुळी बहीण म्हणून आपण नव्या मुंबईचा विकास केलेला आहे. मुंबईची लोकसंख्या वाढत होती व मुंबईची लोकसंख्या कमी व्हावी म्हणून आपण नव्या मुंबईचा विकास केला. नवी मुंबई निर्माण होत असतांना अनेक प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी नव्या मुंबईच्या निर्मितीसाठी दिल्या गेल्या. नव्या मुंबईचा सिडको आणि एमआयडीसीने विकास केलेला आहे. मला या विषयाच्या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे की, नव्या मुंबईतील कुक्षेत या एकमेव गावाचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. कुक्षेत गावाचे पुनर्वसन एमआयडीसीने भूखंड देऊन केलेले आहे. सिडकोने प्रकल्पग्रस्तांना 12.5 टक्क्याने भूखंड दिल्यामुळे त्या शेतक-यांचा फायदा झालेला आहे. एमआयडीसीने जमीन घेऊन कुक्षेत गावाचे पुनर्वसन केले. त्यावेळेस त्याच्या आजूबाजूला कुठेही जमीन नव्हती. हे प्रकल्पग्रस्त त्या ठिकाणी खुराडया सारख्या घरामध्ये राहत आहेत. या कुक्षेतमधील लोकांवर फार मोठया प्रमाणात अन्याय झालेला आहे. कुक्षेत गावातील जनता गेल्या 11 वर्षापासून न्यायासाठी भांडत आहे. या ठिकाणच्या जनतेने कालच माझ्या सोबत नगरविकास खात्याच्या मंत्र्यांची भेट घेतलेली आहे. कुक्षेत गावातील रहिवाश्यांना शहरी भागाचा कमर्शिअल प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात आलेला आहे. शहर विभागाचा प्रॉपर्टी टॅक्स या ठिकाणच्या गावठाण भागाला लावल्यामुळे गेल्या 10-12 वर्षापासून हे लोक प्रॉपटी् टॅक्स भरत नाहीत. प्रॉपटी टॅक्सची रक्कम प्रत्येक रहिवाश्याला एक ते दीड लाखाच्या आसपास आलेली आहे. या ठिकाणच्या लोकांना कोणत्याही प्रकारचा रोजगार नाही. या ठिकाणच्या लोकांच्या जमिनी गेलेल्या आहेत. या ठिकाणच्या लोकांना वाढीव जागा नाही, सिडको सारखा एमआयडीसीने या लोकांना 12.5 टक्क्याचा भूखंड सुध्दा दिलेला नाही. तसेच या लोकांच्या नावे त्यांची घरे सुध्दा नाहीत. बँकेचे कर्ज काढून हे लोक घरे सुध्दा बांधू शकत नाहीत. या ठिकाणच्या जनतेला कोणत्याही प्रकारची सुविधा मिळत नाही. या जनतेला गणपती विसर्जनासाठी तलाव नाही, भाजी मंडई नाही, स्मशान भूमी सुध्दा नाही. स्मशान भूमीचा प्लॉट होता परंतु तो प्लॉट सुध्दा बिल्डराला देण्यात आलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

आहे. कुक्षेत गावातील लोकांना आपण न्याय द्याल अशी मला खात्री आहे. कुक्षेत गावातील लोकांना आज जो कमर्शिल प्रॉपर्टी टॅक्स लावला गेला आहे तो टॅक्स आचार संहिते नंतर, निवडणुकीनंतर कमी करावा व यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडून मागवून घेऊन या कुक्षेत गावातील जतनेला घरांची प्रमाणपत्रे त्वरित देण्यात यावीत अशी माझी शासनाला विनंती आहे. या ठिकाणी नगर विकास खात्याचे मंत्री महोदय उपस्थित आहेत त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय नगरविकास खात्याच्या मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले तर अधिक चांगले होईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मला यासंबंधी निवेदन दिलेले आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर याबाबत बैठक घेण्याचे मी मान्य केलेले आहे.

.....

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यातील आमगावमध्ये 48 गावांची पाणी पुरवठा योजना आहे. ही योजना अद्यापि सुरू झालेली नाही. गावात पाणी टंचाई असल्यामुळे पाणी पुरवठा योजनासंबंधी ताबडतोब कारवाई करावी असे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत. माननीय पालकमंत्री श्री.नाना पंचबुद्धे यांनी सुद्धा अधिकाऱ्यांना निदेश दिलेले आहेत. अजून पर्यंत 48 गावांची पाणी पुरवठा योजना सुरू झालेली नाही. शुद्ध जल सर्वसामान्य माणसांना मिळाले पाहिजे. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे सदर पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासंबंधी आपण आदेश देऊन योजना सुरू करावी म्हणून मी औचित्याचा मुद्दा मांडला आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी आता औचित्याचा मुद्दा मांडला आहे. मी सुस्पष्ट सांगू इच्छितो की, यासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. ही योजना ताबडतोब कार्यान्वित होणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी की, आता उन्हाळा आला असल्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये पाण्याची भीषण टंचाई जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मला माननीय जलसंपदा मंत्रिमहोदयांना सूचना करावीशी वाटते की त्यांनी यासंबंधी राज्य पातळीवर योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने ठोस उपाययोजना अंमलात आणाव्यात. सन्माननीय सदस्यांनी 48 गावांच्या पाणी योजनेचा मुद्दा येथे उपस्थित केला. ज्या खात्याकडे ही योजना अजूनही प्रलंबित आहे,त्यांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असल्यामुळे तातडीने पावले उचलून महिन्याभरात योजना कार्यान्वित करावी अशी सूचना मी करीत आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : होय.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. विषय अत्यंत गंभीर आहे. राज्यामध्ये इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. कॉपीला प्रतिबंध असला पाहिजे, याबद्दल आमचे दुमत नाही. कॉपी होऊ नये म्हणून सर्व शिक्षकांचा पाठिंबा आहे. कॉपीला प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणा ज्या पद्धतीने परीक्षा केंद्रावर जात आहे, ती पद्धत चुकीची आहे. परीक्षा केंद्रावर पोलीस परीक्षा कक्षामध्ये जातात आणि विद्यार्थ्यांना उभे करून त्यांची झडती घेतात. खरे म्हणजे परीक्षा कक्षातील विद्यार्थ्यांची झडती घेण्याचा अधिकार पोलिसांना नाही. बाहेरचा जो मॉब आहे, त्याला... (अडथळा) मी काय बोलत आहे, त्याकडे सन्माननीय सदस्यांनी लक्ष द्यावे. कॉपी होऊ नये, कॉपीला प्रतिबंध असावा या मताचे आम्ही आहोत. पोलिसांनी विद्यार्थ्यांची परीक्षागृहात तपासणी करणे हे कुठल्याही कायद्यात बसत नाही. जे हुशार विद्यार्थी पेपर लिहित असतात त्यांना या प्रकारामुळे त्रास होतो. असा प्रकार अनेक केंद्रावर सुरू आहे. एवढेच नव्हे तर बीड जिल्हाधिकाऱ्यांनी विषय शिक्षकांना दिवसभर तहसीलदार कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश काढले आहेत. येथे शिक्षण राज्यमंत्री उपस्थित आहेत. कॉपीला प्रतिबंध असला पाहिजे. आमच्यावर शासनाचा विश्वास नसेल तर संपूर्ण परीक्षेची जबाबदारी महसूल आणि पोलीस यंत्रणेवर टाकावी.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर स्कायवॉकचे (आकाशमार्गिकेचे) काम सुरू आहे. कारण नसताना मुंबई 50 स्कायवॉकचे काम प्रस्तावित आहे. यासंबंधी लोकांचा विरोध दिवसेंदिवस वाढत आहे. कारण नसताना स्कॉयवॉक बांधले जात आहेत.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

सभापती महोदय, एका स्काय वॉकसाठी 20 ते 25 कोटी रुपये खर्च होत असतात आणि त्या स्कायवॉकचे डिझाईन तयार करण्यासाठी डिझाईन कंत्राटदाराला 2 कोटी रुपये दिले जातात. अशा प्रकारे मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए.कडून आणि मुंबईच्या बाहेर रस्ते विकास महामंडळाकडून डिझाईन करण्यासाठी कंत्राटे दिली जातात. ज्या भागात स्कायवॉक बांधण्यात येणार आहे त्या भागातील लोकांचे , व्यापा-यांचे, वाहतुकीचे जे प्रश्न आहेत ते विचारात घेतले जात नाहीत आपले प्रश्न मांडण्यासाठी जेव्हा हे लोक एम.एम.आर.डी.ए.च्या कार्यालयात जातात तेव्हा हल्ला केला म्हणून आयुक्त श्री.रत्नाकर गायकवाड त्यांना तुरुंगात पाठवतात .ही पध्दत बरोबर नाही. सांताक्रुझ ा, मुलुंड इत्यादी ठिकाणी स्कायवॉकला मोठया प्रमाणावर विरोध केला जात आहे...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काल अर्थसंकल्पावर बोलत असतांना हाच मुद्दा मांडला होता.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, मी जरी काल हा मुद्दा मांडला असला तरी त्यासबंधी मला उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. मुलुंड येथील स्कायवॉकच्या संदर्भात तेथील लोकांनी विरोध केलेला असून मुलुंड बंद ठेवण्यात आले होते. तेव्हा स्कायवॉकच्या कामाचे जे कंत्राट देण्यात आलेले आहेत त्याची चौकशी करण्यात यावी

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे माझे जवळचे मित्र आहेत.

श्री.दिवाकर रावते : ते आपल्या किती जवळचे मित्र आहेत ?

श्री.भास्कर जाधव : ते खूपच जवळचे मित्र आहेत परंतु ते ज्या विषयासंबंधी औचित्याचा मुद्दा मांडत आहेत तोच विषय त्यांनी काल अर्थसंकल्पावर बोलत असतांना मांडला होता असे असतांना 24 तासाच्या आत पुन्हा त्याच विषयाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा कसा होऊ शकतो. औचित्य कशाला म्हणावयाचे ? जो विषय अन्य कोणत्याही मार्गाने उपस्थित करता येत नाही तो विषय औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित करता येतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण ज्येष्ठ सदस्य असून दोघेही जण एकमेकांचे चांगले मित्र आहात ही गोष्ट तुम्ही माझ्या निदर्शनास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणून दिली आहे तेव्हा या औचित्याच्या मुद्याबाबत अधिक बोलून मी सभागृहाचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. दोघांनी सभागृहाच्या बाहेर जाऊन औचित्याच्या मुद्याबाबत ठरवावे .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. त्यासंबंधीचे उत्तर मला मिळालेले नाही. आज अधिवेशन संपणार आहे.

उपसभापती : याबाबत मी शासनाला योग्य त्या सूचना देईन.

डॉ.दीपक सावत : पत्र दिल्यानंतरसुध्दा उत्तर दिले जात नाही.

उपसभापती: औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी आपल्याला परवानगी दिली होती त्याप्रमाणे आपण औचित्याचा मुद्दा मांडला असून याबाबत शासनाला सूचना देतो असे मी सांगितले आहे.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, मी आपला आभारी आहे.

उपसभापती : यानतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यानी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाण्यातील राबोडी भागामध्ये 17 मार्च 2009 रोजी दंगल झाली होती. तसेच नवरात्रीच्या काळात राबोडी भागात दंगल झाली होती.अनेक वर्षे दंगल न झालेला जो भाग होता त्या ठिकाणी लागोपाठ दंगल झाली होती. अपघातामुळे बोलाचाली होऊन दंगल झाली असे पोलिसांनी सांगितले होते. ज्यावेळी तेथे दंगल झाली होती त्यावेळी माझ्यासारखा लोकप्रतिनिधी रात्रीच्या वेळी तेथे जाण्यास निघाला असतांना आचारसंहितेचे कारण दाखवून तुम्ही तेथे जावू शकत नाही तसेच पोलीस स्टेशनमध्येसुध्दा जाऊ शकत नाही असे मला पोलीस आयुक्तालयातील ॲडिशनल कमिशनरने सागितले होते. दंगल झाल्यानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी लोकप्रतिनिधींना जाऊ दिले जात नसेल तर शासनाने त्या अधिका-याची चौकशी करावी. आचारसंहितेच्या नावाखाली त्या ठिकाणी आणि पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी मला मज्जाव केला होता. या निमित्ताने मला असे सांगावयाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

आहे की, ठाणे येथे जी दंगल झाली होती त्या अनुषंगाने अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात. पोलिसांनी दोन तासात ही दंगल आटोक्यात आणली असली तरी या दंगलीच्या पाठीमागची पाळेमुळे अतिशय गंभीर स्वरुपाची आहेत. या प्रकरणातील रिक्षावाल्याला 48 तास उलटून गेल्यानंतर अजूनही पकडण्यात आलेले नाही. या दंगलीच्या काळात शेकडो लोक एकत्र कसे जमले, त्यांनी कशा प्रकारे गाडया जाळल्या, त्यांनी दगडफेक कशा प्रकारे केली आणि जाळपोळ कशी केली यासंबंधीच्या प्रश्नांची ` उत्तरे अजूनही अनुत्तरित आहेत वेळोवेळी दंगल

झाल्यानंतर दंगल शमविण्याचे काम पोलिसांनी केले आहे परंतु दंगल का होते याच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. अनेक प्रश्नाची उत्तरे अनुत्तरित आहेत. दंगलीच्या वेळी वापरण्यात आलेली शस्त्रे त्यांच्याकडे कशी येतात ? सोडा वॉटरच्या बाटल्या त्यांच्याकडे कोठून येतात ...

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

त्याची माहिती गृह खात्याला कशी मिळत नाही? या घटना यापुढील काळात टाळता आल्या पाहिजेत. यापुढील काळात देखील त्याठिकाणी रक्तपात होईल अशाप्रकारची भीती समाजामध्ये व्यक्त केली जाते. अशाप्रकारची तेढ समाजा-समाजामध्ये निर्माण होऊ नये म्हणून काळजी घेण्याची आवश्यकता आहे. जे चांगले काम करणारे लोक आहेत अशा इनोसंट लोकांवर सुध्दा दंगलीच्या नावाखाली केसेस भरण्यात आल्या आहेत. आणि म्हणून या प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन या दंगलीची पाळेमुळे बाहेर काढली पाहिजेत अशाप्रकारची मागणी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे करीत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे...

उपसभापती : नियमाप्रमाणे चार ते पाच माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे उपस्थित करता येत असतांना मी अनेक माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यास परवानगी दिली आहे. तेव्हा मी आता ही औचित्याच्या मुद्दयांवरील चर्चा थांबवीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच औचित्याच्या मुद्दयाकरिता हात वर केला होता...

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याच्या मुद्दयाव्दारे मंत्रिमंडळातील एका मंत्रिमहोदयांच्या बेशिस्त वर्तनाबाबतची बाब सभागृहाच्या लक्षात आणून देत आहे. या मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांनी काल नागपूर येथे एका पोलीस अधिकाऱ्याला शिवीगाळ गेली. त्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्याने संबंधित मंत्र्यांविरुध्द सूमोटो स्वत:हून गुन्हा दाखल केला आहे एवढी ही गंभीर बाब आहे. लोकप्रतिनिधींचे वर्तन पोलीस एका मर्यादेपर्यंत सहन करतात, परंतु मर्यादेचे उल्लंघन झाल्यानंतर तेच पोलीस गुन्हा दाखल करतात अशाप्रकारची ही गंभीर बाब आहे. त्या मंत्रिमहोदयांचे नाव श्री. अनिस अहमद असल्याचे जाहीर झाले आहे. सभापती महोदय, हे मंत्रिमहोदय एकदा कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुतळयाच्या चबुतऱ्यावर बूटासहीत चढले होते. याबाबत आक्षेप घेतल्यानंतर त्यांनी एका पत्रकाराचा अवमान केला होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते...

आणि ही बाब या सभागृहामध्ये देखील उपस्थित करण्यात आली होती. पोलीस अधिकाऱ्याला झालेल्या मारहाणीच्या संदर्भात या मंत्रिमहोदयांविरुध्द ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर आपल्याला अटक होऊ नये म्हणून मंत्रिमहोदयांनी हायकोर्टामध्ये जाऊन तात्पुरती स्थगिती मिळविली. आता ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये असून तो स्थगिती आदेश उठविण्यात आल्यास त्या मंत्रिमहोदयांना अटक होऊ शकते. सभापती महोदय, या सदनामध्ये त्यांच्या भ्रष्टाचारासंबंधी प्रश्न उपस्थित झाला असतांना मंत्रिमहोदयांनी सरळ सरळ त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांना तुम्ही माझे काहीही करु शकत नाही अशाप्रकारचे आव्हान दिले होते. अशाप्रकारे हे उद्दाम मंत्री बेफाम झाल्यासारखे वागत असतील आणि त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल होत असेल तर त्यांनी या मंत्रिमंडळामध्ये कशासाठी रहावे? हा गंभीर विषय आहे. ठाणे येथे झालेल्या दंगलीच्या वेळी ती दंगल शमविण्यासाठी जाणाऱ्या लोकप्रतिनिधींना आचारसंहितेचे कारण सांगून जाऊ दिले जात नाही. याठिकाणी या मंत्र्यांनी गाई खाल्ल्या, भ्रष्टाचार केला. हे कृषी खात्याचे मंत्री नाहीत. आणि गाई वाटप करणे हा कृषी खात्याचा विषय असतांना व तशाप्रकारचा जी.आर. निघाला असतांना या मंत्रिमहोदयांनी तो बदलायला लावून गाई खरेदी करण्यासाठी तो आपल्याकडे वळता करुन घेतला. त्याबाबतची कागदपत्रे आपल्याकडे आहेत. हे दोन्ही जी.आर. आपल्याकडे आहेत. अशाप्रकारची दादागिरी करुन हे मंत्रिमहोदय काम करीत असतील आणि जनतेमध्ये अशाप्रकारे उपद्रव निर्माण करीत असतील तर त्यांचा मंत्रिमंडळाने तात्काळ राजीनामा घेतला पाहिजे. माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांचा ताबडतोब राजीनामा घेण्यात यावा अशाप्रकारे आपल्यामार्फत या सभागृहाच्या माध्यमातून व औचित्याच्या मुद्दयाव्दारे माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. सभापती महोदय, आपण तशाप्रकारचे निदेश शासनाला त्वरीत द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एक अत्यंत महत्वाची घटना घडली आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांना एक मिनिटामध्ये औचित्याचा मुद्दा मांडण्यास आपण परवानगी द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सर्व औचित्याचे मुद्दे संपले असल्यामुळे मी आता कुणालाही परवानगी देणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांच्या राजीनाम्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी आपणास विनंती केली आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यासंदर्भात राज्य शासन योग्य तो निर्णय घेईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण तसे माननीय मंत्री महोदयांना सांगावे, म्हणजे ते उत्तर देतील.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय,होय.

उपसभापती : आता मी फक्त दोनच औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी देणार आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

उपसभापती : मी आता पुढील कामकाज पुकारणार आहे. औचित्याचे मुद्दे संपलेले आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे महत्वाचा मुद्दा मांडू इच्छितात. कृपया आपण त्यांना अनुमोदन द्यावे अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : मी अजून 5-10 औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी देणार नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, काल गंभीर घटना घडलेली आहे. त्या घटनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितात. आपण त्यांना परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदूर्गच्या किनारपट्टीवर परप्रांतातून आलेल्या सुमारे 200 मच्छिमारांच्या बोटी मच्छिमारी करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याबद्दल तेथील मच्छिमारांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.यासंदर्भात तेथील मच्छिमार कलेक्टर यांना भेटले. या मच्छिमारांनी परप्रांतीयांच्या 29 बोटी पकडून आणलेल्या आहेत. देवगड पोलीस स्टेशनच्या ठिकाणी 150 ते 200 मच्छिमार जमलेले आहेत. पण तेथील अधिकारी त्यांच्यावर केसेस दाखल करुन कारवाई करण्याच्या बाबतीत दिरंगाई करीत आहेत. सभापती महोदय, अशा परिस्थितीत आपण या मच्छिमार बोटींबाबत, त्यांच्या खलाशांवर केसेस दाखल करण्याच्या बाबतीत शासनाला आदेश किंवा सूचना देण्यात याव्यात अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, होय.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी अर्थसंकल्पाबाबत भाषण करीत असताना एक मुद्दा मांडला होता की, महाराष्ट्रातील जवळजवळ 50 टक्के शिक्षकांना अजूनपर्यंत फेब्रुवारी महिन्याचा पगार मिळालेला नाही आणि आज 19 मार्च तारीख आहे. जर 19 दिवस शिक्षकांचे पगार होत नसतील तर ही गंभीर बाब आहे. तसेच आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांचे डिसेंबर पासून पगार झालेले नाहीत. म्हणून आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांचे डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या तीन महिन्याचे पगार आणि शालेय शिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे फेब्रुवारी महिन्याचे पगार मिळण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सदनामध्ये काहीतरी सांगितले पाहिजे आणि याबाबतीत ठोस आश्वासन दिले पाहिजे.

उपसभापती : याबाबतीत राज्य शासनाने गंभीर दखल घेऊन शिक्षकांचे पगार वेळेवर देण्याच्या बाबतीत ताबडतोब तजवीज करावी असे मी सुस्पष्ट निर्देश देत आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, होय.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.मुंबई महानगरपालिके-तील तीन अभियंता म्हाडाच्या एस.आर.ए.योजनेमध्ये प्रति नियुक्तीवर नेमण्यात आलेले आहेत. त्यांना तेथे प्रमोशन दिले गेले. अशा वेळी म्हाडा, गृहनिर्माण विभाग आणि माननीय मुख्यमंत्री यांना अंधारामध्ये ठेऊन एस.आर.ए.चे प्रमुख श्री.श्रीकांत सिंह आणि पालिका आयुक्त यांनी त्यांना प्रमोशन दिले. एस.आर.ए.मध्ये अतिरिक्त अभियंता यांची संख्या खूप आहे. त्याठिकाणी प्रमोशन झालेले, प्रती नियुक्तीवर असलेले सहाय्यक गेल्या दोन वर्षापासून पगार घेत आहेत. त्यामुळे शासनाने याची गांभीर्याने नोंद घ्यावी की, म्हाडामध्ये आवश्यकता नसताना तीन अभियंत्यांना दोन वर्षे बसून पगार दिला जात आहे, हा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय,ऑल इंडिया एन्ट्रन्स एक्झॅमच्या बाबतीत सांगावयाचे

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर गेल्या वर्षी 36 हजार विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व्यवस्था नसल्यामुळे अन्य राज्यामध्ये जावे लागले होते.यावर्षी देखील परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणखी मोठी आहे.त्यामुळे महाराष्ट्र शासनाने याबाबतीत वेळीच प्रयत्न केले नाहीत तर विद्यार्थ्यांची अडचण होईल. कारण गेल्या वेळेस काही विद्यार्थ्यांना केरळमध्ये, काही विद्यार्थ्यांना जम्मू-काश्मिर मध्ये परीक्षेसाठी जावे लागले होते. यावर्षी विद्यार्थ्यांची संख्या 50 हजाराच्यावर असण्याची शक्यता आहे.त्यामुळे महाराष्ट्र शासनाने वेळीच केंद्र शासनाकडे प्रयत्न केले नाहीत तर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अन्य राज्यामध्ये जाऊन परीक्षा द्यावी लागेल अशी स्थिती आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ख्यातनाम चित्रपट निर्माते श्री.रामचंद्र तातोबा नायकवडी, रहाणार कापूसखेड, ता.वाळवा, जि.सांगली यांची जमीन हडप करण्यासाठी त्या गावातील एक गुंड श्री.जनार्दन पाटील याने त्यांच्या पत्नीला मारहाण करणे, मुलाचे गुप्त लिंग पिळून त्याला मारहाण करणे, त्याला बेशुध्द करणे, तसेच गेल्या चार वर्षापासून त्यांचा ऊस पळवून नेणे, तसेच गाव सोडून जाण्याची धमकी देणे वगैरे प्रकार घडत आहेत. या विरोधात त्यांच्या पत्नीने गेल्या चार दिवसापासून उपोषण सुरु केले आहे, त्याबद्दल पोलिसांनी त्यांना सक्तीने सिव्हील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलेले आहे आणि याबाबतीत कोणतीही दखल सुध्दा घेण्यात आलेली नाही. त्यामुळे श्री.रामचंद्र तातोबा नायकवडी यांना तातडीने न्याय मिळणे गरजेचे आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.वसंत पवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी शैक्षणिक क्षेत्राच्या संबंधातील औचित्याचा मुद्दा मांडत आहे की, देशामध्ये आणि राज्यामध्ये जी वसतीगृहे आहेत, त्या वसतीगृहांमध्ये बऱ्याच वेळेला रॅगिंगचे प्रकार होतात. त्यामुळे तेथील विद्यार्थी देखील आत्महत्या करीत आहेत. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण शासनाला निर्देश द्यावेत. रॅगिंगच्या बाबतीत केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा देखील कायदा आहे. या वसतीगृहातील जे रेक्टर्स्

. . . .झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत किंवा प्राचार्य आहेत किंवा संस्था चालक आहेत, त्यांनी तेथे ॲन्टी रॅगिंगच्या बाबतीत जास्तीत जास्त कडक उपाययोजना करावी आणि त्यामध्ये जर काही कुचराई झाली तर संबंधितांवर ताबडतोब कारवाई करण्याच्या बाबतीत आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी मागच्या अधिवेशनामध्ये एक बाब चर्चेला आणली होती. मंत्रालयात काम करणाऱ्या कक्ष अधिकाऱ्यांच्या सेवा ज्येष्ठतेबद्दल मी स्वत: शासनाला निर्देश दिले होते की, "माजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एखादी समिती नेमून त्यासंदर्भात अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करावी." त्यावेळी तत्कालीन अपर मुख्य सचिव श्री.सतीश त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली. बऱ्याचशा कक्ष अधिकाऱ्यांच्या भवितव्याचा तो प्रश्न आहे. त्याबाबतीत अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने जो अहवाल तयार केलेला आहे तो अहवाल त्यांनी शासनाला सादर केलेला असून तो शासनाने स्वीकारला असल्याची माझी माहिती आहे. त्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी शासनाने दोन महिन्याच्या कालावधीत करावी. समितीचा अहवाल आणि त्या संदर्भात केलेली कार्यवाही यासंदर्भातील सगळा तपशील पुढील अधिवेशनामध्ये शासनाने सभागृहाच्या माहितीसाठी अवगत करावा, अशा प्रकारची मी या ठिकाणी सूचना करतो.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी,सातवी, आठवी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी यादी मुद्रित स्वरुपात व सहावी, सातवी, आठवी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी यादी मुद्रित स्वरुपात व सहावी, सातवी, आठवी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे. सहाव्या, सातव्या आणि आठव्या यादीच्या मुद्रीत प्रती अद्याप मुद्रणालयाकडून आलेल्या नसल्यामुळे चक्रमुद्रित प्रती सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत. मुदित प्रती उपलब्ध झाल्यानंतर त्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्या)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सुरेश वरपुडकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील विविध भागात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या" या विषयावरील सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, अरुण गुजराथी, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता,नितीन गडकरी, सुरेश जेथलिया,डॉ. नीलम गोऱ्हे,श्री. किशनचंद तनवाणी वि.प.स. व श्री. सागर मेघे, माजी वि.प.स.यांच्या दिनांक 13 मार्च,2007 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 38321 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहती छापावी.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय विभाग) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2008 चा तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : माहिती आयोगाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती यांच्या निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम,2008 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक बीएनएम.2008/295/प्र.क्र.106/2008/नवि-32,दिनांकित 12 डिसेंबर,2008 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने वर्ष 2009-2010 चे लेखानुदानाचे नियोजन आणि वर्ष 2008-2009 मधील वितरीत तरतूद व डिसेंबर, 2008 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती :खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा (पुणे) सन 2004-2005 चा महालेखापाल,महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/

पृ.शी./मु.शी. : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

प्रा. बी. टी. देशमुख (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती :लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे

पृ.शी./मु.शी. : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा एकोणीसावा अहवाल (2008-2009) सभागृहाला सादर करतो.

उपसभापती :पंचायती राज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. / मु. शी. : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. / मु. शी. : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे

प्रा. सुरेश नवले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, समितीची बैठक बुधवार, दिनांक 18 मार्च, 2009 रोजी सायंकाळी 5.15 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये सर्वश्री महादेवराव महाडिक, गुरुनाथ कुलकर्णी व जगदीश गुप्ता, वि. प. स. यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री. महादेवराव महाडिक, वि. प. स. हे धाकट्या भावाच्या आजारपणामुळे दिनांक 28 मे ते 11 जून, 2004 पर्यंत 15 दिवस, वार्षिक धार्मिक उत्सवामुळे दिनांक 19 मार्च ते 16 एप्रिल, 2005 पर्यंत 29 दिवस, अतिवृष्टीमुळे मतदार संघात पूरग्रस्तांना सहाय्य व मदत कार्य करण्यासाठी दिनांक 11 जुलै ते 18 जुलै, 2005 पर्यंत 8 दिवस, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीमुळे दिनांक 18 मार्च ते 17 एप्रिल, 2006 पर्यंत 31 दिवस, धाकट्या भावाच्या आजारपणासाठी दिनांक 29 मार्च ते 17 एप्रिल, 2007 पर्यंत 20 दिवस, धार्मिक उत्सवामुळे दिनांक 26 जुलै ते 2 ऑगस्ट, 2007 पर्यंत 8 दिवस, वार्षिक धार्मिक उत्सवामुळे दिनांक 19 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर, 2007 पर्यंत 8 दिवस, श्री. गुरुनाथ कुलकर्णी, वि. प. स. हे प्रकृती ठीक नसल्यामुळे दिनांक 15 डिसेंबर ते 30 डिसेंबर, 2008 पर्यंत 16 दिवस व श्री. जगदीश गुप्ता, वि. प. स. हे पुतण्याच्या लग्नानिमित्त दिनांक 15 डिसेंबर ते 30 डिसेंबर, 2008 पर्यंत 16 दिवस विधान परिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याने त्यांनी केलेल्या अर्जावर समितीने विचार केला. तसेच विधान परिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्यासंबंधी त्यांनी रजेच्या अर्जात दिलेली कारणे ग्राह्य धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधान परिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

उपसभापती : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात सर्वश्री महादेवराव महाडिक, गुरुनाथ कुलकर्णी व जगदीश गुप्ता, वि. प. स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीसाठी विधान परिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी शिफारस केलेली आहे. तरी अनुमती आहे काय ? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

पृ. शी. / मु. शी. : तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, " मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रूषालय, प्रसूतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सुट, माफी इत्यादी आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकातील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करुन शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेली मुदत पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यापर्यंत वाढविण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "राज्यातील मुस्लीम समाजाचे शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करण्याबाबत" या विषयावर दिनांक 26 जुलै 2008 रोजी गठीत करण्यात आलेल्या तद्र्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेली मुदत पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक

मु.शी.: सन 2005चे वि.स.वि.क्रमांक 89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

श्री. चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन 2005चे वि.स.वि. क्रमांक 89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावर विचार करण्यासाठी दिनांक 17 एप्रिल 2007 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त वाढविण्यात यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासकीय विधेयकासंबंधी

श्री. दिवाकर रावते : उपसभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये विधेयकासंबंधी चर्चा झाली होती. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला आपण उपस्थित नव्हता. सचिव उपस्थित होते. हे अधिवेशन 4 दिवस असल्यामुळे विधेयके घेऊ नयेत अशी विनंती मी त्या बैठकीत केली होती. त्यावेळी मला असे सांगण्यात आले की, फक्त कामकाजपत्रिकेवर विधेयके दाखविण्यात येतील. सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी त्यावेळी असे सांगितले होते की, एखादे तातडीचे विधेयक असेल तर ते घेण्यात येईल. आता या ठिकाणी दाखविण्यात आलेले विधेयक बिलकूल तातडीचे नाही. मी कोणालाही घटनेतील तरतुदीची पायमल्ली करु देणार नाही. विधेयके घेऊ नयेत अशा प्रकारचा अधिकृत निर्णय असून तो मिनिटमध्येही आहे. तरीही विधेयक तातडीचे आहे असे शासनाचे म्हणणे असेल तर त्यावर चर्चा करण्याचा आमचा अधिकार आहे. तेव्हा यासंबंधी आपण निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. यासंदर्भात मी माननीय सभापतींना देखील भेटलो होतो आणि त्यांनी याबाबतीत, आपले ठरलेले आहे असे सांगितले. हे विधेयक कसे आहे हे मी चर्चा करताना सांगेन. हे विधेयक नंतर महानगरपालिकेच्या ताब्यात जाणार आहे. हे सभागृह चालवायचे असेल तर चालवावे. त्याबाबतीत माझे काही म्हणणे नाही. आम्हाला विधेयकावर बोलण्याचा अधिकार आहे. म्हणून यासंदर्भात आपण निर्देश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महत्वाची एक-दोन विधेयके चर्चेला घ्यावीत, ही गोष्ट मान्य केली आहे. आता राज्यात खरीप पिकाच्या लागवडीस सुरुवात होणार आहे. कापसाच्या बी.टी.बियाण्याची किमत 1800 रुपये होती. ती किंमत सरकारने 650 रुपयाने खाली आणली आहे. यासंबंधीचा अध्यादेश काढण्यात आल्यानंतर त्या अध्यादेशाचे रुपांतर कायद्यात करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले आहे.

श्री. दिवाकर रावते : या सरकारने तुम्हाला घटनेची पायमल्ली करण्याचे अधिकार दिले आहेत काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : यासंदर्भात आम्ही ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेतलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेतले आहे ते ओपिनियन आम्हाला वितरित करण्यात आलेले नाही. त्यांचे ओपिनियन आमच्यासमोर तुम्हाला ठेवावे लागेल. या ओपिनियनच्या बाबतीत आम्हाला अभ्यास करावा लागेल.

श्री. बाळासाहेब थोरात : ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेतलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : You have done a cheating in the Lower House.तुम्ही मला बोलावयास लावू नका. आपण विधानसभा सभागृहात माननीय विधानसभा अध्यक्षांना घटनेची पायमल्ली करण्यास भाग पाडले. ते सर्व मला बोलावे लागेल. सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये सह सचिव देखील उपस्थित होते. मी माझ्या हे मी माझ्या मनातले काही सांगत नाही, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत काय चर्चा झाली त्यासंबंधीची माहिती मी आपल्याला दिलेली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : मला विधेयक मांडू द्यावे..

श्री. दिवाकर रावते : आजच्या कामकाजपत्रिकेत महानगरपालिकेचे एक विधेयक दाखविण्यात आले आहे. त्या विधेयकाची अंमलबजावणी करण्याचे काम आमच्या महानगरपालिका सदस्यांकडे येणार आहे.

उपसभापती :आज सभागृहाचे कामकाज सकाळी 10.00 वाजेपासून सुरु झालेले आहे. त्यामुळे मी आता सभागृहासमोरील कामकाज दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करतो. दुपारी 1.00

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

नंतर सभागृहासमोरील पुढील कामकाज सुरु होईल. माझी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात आणि माननीय राज्य मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी कृपया माझ्या दालनात यावे. यासंदर्भात आपण एकत्रितपणे चर्चा करुन योग्य तो निर्णय घेऊ.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.26 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आता सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-72 मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, 2006 हे शासकीय विधेयक चर्चेला घेण्यात येत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-63 महाराष्ट्र कापूस बी-बियाणे विधेयक देखील आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आले आहे.

उपसभापती : आज फक्त एकच शासकीय विधेयक चर्चेला घेण्यात येत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : माझी सभागृहाला विनंती आहे की, 1 एप्रिल, 2009 पासून बियाण्यांची विक्री सुरु होत असते. कोणताही घटनाबाह्य अशा प्रकारचा मुद्दा नसून सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-63 हे विधेयक चर्चेला घेण्यात यावे.

उपसभापती : आज सुरुवातीला एकच विधेयक चर्चेला घेण्यात येणार आहे. माननीय सभापतींच्या दालनात जी चर्चा झाली, त्या चर्चेच्या अंती तसा निर्णय झाला आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी विधेयक मांडावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक.

मु.शी.: L.A.BILL No.LXXII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 72 मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 72 मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्र. 72-मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, 2006 च्या संदर्भात माझे विचार मी मांडणार आहे.

महोदय, हे विधेयक म्हणजे सध्या मुंबई महापालिकेत जी करप्रणाली अस्तित्वात आहे त्यात बदल करणारे हे विधेयक आहे. यासंदर्भात काही गोष्टी दुर्दैवाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. वास्तविक त्या विधेयकाच्या संदर्भात नाहीत तर विधिमंडळाच्या कामकाज व कार्यपध्दतीबाबत तसेच विधिमंडळ सचिवांच्या अखत्यारितील ह्या बाबी आहेत. कारण यासंबंधी जी संयुक्त चिकित्सा समिती नेमण्यात आली होती त्या समितीवर मी देखील सदस्य म्हणून होतो. ही समिती आमच्याच आग्रहास्तव नेमण्यात आली होती. या समितीच्या कामकाजात माझे काही आक्षेप आहेत ते नोंदविण्याचा माझा प्रयत्न आहे. खरे म्हणजे या विधेयकाच्या संदर्भात अशी एक पध्दत असते की संयुक्त समितीसमोर एखादे विधेयक आल्यानंतर त्यावर उपसूचना द्यावयाच्या असतात. तशा एकूण 22 उपसूचना मी दिल्या होत्या परंतु त्यातील एकाही उपसूचनेचा विधेयकात विचार करण्यात आलेला नाही. तसेच या विधेयकाबाबत जनतेकडून देखील 7 ऑक्टोबर, 2006 पर्यंत विहित मुदतीत काही सूचना मागविण्यात आल्या होत्या. अशा विहित मुदतीत प्राप्त झालेल्या उपसूचना एकत्र करण्यात येतात आणि एकाच प्रकारच्या ज्या सूचना असतील अशा दहा-दहा लोकांच्या सूचना एकदम वाचण्यात येतात. अशा प्रकारे दहा-दहा लोकांनी एकाच प्रकारच्या सूचना केल्या आहेत. संयुक्त चिकित्सा समिती ही एक महत्वाची समिती असते. मुंबई महानगर पालिकेत मी नगरसेवक म्हणून होतो त्यावेळेस कायदा कसा तयार होतो हे जाणून घेण्याची मला अत्यंत उत्सुकता होती. कै. रामदास नायक हे खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य त्यावेळेस होते. मी त्यांना विचारले होते की कायदा कसा तयार होतो. त्यावर त्यांनी मला सांगितले होते की, कायदा तयार करताना त्यावर सांगोपांग अशी चर्चा सभागृहात होते. ती उत्सुकता म्हणून मी त्यावेळेस पहिल्यांदा विधिमंडळाच्या लायब्ररीमध्ये आलो होतो. श्री. फिरोजशहा मेहता सारख्या अनेक दिग्गज लोकांनी आपले विचार मांडले आहेत त्यासंबंधी मी वाचले होते व अशाच कार्यवृत्ताच्या झेरॉक्स मी अभ्यास करण्यासाठी लायब्ररीमधून काढून घेतल्या होत्या. परंतु मला अभिमान वाटतो की, मुंबई महानगरपालिकेचा कायदा जो त्यावेळेस करण्यात आला त्यातील

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तरतुदी आजही भक्कम आहेत. त्यावेळेस हा कायदा बनविण्यासाठी बसलेले तत्कालीन सक्षम लोकप्रतिनिधी यांनी 100 वर्षापूर्वी हा कायदा केला व त्यातील तरतुदी आजही भक्कम अशाच आहेत. त्या कायद्यात असलेली करप्रणाली बदलण्याचा आपण आज प्रयत्न करीत आहोत. ठीक आहे, कारण शहराचा विस्तार होत आहे, शहरात विविध घटना घडत आहेत. कालांतराने नवीन करविषयक कायदे आले, व्हॅटचा कायदा आला, जकात कर रद्द झाला अशा प्रकारे अनेक बदल होत गेले. चिकित्सा समितीचा अर्थ असा होतो की, प्रत्येक कायद्याबाबत भरपूर चर्चा झाली पाहिजे, त्या कायद्यामुळे होणाऱ्या परिणामांबाबत चर्चा झाली पाहिजे आणि त्यातील योग्यायोग्यतेचाही विचार होत असतो. तसेच संयुक्त समितीमध्ये सर्व पक्षाचे सन्माननीय सदस्य असल्यामुळे सभागृहात ते विधेयक आल्यानंतर त्यावर अधिक चर्चा न होता ते पास करावे अशी पध्दत असते. मी गैरहजर असताना बैठक लागली त्यावेळेस मी फोन केला आणि या विधेयकाच्या संदर्भात मला काही मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत अशी इच्छा व्यक्त केली, परंतु समितीमध्ये माझ्या अनुपस्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. त्याच वेळेस माझ्यामध्ये असलेल्या जाणकारितेचा अनुभव म्हणून मी नोट ऑफ डिसेंट पाठविली व त्याच संदर्भात आज बोलण्यासाठी उभा आहे. खरे म्हणजे हे विधेयक मंजूर होण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय महत्वाचे होता. एकंदरीत हे विधेयक मंजुरीसाठी आणण्यापूर्वी या विधेयकाच्या अनुषंगाने एकूण पाच कायद्यांमध्ये बदल घडायला पाहिजे, तसे केले तरच हे विधेयक सभागृहात आणता येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

एकूण पाच कायद्यामध्ये बदल केल्याशिवाय हे विधेयक सभागृहात आणणे योग्य होणार नाही. महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम 1976 च्या कायद्याच्या अखत्यारीतील जी कर प्रणाली आहे त्यामध्ये बदल केल्याशिवाय ही प्रणाली कशी लागू केली असा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे या कायद्यात बदल करणे, सुधारणा करणे ही पहिली बाब आहे. दुसरी बाब अशी आहे की, शिक्षण उपकर आणि रोजगार हमी योजनेसाठी आकरण्यात येत असलेल्या प्रोफेशनल टॅक्समध्ये सुध्दा आपल्याला बदल करावे लागणार आहेत. कर पात्र मूल्याप्रमाणे जो कर आकरण्यात येतो त्याच्या टक्केवारी प्रमाणे पाणीपट्टी, शिक्षण कर लावला जातो. त्यामुळे या कायद्यामध्ये सुध्दा आपल्याला आमूलाग्र बदल केल्या शिवाय हा कर लावता येणार नाही. तिसरा मुद्दा असा आहे की, महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन, अधिनियम 1975, यामध्ये सुध्दा आपल्याला बदल करावा लागणार आहे, कारण अधिनियमान्वये कराची वसूली केली जाते. चवथी बाब अशी आहे की, महाराष्ट्र मोठया निवासी जागा असलेल्या इमारतीवरील कर, अधिनियम 1979, संबंधीच्या नगर विकास विभागाच्या कायद्यात सुध्दा आपल्याला बदल करावा लागणार आहे. तसेच मुंबई बंदर विश्वस्त अधिनियम 1979, हा भारत सरकारचा कायदा असून त्यामध्ये सुध्दा भारत सरकारला बदल करावा लागणार आहे. या 5 कायद्यात जोपर्यंत बदल केले जाणार नाहीत तोपर्यंत आपल्याला हा कायदा अमलात आणणे कठीण जाणार आहे. या कायद्याच्या संदर्भात आम्ही चिकित्सा समितीपुढे ज्या काही सूचना मांडल्या होत्या, आणि जे काही बदल सुचविले होते ते आपण या कायद्यात केले आहेत काय ? संबंधित बदल कायद्यात न करता हे विधेयक तुम्ही कसे काय आणू शकता ? यासंबंधी आम्ही उपस्थित केलेले सर्व प्रश्न अनुत्तरीत राहिलेले आहेत. जोपर्यंत आपण या पाच कायद्यात बदल करीत नाहीत, सुधारणा करीत नाहीत तोपर्यंत हे विधेयक येथे आणणे योग्य होणार नाही. आपण या विधेयकाला सभागृहाची मान्यता घेतल्यानंतर कर प्रणाली कशी लावणार आहात ? याचे उत्तर सापडत नाही. जागेच्या किमतीवर आधारीत कर प्रणाली या कायद्यामुळे लागू होणार आहे. कर प्रणालीमध्ये बदल करण्याच्या संदर्भात सुप्रिम कोर्टाने आदेश दिले होते. आणि म्हणून मुंबई महानगर पालिकेच्या नगरसेवकांना सांगण्यात आले होते की, आपल्याला कोर्टाचे आदेश असल्यामुळे आपल्याला त्या प्रमाणे अंमलबजावणी करावी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

लागेल. खरे म्हणजे अधिवेशन पूर्ण कालावधीचे भरविले जाते त्यावेळी हे विधेयक यावयास पाहिजे होते. आपण मुंबई महानगर पालिकेच्या नगरसेवकांची दिशाभूल केलेली आहे., यासंदर्भातील संपूर्ण इतिवृत्त मी येथे वाचून दाखविले असते. परंतु वेळे अभावी मी तसे करु शकत नाही. एका अधिका-याच्या मर्जीकरता मुंबई महानगर पालिकेच्या नगर सेवकांची आपण चक्क दिशाभूल केलेली आहे. अशा प्रकारे दिशाभूल करणा-या अधिका-यावर कारवाई करण्याची तरतूद मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात नाही परंतु विधिमंडळ सदस्यांची अधिका-यांनी दिशाभूल केली तर संबंधित अधिका-यावर हक्कभंग येऊ शकतो. मुंबई महानगरपालिकेमध्ये काँग्रेसचे जुने व अनुभवी नगरसेवक होते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक होते तसेच आमच्या पक्षाचे सुध्दा नगर सेवक होते. या कायद्याच्या संदर्भात सर्व नगरसेवकांनी आपली त्या ठिकाणी बाजू मांडली असून त्यासंदर्भात कोणताही निर्बंध लावण्यात आलेला नाही. फक्त सुप्रिम कोर्टाने चांगला युनिफॉर्म कायदा करावा असे सूचविले आहे, असे त्यांनी सांगितले. परंतु मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घेतले गेले नाही. या कायद्याच्या संदर्भात कोर्टाने फक्त अलाहाबाद, लखनौ आणि दिल्लीच्या धर्तीवर कायदा बनवावा असे सुचविले होते. यासंदर्भात जो अहवाल तयार करण्यात आलेला आहे तो सुध्दा माझ्याकडे आहे. परंतु वेळे अभावी हा अहवाल मी येथे वाचून दाखवत नाही. महानगरपालिकेच्या त्यावेळच्या अतिरिक्त आयुक्तांनी हा अहवाल बनवला होता त्या अहवालामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, "करपात्र मूल्य बदलून तुम्ही ज्यावेळी भांडवली मूल्यावर येता, तेव्हा भांडवली मूल्याचे 1/3 मूल्य धरुन त्यावर कर आकारावा."

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.दिवाकर रावते....

म्हणजे माझ्या निवासी गाळ्याची किंमत 50 लाख रूपये असेल तर ती न धरता त्याच्या 1/3 धरावी आणि त्यावर कर आकारावा, अशा प्रकारची त्यामध्ये सूचना होती. परंतु, नंतरच्या अधिकाऱ्याने तो अहवाल दडपून टाकला. नवीन अहवाल बनवून पूर्ण किंमतीवर कर लावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एक भेद निर्माण केला गेला. मला समजत नाही. नागरिकांवर कर लावताना निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये फूट पाडण्याचे षडयंत्र अधिकाऱ्यांनी बरोबर रचले. वर्तमानपत्राच्या माध्यमातून जनतेमध्ये असे भिनवले की, मुंबई शहरातील नागरिक कमी कर भरतील आणि मुंबई उपनगरातील नागरिक जास्त कर भरतील. अशाने शहर आणि उपनगरातील नगरसेवकांमध्ये प्रथम फूट पाडण्यात आली. ज्यावेळी यासंबंधातील ठराव महापालिकेमध्ये आला त्यावेळी शहरातील नगरसेवक आणि उपनगरातील नगरसेवक यांच्यामध्ये युद्ध लागले. पण याच्या खोलात जाऊन कोणीही सत्य काय आहे, हे पाहिले नाही. मी या खात्यामध्ये दहा वर्षे नोकरी केली आहे. असेसमेंटचे व्हॅल्यूएशन चुकीचे आहे, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आल्या. यामध्ये माझा थोडासा एक टक्का अभ्यास आहे. आपल्या म्हणण्याप्रमाणे आयएएस अधिकाऱ्याएवढा माझा अभ्यास नाही. सुदैवाने आमच्या सभागृहाचे नेते दोन वेळा मुंबई महानगरपालिकेचे महापौर होते. तीन वेळा स्थायी समितीचे अध्यक्ष होते. ते आज सभागृहात हजर आहेत. माझ्या पेक्षा त्यांना महापालिकेचे जास्त ज्ञान आहे. कित्येक वर्ष ते तेथे होते. आजही या क्षणाला मुंबई शहर हे उपनगरांपेक्षा जास्त कर देत आहे, हे मी अधिकृतपणे सांगत आहे. परंतु, जो कर गोळा होत आहे, त्या करातून मुंबई शहराला आपण काहीच देत नाही. कारण मुंबई आज उपनगरात वाढत आहे. त्यामुळे कराद्वारे मिळणाऱ्या निधीचा विनियोग उपनगरातील पायाभूत सुविधा म्हणजे रस्ते, जलवाहिन्यांसाठी होत आहे. मुंबई शहराला काय मिळाले ? कुल्याब्याला फक्त सिवरेजची 500 मीटरची पाईपलाईन मिळाली. उपनगरामध्ये मात्र सगळे सिवरेज प्लॅन झालेत. त्याचे आम्हाला दु:ख नाही. उपनगरामध्ये शहर वाढत असल्यामुळे सगळ्या सुविधा कराव्या लागतात. आज मुंबईतील गिरगावकरांचा पाण्याचा आणि मलनि:सारणाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. हा भाग दाटीवाटीचा आहे. त्यामुळे काही करता येत नाही. येथील लोकपण कर भरत आहेत. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

दुसरा विषय असा आहे की, आपण कर कसा लावणार आहात ? आज मी दीड कोटीचा ब्लॉक विकत घेतला. पण मी 40 वर्षे तेथे राहतो आहे. त्याची किंमत तीच धरणार काय ? जे काल परवा आले आहेत ते आतापासून कर भरणार आहेत. मी 40 वर्षापासून या नगरीतला कर भरत आलो आहे. आपण माझ्या सर्व सुविधा काढून घेतल्या आहेत. ती तुलना होत आहे, ती असह्य होत आहे. मूळ मुंबईकर नागरिक वर्षानुवर्षे येथे राहत आहेत. आपण सब घोडे बारा टक्के याप्रमाणे सर्वांना एका पातळीवर आणणार आहात. जुन्या लोकांना आहे त्यापेक्षा दुप्पट कर आकारणार आहात. हा वाद ज्यावेळी निर्माण झाला त्यावेळी श्री.राजेश टोपे हे राज्यमंत्री होते. त्यांनी हे विधेयक सदनामध्ये आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी मी त्यांना सांगितले आपण मला फक्त तुलनात्मक तक्ता द्यावा. त्यावेळी मी त्यांना कोण-कोणत्या भागात किती दर आहे हे सांगितले. त्यांनी तक्ता पटलावर ठेवण्यात येईल असे सांगितले. त्यांनी पटलावर काय ठेवले ? ते मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणणार आहे. या विधेयकाच्या माध्यमातून नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या चिकित्सा समितीमध्ये देखील एकाच पक्षातील सदस्यांमध्ये फूट पडली होती. आमचे उपनगरातील आमदार आमचा पाठिंबा आहे, असे उघड सांगत होते. या करासाठी आम्ही शहरातील सदस्य भांडत होतो. काय अधिकाऱ्याचे स्कील आहे. यु आर ऑल्सो मेझमराईझ्ड तुम्हाला याची मोहिनी घालण्यात आली. एवढा प्रभाव अधिकाऱ्यांचा होता.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सभापती महोदय, मलबार हिल, गिरगाव, दादर, सायन ,घाटकोपर ,मुलुंड, सांताक्रुझ, खार , अंधेरी आणि बोरिवली या ठिकाणी घरांची जास्त मागणी आहे , त्या ठिकाणी लोक वस्ती दाट आहे त्या ठिकाणी घरांचे भावसुध्दा जास्त आहेत तेव्हा त्या भागातील घराच्या करासंबंधीची माहिती देण्यात यावी असे मी माननीय मंत्रिमहोदयांना सभागृहात सांगितले होते. त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी मला ही माहिती दिली असून ती मी आपल्याला वाचून दाखवितो. या जागेचे क्षेत्रफळ 500 स्केअर फुट म्हणजे 46.46 चौरस मिटर इतके आहे. मी आपल्याला जुन्या हिशोबाप्रमाणे म्हणजेच रेटेबल व्हॅल्यूप्रमाणे कर आकारणीची माहिती देत आहे. कर निर्धारण वर्ष 1980, 1990 आणि 2000 अशा प्रकारे दर दहा वर्षाची कर प्रणाली कशी राहणार आहे याची मी माहिती मागितली होती. हे जुने कर आहेत आणि ते वाढत नाहीत असेही त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले होते. माझ्याकडे निवासी जागेचे क्षेत्रफळ, त्याची रेटेबल व्हॅल्यू, करपात्र मूल्य, अंदाजित भाडे इत्यादीसंबंधीचे सगळे कोष्टक असले तरी ते संपूर्ण न वाचता कर किती होता यासंबंधीची माहिती फक्त वाचून दाखविणार आहे. मलबार हिल मध्ये 500 चौरस फुटाच्या जागेसाठी 1980 साली 51 पैसे , 1990 साली 2 रुपये 26 पैसे आणि 2000 साली 5 रुपये 4 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता त्याचप्रमाणे गिरगावमध्ये 1980 साली 38 पैसे, 1990 साली 1 रुपया 68 पैसे, 2000 साली 3 रुपये 55 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता, दादरमध्ये 1980 साली 34 पैसे, 1990 साली 1 रुपया 52 पैसे आणि 2000 साली 3 रुपये 70 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता, त्याचप्रमाणे सायनमध्ये 1980 साली 34 पैसे, 1990 साली 1 रुपया 52 पैसे आणि 2000 साली 3 रुपये 52 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता म्हणजे दादरपेक्षा 18 पैशांनी कर कमी आहे .घाटकोपर येथे 1980 साली 30 पैसे, 1990 साली 1 रुपया 21 पैसे आणि 2000 साली 2 रुपये 97 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता. उपनगरातील दर कमी आहेत. मुलुंडमध्ये 1980 साली 30 पैसे, 1990 साली 1 रुपया 26 पैसे, 2000 साली 2 रुपये 73 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता. खार आणि सांताक्रुझ या भागात घराच्या किंमती जास्त आहेत त्या ठिकाणी घरांची मागणी अधिक आहे तेथेसुध्दा 1980 साली 34 पैसे, 1990 साली 1 रुपया 42 पैसे आणि 2005 साली 3 रुपये 16 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता अंधेरी येथील कर सर्वात जास्त

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

होता परंतु शहरा पेक्षा हा दर जास्त नाही. उलट सायन पेक्षा कमी आहे अंधेरी येथे 1980 साली 32 पैसे, 1990 साली 1 रुपया 38 पैसे आणि 2000 साली 3 रुपये 35 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता. बोरिवली येथे 1980 साली 29 पैसे ,1990 साली 1रुपया 25 पैसे, 2000 साली 2 रुपये 86 पैसे प्रती चौरस फुट एवढा कर होता. 2000 साली सायन पर्यन्त 3 रुपये 50 पैसे दर होता आणि बोरिवली येथे 2 रुपये 86 पैसे एवढा कर होता. शहरा पेक्षा उपनगरामध्ये जास्त कर प्रणाली नसतांना उपनगरामध्ये जास्त कर प्रणाली आहे अशा प्रकारे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधीमध्ये आणि जनतेमध्ये पध्दतशीरपणे फैलावले होते. त्यामुळे त्या काळातील महानगरपालिकेचे अधिकारी किती ताकदीने हे काम करीत होते हे आपल्या निदर्शनास येईल. शहरातील लोक कमी कर भरतात आणि उपनगरातील लोक जास्त कर भरतात तेव्हा दोघांनाही एकाच पातळीवर आणण्यासाठी ही कर प्रणाली स्वीकारत आहोत असे सांगितले गेले आहे. शासकीय कामकाजामध्ये अशा प्रकारची फसवा फसवी करण्यासाठी अधिका-यांमध्ये ताकद आणि सामर्थ्य कसे काय निर्माण होऊ शकते हे मला समजत नाही. एखादे विधेयक आणावे असे एखाद्या अधिका-याला वाटते म्हणून संपूर्ण् शासन जर तो हातावर तोलून धरत असेल तर अधिकारी श्रेष्ठच राहतो , शासन निकम्मे ठरते त्यामुळे शासनाला तो अधिकारी खेळवतो असे मला वाटते.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / परिशुध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

हाच या विधेयकाला विरोध करण्यामागील माझा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नवीन कर प्रणालीप्रमाणे तयार करण्यात आलेले कोष्टक देखील माझ याकडे आहे. हे कोष्टक भांडवली मूल्यावर तयार केले आहे. त्यामध्ये जुन्या लोकांना 40 टक्के कर आहे, परंतु ते नंतर कोष्टकाप्रमाणे वाढत जाणार आहे. आणि आज जे दर आहेत, त्यापेक्षा जास्त होणार आहेत. आज मलबार हिलच्या विभागात 500 चौरस फूटासाठी 5.04 पैसे आहे, ते 9.86 पैसे होणार आहेत. आज गिरगावामध्ये 3.55 पैसे आहे, ते 3.54 पैसे होणार आहेत, त्यामध्ये 1 पैसा कमी होणार आहे. दादरमध्ये 3.84 पैसे आहे, ते 3.70 पैसे होणार आहेत. घाटकोपरमध्ये 3.64 पैसे आहे, ते 3.52 पैसे होणार आहेत. मुलुंडमध्ये 1.82 आहे, ते 2.97 पैसे होणार आहेत. बोरीवलीमध्ये 1.41पैसे आहे ते 2.86 पैसे होणार आहेत. हे भांडवली मूल्यावर ठरविण्यात आलेले दर एकाच पातळीवर आणावयाचे आपण म्हणत असतांना या प्रत्येक ठिकाणी हे दर वाढणार आहेत. मुळात हे विधेयक सभागृहापुढे आणून मोठया प्रमाणावर सार्वजनिक फसवा फसवी करुन लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य जनतेवर असत्य आणि चुकीचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे. या मुंबई शहरामध्ये शेकडो वर्षापासून रहाणाऱ्या मूळ नागरिकांवर सुध्दा हा कर लादला जाणार आहे, त्यांचे कसे होणार आहे हा माझ्यापुढे प्रश्न आहे? भाडेतत्वावर असलेल्या इमारतीला रेडी रेकनरमध्ये भांडवली मूल्य नाही. तुमच्या आणि माझ्या खोलीचे सुध्दा नाही. तर मग तुम्ही त्यासाठी कोणते मूल्य धरणार आहात? 100 वर्षाची जुनी चाळ असतांना सुध्दा फक्त 30 वर्षाचे डिप्रिसिएशन मिळते. त्या विभागातील रेडी रेकनरचा दर 20 हजार रुपये असेल आणि माझी खोली जर 10x10 ची असेल तर 100 फूटाला 20 लाख रुपये होतील. आणि मग त्याचे 30 टक्के डिप्रिसिएशन काढून त्यावर भांडवली मूल्य ठरेल. मी आज माझ्या खोलीचे 15 रुपये भाडे भरत आहे. त्यासाठी तुम्ही माझ्यावर मेहरबानी करीत नाही. त्या भाडयामध्ये तुम्ही शिक्षण उपकर लावता, सिव्हरेज चार्जेस लावता. सभापती महोदय, महानगरपालिकेने केलेली मोठी फसवा फसवी मी या सभागृहामध्ये मांडली. त्यावेळचे शब्द मला आता आठवत नाहीत. परंतु मी माझ्या सोसायटीचे आलेले कराचे बिल पाहिले असता त्यामध्ये सिव्हरेज बेनिफिट आणि वॉटर बेनिफिट टॅक्स दाखविला होता. तसेच, पाण्याच्या आलेल्या बिलामध्ये सुध्दा सिव्हरेज बेनिफिट आणि वॉटर बेनिफिट टॅक्स लावला. अशाप्रकारे दोन वेळा माझ्याकडून टॅक्स वसूल केला. अशापध्दतीने आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

मुंबई शहरामधील नागरिकांकडून किमान 10 हजार कोटी रुपये लुटले आहेत हे मी निदर्शनास आणले. त्यावेळी अधिकाऱ्यांनी तिथल्या तिथे सांगितले की, हे लावण्यात आलेले कर आपण आजपासून रद्द करु, तुम्ही ते रद्द केल्यानंतर फक्त एकाच बिलामध्ये दाखविण्यात आले. वाशीच्या टोल नाक्यावरुन होत असलेल्या वसुलीबाबत काही लोक कोर्टामध्ये गेल्यानंतर ज्यांच्याकडे रिसिट होती त्या लोकांना त्यांनी भरलेल्या टोलचे रिफंड मिळाले. त्याप्रमाणे या सिव्हरेज बेनिफिट टॅक्सच्या केलेल्या वसुलीबाबत कुणीतरी कोर्टात जाईल. ही पध्दत काय आहे हे मला समजत नाही? याठिकाणी अधिकारी येतात आणि आपल्या मनाप्रमाणे ही पध्दत बनवितात याचे मला दु:ख होते. या प्रश्नाचे उत्तर मला चिकित्सा समितीमध्ये घ्यावयाचे होते. चिकित्सा समितीमध्ये असा संकेत आहे की,सर्वांच्या दृष्टीने सोईच्या असलेल्या तारखेला समितीची बैठक लावण्यात येते. त्या बैठकीला जर एखादे सदस्य उपस्थित राहिले नाही तर तो त्यांचा प्रश्न आहे. भाडे तत्वावर असलेल्या इमारतींचे भांडवली मूल्य आपण रेडी रेकनरप्रमाणे कसे ठरविणार? यासंबंधी विधेयकाच्या खंड 15 मध्ये तरतूद आहे. भांडवली मूल्याबाबतचा शासकीय निर्णय योग्य की, अयोग्य आहे हे कोण तपासणार? त्याबाबतचा कोर्टाचा निर्णय मी याठिकाणी सांगणार आहे. सभापती महोदय, एके ठिकाणी पाच माळयाची इमारत असल्यामुळे नियमाप्रमाणे पाच माळयापर्यंत लिफ्टची व्यवस्था नाही. परंतु त्यापेक्षा जास्त माळयाची इमारत असेल तर त्याठिकाणी लिफ्टची व्यवस्था करणे सक्तिचे आहे. सात मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा तयार ठेवणे सक्तिचे आहे. आपल्या करपात्र मूल्यामध्ये पाच मजल्यापेक्षा अधिक मजले असलेल्या उंच इमारतींना प्रति चौरस फूटाला आपण एक रुपया वाढवितो अशी पध्दत आहे. एखाद्या भागामध्ये छोटी इमारत आहे, आणि एखाद्या भागामध्ये टोलेजंग इमारत आहे, त्याठिकाणी जलतरण तलाव आहे.. सिध्दीविनायक मंदिरासमोर नव्याने बांधण्यात आलेल्या टोलेजंग इमारतीमध्ये सर्वच सोयी आहेत. त्याठिकाणी शॉपिंग सेंटर, जलतरण तलाव, जिम्नॅशियम वगैरे सर्वच सुविधा आहेत. त्यामुळे तेथील सदनिकांचे मूल्यांकन वेगळे होणार आहे आणि त्या इमारतीच्या बाजूला असलेल्या 35 वर्षापूर्वी बांधलेल्या 12 मजल्याच्या कामनाथ सोसायटीमधील सदनिकांचे मूल्यांकनही तसेच होणार आहे. यामध्ये सब घोडे बारा टक्के, सगळे सारखे आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जास्तीतजास्त दर कसा पकडता येईल यादृष्टीने विचार करुन रेडी रेकनर ठरविला जातो आणि शासनाला त्या माध्यमातून कर मिळत असतो, मुद्रांक शुल्क मिळत असते.म्हणून जेव्हा यावर्षी रेडी रेकनर नव्याने ठरविण्याचे काम सुरु केले, तेव्हा मला पत्र आले. त्यानंतर मी संबंधित अधिकाऱ्यांशी बोललो, तेव्हा त्यांनी मला स्पष्ट शब्दामध्ये सांगितले की, रेडी रेकनर हा कोणत्याही कामासाठी वापरणार नाही, तर तो कायदेशीररित्या फक्त मुद्रांक शुल्कासाठी आहे, तेवढयापुरता मर्यादित आहे. त्याचा वापर इतर कोणत्याही कर प्रणालीसाठी करता येणार नाही आणि मी आज हे रेकॉर्डवर यावे म्हणून बोलत आहे. पण तुम्ही याठिकाणी याचा वापर करणार आहात. म्हणून एखाद्या विभागामध्ये भांडवली मूल्य कसे ठरविणार ? हा प्रश्न आहे.जर विक्री झाली तर त्याच्या 30 टक्के डिप्रीसिएशन मिळते. पण जर विक्री झाली नाही आणि मी त्याठिकाणी वर्षानुवर्षापासून रहात असेन तर तुम्ही मला काहीही देत नाही, परंतु माझ्या करामध्ये मात्र वाढ करीत आहात. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने अधिकृतरित्या बंगलोर, हैद्राबाद येथील भांडवली मूल्यांकन पुस्तिका कायद्याने रद्दबातल ठरविल्या. The Ready Recokner has been scrapped by the High Court. हे अयोग्य आहे. आता हे झ ाल्यानंतर या मुद्यावर न्यायालयात याचिका दाखल होतील आणि त्यातून यासंबंधातील अंमलबजावणी नक्की रोखली जाईल की नाही अशी माझी शंका आहे. पण ठीक आहे. आता विधीमंडळामध्ये विधेयक पास झाल्यानंतर "फेट अकॉम्प्लि" असे जे म्हणतात, ते कोर्टामध्ये होईल.पण तो माझा विषय नाही. मात्र ते होईल.घटनेच्या 7 व्या अनुसूचीतील अनुक्रमांक 86 प्रमाणे भांडवली मूल्य आकारण्याबाबत स्पष्टीकरण दिले असून ते फक्त केंद्रशासित प्रदेशाकरता आकारता येते अशा प्रकारची घटनेमध्ये तरतूद आहे.म्हणून मी मूल्यांकनाच्या बाबतीत अधिकाऱ्यांशी बोललो,तेव्हा अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही मूल्यांकन हे स्टॅम्प ड्युटीसाठी वापरत आहोत. पण जर इतर प्रणालीसाठी वापर करावयाचा असेल तर जोपर्यंत "केंद्रशासित प्रदेशाव्यतिरिक्त" असा घटनेतील सूचीमध्ये बदल होत नाही, तोपर्यंत तुम्हाला वापर करता येईल काय ? हा माझा प्रश्न आहे. हा कायदेशीर प्रश्न आहे, घटनादत्त प्रश्न आहे. म्हणून यासंदर्भात आपण कोणती तयारी केलेली आहे? पाच कायदे तर बदलावयाचेच आहेत.त्याबाबतीत माननीय मंत्री महोदय उत्तर देतीलच. परंतु या कर प्रणालीला, घटनेच्या अनुसूचीला अनुरुप नसलेली अशी जी भांडवली मूल्याची फूटपट्टी घेतलेली आहे, ती घटना दुरुस्ती झाल्याशिवाय वापरता येते काय ? असा माझ्यापुढे प्रश्न आहे. म्हणून हे घटनाबाह्य विधेयक ठरेल अशी मला भीती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय,श्री.व्ही.एम.मालवीय संबंधातील केस खूप मोठी असून त्याची ओरिजनल कागदपत्रे माझ्याजवळ आहेत. श्री.व्ही.एम.मालवीय आणि महानगरपालिका यांच्या केसबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये कोणता निर्णय झाला ? त्यांनी असे सांगितले की, रेटेबल व्हॅल्यूमध्ये कन्फ्युझन आहे. रेटेबल व्हॅल्यूच्या बाबतीत फार घोळ होत आहे. रेटेबल व्हॅल्यू निश्चितपणे कशी ठरवावयाची? म्हणून पाटणा आणि अहमदाबादप्रमाणे पध्दत स्विकारावी असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे, याबाबतीत डायरेक्टीव्हज् असेच दिलेले आहेत. पण यांनी काय केले? तर पाटणा आणि अहमदाबाद येथील पध्दत बाजूला ठेवली.माझ्याकडे पाटणा, दिल्ली, हैद्राबादच्या संबंधातील मूळ पुस्तिका आहेत. परंतु मी आज त्या येथे आणलेल्या नाहीत.माझ्याकडे या विधेयकाच्या संबंधातील बॅग भरुन मटेरिअल आहे.म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे करावे असे सांगितलेले असताना देखील तो निर्णय बाजूला ठेऊन,आपण मुंबईच्या रेडी रेकनरप्रमाणे पुढे जाणार आहात.रेकी रेकनर हे पायाभूत असू शकत नाही,कारण बाजार मूल्य हे सतत वाढत असते.ते कशावर वाढते? यंदा अर्थसंकल्पामध्ये असे सांगितले आहे की, आर्थिक संकट आले आहे.यावेळेला 200 कोटी रुपये कमी प्राप्त झालेले आहेत.ॲम्नेस्टी स्किम काढून सुध्दा हे पैसे कमी प्राप्त झालेले आहेत. याचा अर्थ खरेदी-विक्रीच्या भावामध्ये प्रचंड घसरण झालेली आहे.

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणून तो रेडी रेकनरचा दर कमी करावयास पाहिजे होता पण यावेळी तो कमी केला नाही. गेल्या वर्षी जो दर होता तो तसाच ठेवण्यात आला आहे. सभापती महोदय, गाळयाच्या खरेदी-विक्रीच्या संदर्भात आपण बाजारात गेलो तर बाय वन गेट वन फ्री प्रमाणे जसा कंगवा, पावडरचा डबा लिपस्टिक वगैरे एक घेतले तर एक फुकट मिळते त्याप्रमाणे आता ब्लॉकसुध्दा फुकट मिळावयास लागले आहेत. आमच्याकडे एक ब्लॉक विकत घेतला तर एक ब्लॉक फुकट मिळेल इतकेच नव्हे तर आमच्याकडे ब्लॉक घ्या, बँकेचे पहिले तीन हप्ते आम्ही भरु असे बिल्डर सांगत आहेत. अशा प्रकारच्या जाहिराती मी वर्तमानपत्रात वाचल्या आहेत. एवढया खालच्या पातळीवर मार्केट गेले असताना अशा जाहिराती येत आहेत.

आजच्या परिस्थितीत मी एखादी वास्तू जर 20 लाख रुपयात घेत असेल आणि तिचा रेडीरेकनरचा दर 35 लाख रुपये, 40 लाख रुपये असेल तर त्या वास्तूवर रेडीरेकनरच्या दराप्रमाणेच कर लावण्यात येणार आहे. बाजारातील भांडवली मूल्य कशावरुन ठरविण्यात येणार आहे, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होणार आहे. एखादी वास्तू विकत घेतल्यानंतर अधिकृतरीत्या स्टॅम्पडयुटी वगैरे हे सगळे होणारच आहे.म्हणून उपलब्धी आणि टंचाईच्या काळात देखील कुलाब्याचे महत्व,दादरचे महत्व,गिरगावचे महत्व, ठाण्याचे महत्व अशा प्रकारे त्या त्या विभागाचे महत्व लक्षात घेऊन आणि बांधकामाच्या पध्दतीनुसार वास्तूचे भांडवली मूल्य ठरत असते म्हणून त्या त्या विभागाप्रमाणे त्या त्या इमारतीप्रमाणे महत्व ठरविणार की, कसे ठरविणार हा प्रश्न आहे. इमारतीप्रमाणे ठरविले तर परत इनडिस्क्रिमिनेशनचा प्रश्न येणार आहे. कलम 19 प्रमाणे आपल्याला समान न्याय द्यावा लागेल. त्यामुळे उत्पादन क्षमतेत वाढ होईल असे नाही. किंबहुना ती होतच नाही. नगरपालिकेच्या सेवेत बदल होणार आहे काय ? कां नाही ? तर विकासाच्या वेगामुळे सेवा घटत असतात. आता पाणी कमी झालेलेच आहे. मुंबई शहरात पाणी नाही. कालपरवाच स्थायी समितीने या मुंबईसाठी तीन हजार मिलियन गॅलन पाणी कमी आहे, असे सांगितलेले आहे. महाराष्ट्रात जसा विजेचा खेळ चालू आहे तसा मुंबईत पाण्याचा खेळ चालू आहे. महाराष्ट्राला जेवढी मेगॅवॅट वीज कमी पडते तेवढे मुंबईला घनमीटर पाणी कमी पडते. स्थायी समितीने असे सांगितलेले आहे की, येणा-या तीन वर्षात आम्ही नवीन इमारतींना पाणी देऊ शकत नाही. नवीन इमारतींकडून सेवाशुल्क घेऊन त्यांच्यावर अशी परिस्थिती येऊ देणार काय? नवीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/

श्री. दिवाकर रावते.....

पाणी योजना, मलनि:सारण योजना आहेत. सन्माननीय श्री. भुजबळसाहेब येथे बसलेले आहेत. आपल्याला आठवत असेल, हाजीअलीच्या आऊटफॉलचे काम आता चालू आहे. हे काम यापूर्वीच सुरु करण्यात येणार होते. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आम्ही महानगरपालिकेत येण्यापूर्वीच आपण महापालिकेत अशा प्रकारची घोषणा केली होती. त्यानंतर आम्ही महापालिकेत आलो. आता तीस वर्षानंतर ते काम सुर झालेले आहे. पावसाळयात गिरगावपासून पुढच्या भागात पाणी साचत होते ते पाणी समुद्रात वाहून जाण्याचे काम आता सुरु झालेले आहे. सभापती महोदय, या संपूर्ण पध्दतीमध्ये जुन्या इमारतींचा प्रश्न आमच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. नवीन पध्दतीमध्ये जुन्या इमारतींच्या भाडेकरुंची परिस्थिती काय होणार आहे ? हा आमचा प्रश्न आहे. 18000 करप्राप्त इमारती आहेत. त्या 18000 करप्राप्त इमारतींकडून जो रिपेअर सेस घेण्यात येत आहे तो रेटेबल व्हॅल्यूच्या आधारावर घेण्यात येत आहे. आता नवीन पध्दत सुरु झाल्यानंतर तो कसा घेण्यात येईल हा प्रश्न आहे. नागपूरच्या अधिवेशनात एक विधेयक मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये दुरुस्तीचा दर 1200 रुपयांवरुन वरुन 2000 रुपये करण्यात आलेला आहे. तो सुध्दा मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींची तशी मागणी होती म्हणून केलेला आहे. आता त्याचे काय होणार आहे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा प्रकारचे विविध प्रश्न यामध्ये आहेत. सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्या प्रमाणे बंगलोर आणि हैदराबादच्या सुप्रीम कोर्टाने रेडीरेकनरचा दर बाद करुन टाकला आहे. याठिकाणी घटनेच्या 7 व्या अनुसूचीतील अनुक्रमांक 86 चा उल्लेख केलेला आहे. तसेच श्री. व्ही.एम.मालवीय विरुध्द मुंबई महानगरपालिका यांच्या प्रकरणाच्या संदर्भातील देखील उल्लेख केलेला आहे. मुंबई शहरातील कर प्रणाली ही शहरात जास्त आहे आणि उपनगरात कमी आहे. उपनगरात मुंबई शहरापेक्षा कर कमी आहे आणि उद्याच्या नवीन कर प्रणालीमध्ये सुध्दा मुंबई शहरामध्येच कर जास्त राहणार आहे आणि उपनगरात तो कमी राहणार आहे. कारण शासनाचा रेडीरेकनरचा दर आजही मुंबई शहरापेक्षा उपनगरात जास्त दाखवत नाही. महाराष्ट्र टाईम्समध्ये दर शुक्रवारी मुंबईतील रेडीरेकनरचे दर येतात त्याची कात्रणे माझ्याकडे आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशासकीय प्रत / ऑफ रेकॉर्ड

श्री. दिवाकर रावते .....

मुंबई शहरातील प्रत्येक भागामध्ये प्रती चौरस फुटाचे दर किती आहेत हे त्यात सांगितेले आहे. या विधेयकाच्या संदर्भात बरेच मुद्दे मांडावयाचे होते परंतु अधिवेशनाचा कालावधी कमी, वेळ कमी, त्यामुळे सगळेच कमी. या सर्व परिस्थितीचा आढावा घेता शासनाने हे जे विधेयक आणलेले आहे ते मुंबई शहराच्या नागरिकांवर अन्याय करणारे आहे. मला अधिकारी सांगत होते. आमच्याकडे अतिरिक्त आयुक्त होते ते आता सचिव आहेत. त्यांचा अनुभव आहे. त्यांनी असा आरोप केला की, आताची रेटेबल व्हॅल्यूच्या संदर्भातील जी करप्रणाली आहे त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे आणि या पध्दतीत भ्रष्टाचार होणार नाही असे त्यांचे मत आहे. ते मला पटत नाही. ते अयोग्य आहे हे सांगण्यासाठी आणि प्रत्येक बाबीची चिकित्सा करण्यासाठी मला आणखी दीड दोन तास लागतील. तेवढा वेळ मी घेणार नाही. ही पध्दत आणल्यानंतर भ्रष्टाचार होणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या कर प्रणालीचा आणखी दुसरा जो एक भाग आहे तो योग्य आहे. तो अयोग्य आहे असे मी म्हणणार नाही. ही जी लूट आहे ती थांबणार आहे. माझी एखादी कमर्शियल जागा असेल, महापालिकेने त्या जागेचे करपात्र मूल्य व्यापारी तत्वावर केलेले असेल आणि त्या ठिकाणी जर मी बाहेरुन एखादा भाडेकरु आणला आणि त्यांचा माझा करार झाला तर त्या कराराप्रमाणे ते जे भाडे भरणार त्यावर पुन्हा कर लावला जात होता. मी व्यापार करण्यासाठी, व्यवसाय करण्यासाठी जागा घेतली आहे. त्या व्यवसायातून उत्पन्न मिळविणार आहे. मी त्याकरिता जास्त पैसे मोजलेले आहेत आणि त्याप्रमाणे कर सुध्दा जास्त देत आहे. त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या 500 चौरस फुटाच्या निवासी गाळ्याला जर 500 रुपये असतील तर आपण कर प्रणालीप्रमाणे या कमर्शियल गाळ्याचे 2000 रुपये घेत आहात. याचे कारण काय तर तो व्यापारी आहे. मी व्यापार करण्याकरिता, पैसे कमाविण्याकरिता तो गाळा घेतलेला असताना मग त्या ठिकाणी बँक आणली किंवा आणखी कोणाला ती जागा दिली तर आपण प्रचंड पैसे आकारत होता आणि कर वसूल करीत होता. ही जी पध्दत होती ती या कायद्यातून नष्ट होणार असल्यामुळे यासंदर्भातील जी सूचना आहे ती स्वागतार्ह आहे. त्या लोकांनी व्यापार करण्यासाठी तेवढे पैसे मोजलेले आहेत. त्याप्रमाणे पैसे भरले आहेत तरी सुध्दा आपण त्यांना परत कर देण्यास सांगत होता. त्याच्या मनामध्ये लपवाछपवी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

करणे, खोटे ॲग्रिमेंट करणे, 100 रुपये मिळत असतील तर 25 रुपयेच घेतो असे सांगणे अशी जी लपवाछपवी होती ती बंद होईल. या अनुषंगाने यात तरतूद केलेली आहे ही एक चांगली बाब आहे. या विधेयकामध्ये एक त्रुटी आहे. हिंदुस्थानातील अशा प्रकारचे हे पहिलेच विधेयक आहे. आपण हा कायदा करीत आहात काय ? त्याबाबतीत 'होय' म्हणावे लागेल. कारण हे विधेयक आहे. आपण हे अंमलात आणू शकतो काय ? त्याबाबत खात्री नाही. कारण या विधेयकामध्ये परंतुक आहे. 'मुंबई महानगरपालिकेच्या इच्छेनुसार' असे यामध्ये म्हटले आहे. हा कायदा आम्ही मंजूर केल्यानंतर जुने ठेवावयाचे की नवीन ठेवावयाचे हे महानगरपालिकेने ठरवावयाचे आहे. त्यांनी जर सांगितले की, आम्हाला हे नको आहे तर त्याबाबत असा खुलासा केला की, याबाबतचा पर्याय खुला आहे. महापालिकेने जर आता नाकारले आणि दोन-चार वर्षानी वाटले की आपण ते पुन्हा करु तर ते घेता येईल. कारण पर्याय खुला आहे. त्यांना ते परत पुनर्विचाराकरिता घेता येईल. म्हणजे हा कायदा कसा डबलढोलकीचा आहे हे दिसून येते. यामध्ये करतो आणि नाही करत असे दोन्ही आहे. आपण त्या दिवशी सचिवांच्या संदर्भात जे म्हणाला त्याचा मला अभिमान वाटतो. ते आय.ए.एस. ऑफिसर आहेत, त्यांना कळत नाही काय ? ते खरोखरच हुशार आहेत. हा कायदा होईल की नाही ? त्यांनी निर्धार केलेला आहे की, हा कायदा करावयाचाच. त्यासाठी दुसरे एक छोटे विधेयक आणून ठेवलेले आहे. ते विधेयक आजच्या कामकाज पत्रिकेवर नाही पण पुढे ते विधेयक येईल. माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ या ठिकाणी उपस्थित आहेत. महापालिका कायद्याचे 69 (सी) कलम आहे. आपण कोर्टात जाऊन लढू असे सांगितले होते. तो कायदा या ठिकाणी मंजूर झाला होता. सिवरेज आणि वॉटरच्या बाबतीत स्थायी समितीचे अधिकार मर्यादित होते. ते अधिकार काढून घेतले होते. त्यानंतर कलम (डी) च्या संदर्भात दुसरा कायदा झाला. आता जनरल बॉडीच्या पूर्ण अधिकाराच्या संदर्भात नवीन कायदा आणला आहे. हे विधेयक आम्ही या ठिकाणी मंजूर केल्यानंतर उद्या महापालिकेने असे ठरवले की, आम्हाला हे मान्य नाही तर नकारात्मक ठराव झाल्यानंतर सरकार तो मंजूर करणार.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

म्हणजे या कायद्याची अंमलबजावणी करा किंवा करु नका हे महानगरपालिकेवर सोपविलेले आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळसाहेब यांना मी सांगू इच्छितो की, आपण या राज्याचे उपमुख्यमंत्री आहात मुंबई महानगरपालिकेचे संरक्षण करणे ही तुमची आणि माझी नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या ठिकाणी आणलेले हे विधेयक शासनाला मागे घेण्यास सांगावे. माननीय अर्थमंत्री असे म्हणाले होते की, सत्ता कोणाकडे आहे ? सत्तेत कोण आहे या पेक्षा राज्याच्या प्रगतीचा विषय असेल तर त्याकडे दोन्ही बाजूनी आत्मियतेने पाहिले पाहिजे. म्हणून मुंबई महानगरपालिकेला संरक्षण देण्याच्या दृष्टीने हे विधेयक मागे घेण्यासाठी आपण सरकारला भाग पाडावे. सभापती महोदय, कायद्याच्या संदर्भात नियम तयार करण्याचे अधिकार महापालिकेला दिलेले आहेत. हे नियम करण्याचे अधिकार स्थायी समितीला असणार आहेत की महानगरपालिकेच्या अधिका-यांना असणार आहेत ? या विधेयकाच्या संदर्भात सांगण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. मी मांडलेल्या सर्वच मुद्यांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी अपेक्षा नाही. परंतु या कायद्यामध्ये कमीत कमी त्रुटी राहाण्याच्यादृष्टीने मी जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्याची नोंद अधिका-यांनी घ्यावी. या कायद्याच्या संदर्भातील नियम महानगरपालिका करणार आहे. विधिमंडळामध्ये कायदा तयार झाल्यानंतर त्याचे नियम आपण करता. पण या विधेयकाच्या संदर्भात महानगरपालिका नियम करणार आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी केलेले भाष्य महानगरपालिकेपर्यन्त पोहोचू शकत नाही. या विधेयकाला पाठिंबा द्यावा की न द्यावा अशा द्विधा मनस्थितीमध्ये मी आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी माझे विचार मांडलेले आहेत. हे विचार मांडण्यासाठी मला संधी दिल्या बद्दल उपसभापती महोदय मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 72 - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त एक-दोन गोष्टींकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. हा कायदा करीत असताना बीपीटी आणि म्हाडाच्या कायद्यामध्ये बदल करावयास पाहिजे. त्या बाबतीत आपण काय काय केले, नियम झाले का हे सांगावयास पाहिजे. त्यामध्ये रिपेअर सेस हा एक भाग आहे. या कायद्याच्या संदर्भात आपण कमिटीमध्ये विश्लेषण केले होते. हा जगातील एकमेव असा कायदा आहे. कायदा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करावयाची की नाही हे तुम्ही ठरवायचे आहे. जगामध्ये अशा प्रकारचा कायदा कुठे नसतो. या कायद्याच्या संदर्भात महानगरपालिका नियम तयार करणार आहे. हे नियम नगरसेवकांच्या स्तरावर केले जाणार आहेत की आयुक्ताच्या स्तरावर केले जाणार आहेत याबाबत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. बीपीटी, आणि अन्य कायदे केन्द्र सरकार करणार होते. हे विधेयक सभागृहासमोर आणण्यापूर्वी ही सर्व प्रक्रिया पूर्ण करु असे आपण सांगितले होते. त्याबाबत काय झाले यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी सांगावे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भातील हे विधेयक सन 2006मध्ये सादर केले होते. या विधेयकाच्या संदर्भात 21 जुले् 2006 ला 15 सदस्यांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली. या समितीने 11 बैठका घेतल्या. जनतेकडून सूचना मागविल्यानंतर 63 सूचना समितीला प्राप्त झाल्या. या सर्व सूचना समितीने विचारात घेतल्या. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्यासंबंधी समितीमध्ये उहापोह झालेला नसला तरी या विधेयकाच्या संदर्भात साधकबाधक चर्चा करुन संयुक्त समितीने आपला अहवाल दिला आणि त्यानंतर हे विधेयक सभागृहासमोर चर्चेला आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे हे पर्याय निर्माण करणारे विधेयक आहे. हे कम्पल्शन करणारे विधेयक नाही. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर महानगरपालिका स्तरावर असलेल्या करप्रणालीमध्ये बदल होणार आहे. रेटेबल व्हॅल्यूवर कर आकारणी करावी की कॅपिटल व्हॅल्यूवर कर आकारणी करावी हे महानगरपालिकेने ठरवायचे आहे.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

त्यामुळे शासन त्यांच्यावर काही तरी लादण्याचा प्रयत्न करीत आहे अशातला भाग नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. सर्वोच्च न्यायालयाने या करप्रणालीमध्ये असलेले दोष दुरुस्त करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला रेटेबल व्हॅल्यूचा पर्याय दिला होता. त्यामुळे अनेक दोष निर्माण झाले होते. त्यातील काही दोषांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला आहे. रेटेबल व्हॅल्यूमुळे, जागेच्या भाडयावर ही करप्रणाली असल्यामुळे, रहिवाशी क्षेत्रात 83.05 टक्के कर बसत होता आणि कमर्शियलला 112 टक्के कर बसत होता. ते इतके सॅच्यूरेशन झाले होते की, अनेक ठिकाणी मोठमोठया कंपन्यांनी इमारती भाडयाने घेण्याचे बंद केले होते. या परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील आणि मुंबई शहरातील व्यवसाय राज्याच्या बाहेर गेला होता. मुंबई महानगरपालिकेची यासंदर्भात एकच करप्रणाली होती. त्यामुळे फार मोठा परिणाम झाला होता. शहर आणि उपनगरे अशी भांडणे लावण्याचे काम शासनाकडून होत आहे अशा प्रकारचे मत अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केले. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. कर आकारणीमध्ये पारदर्शी पध्दत असावी, पर्याय देणारी पध्दत असावी. तशी पध्दत आपण या विधेयकाच्या अनुषंगाने आणलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अनेक विषयांचा उहापोह या ठिकाणी केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे या विधेयकाच्या संयुक्त चिकित्सा समितीमध्ये सदस्य म्हणून कार्यरत होते. त्यांचे असे म्हणणे आहे की, यासंबंधीच्या पाच कायद्यांमध्ये बदल केल्याशिवाय हे विधेयकच मंजूर करता येणार नाही. त्यांनी जी सूचना केलेली आहे, त्या सूचनेबाबत साधक बाधक चर्चा संयुक्त चिकित्सा समितीमध्ये झालेली आहे. कर आकारणी कशा पध्दतीने करण्यात येणार आहे यासंबंधीची आम्ही सूची दिली होती. त्या सूचीप्रमाणे मुंबई उपनगर आणि शहरामध्ये कसे बदल घडत आहेत आणि उपनगरावर कसा अन्याय होत नाही हे सुध्दा सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासनाचे एवढेच मत आहे की, ही आकारणी कायदेशीरदृष्टया योग्य आहे. शासनाच्या विधी व न्याय विभागामार्फत सखोल तपासणी केल्यानंतर हे विधेयक सभागृहासमोर मंजुरीसाठी मांडण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, विशेषत: कर आकारणी करताना वयाच्या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे. जुन्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

इमारती आणि नवीन इमारतीच्या कर आकारणीत फरक करता येईल. यामध्ये वयाचा घटक महत्वाचा आहे. विशेषत: एसआरएच्या इमारतींवर कर आकारणी करणार आहोत. परंतु 500 चौरस फूटाच्या निवासी जागांना पहिली पाच वर्षे करवाढ करणार नाही. मूळ विधेयकाप्रमाणे पाच वर्षांनी दुप्पटीपर्यंतच वाढ करणार आहोत. सरकारी उपकराच्या, एसआरएच्या किंवा म्हाडाच्या ज्या इमारती आहेत. त्या इमारतीच्या बाबतीत कर आकारण्यासंबंधीची दुरुस्ती आपण स्वीकारलेली होती. पुनर्विकास, छोटी छोटी घरे अशा मालमत्तेवर कर आकारणी करता येणार नाही. शासन ज्याप्रमाणे ठरवेल त्या प्रमाणे याची आकारणी करता येईल. ज्या ठिकाणी गरीब माणसे रहात आहेत, दुर्बल घटक ज्या ठिकाणी रहात आहे, त्यांना कर आकारणीचा फटका बसणार नाही. म्हणून अतिशय चांगले, पर्याय देणारे व मुंबईत निर्माण झालेले सॅच्युरेशन दूर करणारे हे विधेयक आहे.

सभापती महोदय, यामध्ये एक गोष्ट अशी होती की, केंद्र शासनाची जेएनएनयूआरएम योजना आहे. राज्य शासनाने त्यांच्यासमवेत एमओयू केला आहे. त्यामध्ये असा पर्याय सांगण्यात आला होता की, विधेयकातच काही बदल करुन घ्यावेत. त्यास एका वर्षाची मुदतवाढ दिली होती. ती मुदत दिनांक 31 मार्च,2009 रोजी संपणार होती. मी सन्माननीय सदस्यांचा अतिशय आभारी आहे की, केंद्र सरकारच्या जेएनएनयूआरएम योजनेचा निधी मिळण्यासाठी या विधेयकास सभागृहाची मंजुरी मिळणे आवश्यक होती. सन्माननीय सदस्यांनी मला जे सहकार्य दिले त्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. यासंबंधीचे नियम शासन करणार आहे की महानगरपालिका करणार आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मी या सभागृहात स्पष्टपणे आश्वासन देऊ इच्छितो की.....

यानंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत/शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री.हसन मुश्रीफ.....

सुटसुटीत, गरीब लोकांवर अन्याय न करणारे, भ्रष्टाचारमुक्त, लूट होणार नाही अशा पध्दतीचे नियम शासनाच्या वतीने तयार केले जातील. हे नियम बनविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला निश्चितपणे शासनाकडून डायरेक्शन्स दिल्या जातील, शासनाकडून सहकार्य केले जाईल. चांगली करप्रणाली अंमलात आल्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. लोकांकडून वसूल करावयाच्या करामध्ये खूप वाढ होत होती ती रोखण्यासाठी हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल. या विधेयकाच्या विविध खंडांना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 22 सुधारणा सुचविलेल्या आहेत. त्यांना आपल्या सुधारणा मांडावयाच्या आहेत काय?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गरीब आणि श्रीमंत हा विचार या विधेयकामध्ये नाही. निवासी जागेमध्ये जे राहतात त्या जागेच्या मूल्यानुसार आवश्यक तो कर संबंधितांना द्यावा लागणार आहे. त्यामुळे गरिबीचा आव आणू नये. कायद्यात तसे नसते. 500 चौ.फुटापर्यंतच्या निवासी जागांबाबत कोणताही कर द्यावा लागणार नाही असे छातीठोकपणे सांगितले जात होते, ती बनवाबनवी आहे. संयुक्त समितीमध्ये आमच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी असा आग्रह धरला होता की, 500 चौ.फुटापर्यंतच्या निवासी जागांना या करप्रणालीमधून वगळण्यात यावे. शासनाने 500 चौ.फुटांच्या निवासी जागांना 5 वर्षाकरीता सूट दिली आहे. परंतु आमच्या लोकांनी आनंद व्यक्त करुन प्रेसपुढे जाऊन आपली मते मांडली. पाच वर्षे निघून जातील, त्यानंतर या निवासी जागा करप्रणालीमध्ये येणार आहेत. त्या जागेत राहणाऱ्या नागरिकांच्या करामध्ये वाढ होणार आहे. मी 22 सुधारणा दिलेल्या आहेत, परंतु मी त्या सुधारणा मांडू इच्छित नाही.

खंड 2 ते 58 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-72 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-72 संमत झाले आहे.

-------- (नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव)

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या संदर्भातील मुद्दा मीच आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. तो म्हणजे आज सकाळी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी जो कॉपी करण्यासंबंधीचा मुद्दा मांडला होता त्यासंदर्भात आमचाच गैरसमज झाला होता हे मला निदर्शनास आणून द्यावयाचे होते.

तालिका सभापती : काही अपप्रवृत्ती रोखण्यासाठी थोडे इकडे तिकडे होतच असते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी.: सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु .....

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पृ.क्र. 8, बाब क्र. 3, गृह विभागाच्या संदर्भात माझे विचार मी व्यक्त करणार आहे. "दि. 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेला दहशतवादी हल्ला" गृह विभागाने पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डचे आधुनिकीकरण, यासाठी वाढीव तरतूद करणे. त्यानंतर बाब क्र. 5 च्या संदर्भात "पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे", बाब क्र. 6 मध्ये "विशेष संरक्षण प्रशिक्षण शाळा", बाब क्र. 7 मध्ये पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे" अशा प्रकारचा सर्वच बाबींमध्ये उल्लेख केला असून त्यात कॉमन उल्लेख असा आहे की, "अलिकडेच झालेला दहशतवादी हल्ला लक्षात घेऊन पोलीस दलासाठी आधुनिक साधनसामुग्री तसेच सुरक्षेसाठी ही वाढीव तरतूद करण्यात आली आहे. या अनुषंगाने मला दोन तीन गोष्टी लक्षात आणून द्यावयाच्या आहेत. त्यात दि. 26.11.2008 रोजी मुंबईवर अतिरेकी हल्ला झाल्यानंतर मा. श्री. राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली होती. यासंदर्भातील सर्व प्रकारची माहिती जनतेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या दिवशी हा हल्ला झाला होता त्या दिवशी असे लक्षात आले होते की, आपले पोलीस कर्मचारी या हल्ल्याच्या ठिकाणी पटकन गेले होते. पण विशिष्ट प्रकारची स्ट्रॅटेजी डिझाईन करुन, पोलिसांच्या हातात शस्त्रास्त्रे देऊन त्यांना पोझिशन घेण्यास सांगितले असते तर जो रक्तपात झाला तो कदाचित झाला नसता. या अनुषंगाने आणखी काही गोष्टी ठरविणे आवश्यक आहे त्यात प्रामुख्याने आपले पोलीस दल हे व्यक्तीसापेक्ष आहे की संस्थासापेक्ष आहे ? उदाहरणच द्यावयाचे झाले तर मुंबईमध्ये आयुक्त एमएनसी नसतांना त्यांनी क्वीक रिस्पॉन्स टीम स्थापन केली होती. त्याच्या माध्यमातून काही लोकांची भरती केली होती, त्यांना मोटर सायकल दिल्या होत्या, त्यांना वेगळा गणवेश दिला होता. त्यांना शस्त्रे दिली होती, त्यांचा पगार दुप्पट केला होता. त्या माध्यमातून मुंबई शहरात गस्ती घालून छोट्या मोठ्या गुन्हेगारांवर जरब

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

बसण्यास मदत झाली होती. परंतु या गोष्टी आपल्या लक्षात आल्या नाहीत. नंतर ते बदलले गेले. पोलीस आयुक्त जर बदलला गेला तर पहिल्या पोलीस आयुक्तांनी लॉ अँड ऑर्डर किंवा दहशतवादासंबंधी एखादी यंत्रणा उभी केलेली असते ती यंत्रणा दुसरे पोलीस आयुक्त संपवून टाकतात. म्हणून गृह खात्याने एकदा निर्णय घेणे आवश्यक आहे. ह्या गाईडलाईन्स आहेत आणि संबंधित पोलीस आयुक्तांनी आपल्या अक्कल हुशारीने ती यंत्रणा कशी प्रभावी होईल हे पहायचे असते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

कायद्याचा अर्थ लावतांना न्यायाधीश आपल्या हुशारीने अर्थ लावत असतात, परंतु ते नियमांची किंवा घटनेची चौकट तोडत नसतात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात सुसूत्रता आणणे अत्यंत आवश्यक आहे. या ठिकाणी सुसूत्रता आणण्यासाठी निधी मागितलेला आहे. 26.11 च्या वेळेस नेमके काय घडले होते याची माहिती जनतेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबईवर अतिरेक्यांनी हल्ला केल्यानंतर त्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विरोधी पक्षाने सरकारची ऊणीदुणी काढली नाही, राजकारण केले नाही. परंतु आता सुध्दा त्या गोष्टीचा विचार केला नाही तर अनेक भयानक गोष्टी निर्माण होऊ शकतील. 26.11 रोजी मुंबईवर अतिरेक्यांनी जो हल्ला केला, त्यावेळेस एकूण तीन ठिकाणावरुन ऑपरेशन्स सुरु होती. पोलीस आयुक्तालयातून श्री. मारिया सूचना देत होते. रिगल सिनेमा समोर असलेल्या पोलीस महासंचालकांच्या कार्यालयातून उपमुख्यमंत्री, आणि पोलीस महासंचालक सूचना देत होते. तसेच मंत्रालयातून मुख्य सचिव 10 अधिका-यांना बरोबर घेऊन सूचना देत होते. ज्यावेळेस पोलीस महासंचालकांच्या कार्यालयातून रात्री दीड-दोनच्या सुमारास मुख्य सचिवांना बोलावून घेण्यात आले, त्यावेळेस मुख्य सचिवांनी उपमुख्यमंत्र्यांना उलटे उत्तर दिले होते. त्यांनी सांगितले होते की, मी येथे सर्वांना बरोबर घेऊन बसलेलो आहे, आम्ही वॉर रुम सुरु केलेली आहे. त्यावेळेस उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ठीक आहे, तुम्ही तेथूनच काम करा. त्यावेळेला पोलीस पटकन त्यांच्या जागेवर गेले, परंतु तिन्ही अधिकारी वेगवेगळया सूचना देत होते. अशा वेळेला ॲक्शनची डिझाईन फ्रेम केली असती व लगेच सगळयांना पोझिजशन घेण्यास सांगितले असते तर याबाबतीत लवकर निर्णय लागला असता व गोंधळही माजला नसता. त्यामुळे मला असे वाटते की, पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी आपण जे पैसे खर्च करीत आहात त्यामध्ये या बाबीचा देखील विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी आहे की, आपल्याकडे पोलीस आयुक्तालय व पोलीस महासंचालकांचे कार्यालय वेगवेगळे आहे. ब्रिटिशांच्या काळापासून पोलीस मॅन्युअल लागू असून त्यामध्ये बदल करणे फार आवश्यक झालेले आहे. त्यामुळे ही बाब शासनाने लाईटली घेऊ नये, नाही तर पुन्हा दुर्दैवी रक्तपात बघण्याची वेळ आपल्यावर येईल व गोंधळ निर्माण होईल. प्रत्येक दिवसाची माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

पोलीस आयुक्तांनी गृह सचिवांना द्यावयाची असते तसेच ती माहिती पोलीस महासंचालक यांनी उपमुख्यमंत्री किंवा गृहमंत्र्यांना द्यावयाची असते. खरे तर मुंबई पोलीस आयुक्तालय हे पोलीस महासंचालकांच्या अंतर्गतच आहे. अशा त-हेने आपण जर दुहेरी व्यवस्था निर्माण केली, आणि दुहेरी रिपोर्टींग केले तर पॉवर स्ट्रगल सुरु होईल असे मला वाटते. यामुळे मी पोलीस महासंचालकांना माहिती देणार नाही, मी माननीय मुख्यमंत्री किंवा गृहमंत्र्यांना माहिती देईन असे जर अधिकारी वागत असतील तर त्यामुळे तुम्ही मुंबई शहराला धोक्याच्या वळणावर नेऊन बसविल्याशिवाय राहणार नाहीत.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांमध्ये गृहविभागाने प्रत्येक ठिकाणी खरेदीसाठी पैसे मागितलेले आहे. टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांनी सन 2007-08 मध्ये मंत्रिमंडळाला एक अहवाल दिला होता. हे शासन बेजबाबदार आणि निष्काळजी असल्यामुळेच 26/11 च्या घटनेत निष्पाप लोक मारले गेले. यासंदर्भातील एक विदारक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो ती अशी की, टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने शासनाला दिलेल्या सन 2007-08 च्या फलनिष्पत्ती अंतरिम अहवालामध्ये सहा वर्षाच्या कालावधीत किती गोष्टी मंजूर झाल्या o किती गोष्टीचे टेंडर मागवले याचा ऊहापोह केला आहे. सन 2001 ते 2006 पर्यंत 376.43 कोटी रुपये पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, नियंत्रण करण्यासाठी आणि शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी दिले होते. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, त्यातील फक्त 66 लक्ष रुपयांची शस्त्रास्त्रे खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे हा अहवाल आपण त्यावेळेस सदनासमोर का आणला नाही ? निष्पाप माणसे मेल्यानंतर आज तुम्ही पैसे मागत आहात ? या ठिकाणी प्रशिक्षणासाठी सुध्दा पैसे मागण्यात आलेले आहेत. एक गोष्ट मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, सन 2002 ते 2006 पर्यंत प्रशिक्षणासाठी एक रुपया देखील आपण खर्च केलेला नाही. 1985 मध्ये श्री. इनामदार हे पोलीस आयुक्त असतांना फक्त ए.के.47 चे प्रशिक्षण देण्यात आले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

24 वर्षे एके 47 कशी चालवायची याचे प्रशिक्षण आपल्या अधिकाऱ्यांना दिलेले नाही. त्या पापाची फळे आपल्याला परवा भोगावी लागली. आता आपण पूरक मागणीद्वारे 150 कोटी रूपयांची मागणी केली आहे. आपल्या अधिकाऱ्यांनी गुन्हा केला आहे. त्यांना रूपये 346 कोटी देऊन फक्त 66 लाख रूपयांची शस्त्र खरेदी केली. पण अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण देखील घेतले नाही. प्रधान समितीने हे म्हटले आहे. त्यासंबंधी शासनाच्यावतीने माहिती दिली पाहिजे. ज्यांनी बेजबाबदारपणा दाखविला त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. कठोर पर्सोनल पॉलिसी नाही. वर्षानुवर्षे अधिकारी मुंबईत बसले आहेत. मंत्रालयाच्या बाजूला घर मिळाल्यामुळे आपले घर चांगले कसे राहील यामध्येच ते व्यस्त असातात. त्यामुळे जे अधिकारी कर्मचारी गडचिरोलीला गेले आहेत, त्यांना येथे आणण्याचा प्रयत्न करण्यात येत नाही. मुंबईत राहण्यामध्ये आयपीएस अधिकाऱ्यांचा व्हेस्टेड इंटरेस्ट असतो. आयपीएस अधिकाऱ्यांची फार मोठी लॉबी आहे. तेव्हा याविरूद्ध कठोरपणे विचार करणे आवश्यक आहे. गृह विभागाने शस्त्रात्रासाठी निधी मागितला आहे. यासंबंधी मी मंत्रिमहोदयांना हिशोब विचारू इच्छितो की, त्या दिवशी आपल्याकडे शस्त्रे किती होती? आज शासनाकडे किती शस्त्रे आहेत ? 77 ग्लॉब पिस्तूले आहेत. 300 ए.के.47 आहेत. 18 व्हीएलपी पिस्तूले आहेत. 135 इन्सान्स रायफल्स आहेत. 62 एल ॲण्ड जी आहेत. 80-9 एम.एम.कार्बाईन्स आहेत. 44 ए.के.47 सेलिंग आहेत. 400 एस.एल.आर.रायफल्स आहेत. एवढी शस्त्रात्रे आहेत. पण त्यापैकी 1/5 शस्त्रात्रेसुद्धा वापरामध्ये नव्हती. आम्ही हे सगळे बोललो नाही. कारण त्यावेळी दुर्दैवी वातावरण होते. त्या दिवशी गांभीर्य होते. त्यादिवशी निष्पाप नागरिक, मातब्बर अधिकारी आपण सर्वांनी गमावले होते. ही पापाची फळे कोणाची आहेत? या हल्ल्यासंबंधीची जबाबदारी आपण फिक्स करणार की नाही ? उत्तरदायित्त्व ठरविणार की नाही ? यासंबंधी आपण काही तरी विचार केला पाहिजे. परवा हल्ला झाल्यानंतर किती अधिकाऱ्यांना ए.के.47 चालविता येते हे बघण्याचा प्रयोग करण्यात आला. 75 टक्के अधिकाऱ्यांना एके 47 चालविता आली नाही. हा पोलिसांचाच अहवाल आहे. ग्लॉब पिस्तुल 25 टक्के अधिकाऱ्यांना चालविता आले नाही. काय ही आपल्या अधिकाऱ्यांची दयनीय अवस्था. आपण पूरक

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

मागण्यांद्वारे 187 कोटी रूपये मागितले आहेत. आणखी एक गोष्ट दुर्लक्षित करण्यात आली. ती मतांसाठी दुर्लक्षित केली गेली. गुप्तवार्ता विभागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आपण निधी मागितला आहे. अतिरेक्यांनी कुलाबा येथील नरीमन हाऊसवर हल्ला केला. या इमारतीमध्ये ज्यू लोक रहात होते. ताज-ऑबेरॉयमध्ये परदेशी नागरिक मोठ्या प्रमाणावर रहात असल्यामुळे तेथे हल्ला केला तर भारताची नाचक्की होईल हे अतिरेक्यांना सांगण्यात आले होते. हे स्थानिक मदतीशिवाय शक्य नाही, असा पोलिसांचा अहवाल आहे. त्यामुळे ही बाब प्रधान समितीसमोर आली पाहिजे. मुंबईवर हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांना स्थानिक मदत कोणी केली आहे ? स्थानिक मदत कोणी केली ही माहिती मुंबईतील नागरिकांना मिळाली पाहिजे. नोव्हेंबरमध्ये अतिरेक्यांनी हल्ला केला. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या तीन महिन्यामध्ये कॉन्स्टेबल पासून ते आय.पी.एस. अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी आपापसात चर्चा केली. पोलीस मॅन्युअलमध्ये डी ब्रीफिंग प्रकार आहे. सगळ्यांनी मिळून एकत्र येऊन हल्ला कसा झाला याची माहिती घेणे आवश्यक आहे. पहाटे साडेतीन वाजता कसाबला पकडले गेले. ज्यावेळी त्याची जबानी घेतली तेव्हा हे सगळे कळले. आज आधुनिकीकरणासाठी निधी मागण्यात येत आहे. पण आपली यंत्रणा निकामी कशी पडली हे यावरून दिसत आहे. पोलीस अधिकारी आज आपल्या स्वार्थासाठी पोलीस मॅन्युअलचा उपयोग करून घेतात. पोलीस मॅन्युअलप्रमाणे क्राईम डीपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांसमवेत पोलीस आयुक्तांची दर महिन्याला चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु, गेल्या दीड वर्षामध्ये गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांची पोलीस आयुक्तांबरोबर चर्चा झालेली नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

एवढया चो-या झाल्या, एवढे खून झाले, एवढया जबरी चो-या झाल्या यासंबधीचे अहवाल फक्त त्यांच्याकडे जातात. आता पोलीस विभागामध्ये नवीन पध्दत सुरु झालेली आहे . एखाद्या व्यक्तीकडे चोरी झाल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करीत असतांना तो सांगू लागला की, माझ्याकडे दोन लाख रुपयांची चोरी झालेली आहे .तेव्हा पोलीस त्याला असे सांगतात की, तक्रार लिहितांना या वस्तूची किंमत कमी लिहिण्यात यावी. म्हणजेच 1000 रुपयांची जर चोरी झाली असेल तर 100 रुपयांचीच चोरी झाली आहे असे लिहिण्यात येईल असे त्याला सांगण्यात येते. जबरी चोरी झाली असेल तर त्या चोरीचा वेगळया पध्दतीने तपास केला जातो. साधी चोरी झाली असेल तर त्या चोरीच्या तपासाकडे दुर्लक्ष करुन "चोर मिळाला नाही" असे सांगून ते प्रकरण फाईल करण्यात येते. पोलीस मॅन्युअलप्रमाणे क्राईम ब्रॅचमधील अधिका-यांची बैठक पोलीस आयुक्तांबरोबर दर महिन्याला होणे आवश्यक आहे व त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे .

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. राजकीय गोष्टी आता बंद करण्यात आल्या पाहिजेत. काही पोलीस शिपायांना आपल्याला प्रमोशन मिळावे असे वाटत असते, आय.पी.एस. अधिका-याला आयुक्त पदाचे प्रमोशन मिळावे असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु ज्यावेळी त्याला मोठया पदावर पोस्टींग मिळते त्यावेळी तो हिशोब चुकता करण्याची भाषा करु लागतो अशा प्रकारे हिशोब चुकता करण्याच्या प्रवृत्तीतून. श्री.शर्मा यांच्या सारखे एक दोन निरपराध आय.पी.एस. अधिकारी पोलीस विभागात गेल्यानंतर सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढलेले आहेत. तेव्हा अशा प्रकारे आपण करत्ता कामा नये. काही पोलीस अधिकाऱ्यांना मंत्र्यांच्या शिफारशी वरुन पद मिळते त्यामुळे तो अधिकारी त्या मंत्र्यांची हुजरेगिरी करीत राहतो. आयुक्त असो, डी.जी. असो, आय.जी. असो वा अन्य कोणताही अधिकारी असो. तो अधिकारी अशा प्रकारे हुजरेगिरी करीत असतो. श्री. अनामी रॉय यांच्या प्रकरणात आपण हेच पाहिलेले आहे. सभापती महोदय, गृह विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर माननीय श्री.जयंत पाटील यांनी एका वार्ताहराला असे सांगितले होते की, मला 300 ते 400 जण भेटावयास आले होते त्यापैकी 300 जण जिल्हा स्तरावरुन इकडे पोलिसांच्या बदल्या करण्यात याव्यात असे सांगण्यासाठी आले होते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

परंतु एकही अधिकारी किंवा पोलीस माझी बदली गुप्त वार्ता विभागात करावी किंवा ए.टी.एस.मध्ये करावी किंवा देशभक्त पोलीस अधिकारी म्हणून माझी बदली नक्षलग्रस्त भागात करावी त्या ठिकाणी मी माझे कौशल्य दाखवतो आणि कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवतो असे सांगण्यासाठी आला नाही. या ठिकाणी मी ज्या चार पाच गोष्टी प्रामुख्याने मांडलेल्या आहेत त्याबाबत खुलासा करण्यात यावा. अशी मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो. टाटा सोशल सायन्स इन्स्टीटयुशनचा जो अहवाल आहे तो सभागृहाच्या पटलावर ठेवणे आवश्यक असल्यामुळे तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा . एकूण 350 कोटी रुपये गृह विभागाला दिले होते त्यातील 66 लाख रुपये खर्च केले. तेव्हा गृह खात्यासाठी पुरवणी मागणी करीत असतांना मागच्या पूरक मागण्यांचे काय झाले आहे हेसुध्दा लक्षात आणून दिले पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. मुंबईमध्ये जो दहशतवादी हल्ला करण्यात आला होता त्यावेळी आपल्याकडे किती शस्त्रास्त्रे होती, त्याचबरोबर किती अधिकारी होते. या संदर्भात चौकशी करण्यात येईल आणि प्रधान समिती समोर ही बाब नेण्यात येईल.असे सांगण्यात आले होते तेव्हा त्याबाबतची माहिती देण्यात यावी.

सभापती महोदय, मी या ठिकाणी शेवटचा एक मुद्दा मांडणार आहे. महाराष्ट्रीयन आणि अमहाराष्ट्रीयन अधिकारी असा भेद मी कधीही करीत नाही परंतु हेमंत करकरे यांच्यासारखे महाराष्ट्रीयन अधिकारी दहशतवादी हल्यामध्ये दुर्देवाने मृत्युमुखी पडलेले आहेत. पोलीस दलात महाराष्ट्रीयन आणि अमहाराष्ट्रीयन यांची लॉबी आहे हे मी स्पष्टपणे या ठिकाणी सांगू इच्छितो. तेव्हा या अधिकाऱ्यांचे सगळे वायरलेस मेसेजेस टेप करण्यात आले पाहिजेत. हे सगळे अधिकारी त्या वेळी काय करीत होते, त्यांनी वेळीच ॲक्शन का घेतली नाही, त्यांनी त्यावेळी डिझाईन फ्रेम का केली नाही, या सगळया अधिकाऱ्यांनी त्यावेळी पोझिशन्स का घेतल्या नाहीत, त्यांना जी शस्त्रास्त्रे देण्यात आली होती त्या सर्व शस्त्रांस्त्रांचा वापर का केला नाही ? या सर्व बाबी जनतेसमोर येणे आवश्यक आहे तेव्हा ही सर्व माहिती देण्यात यावी एवढेच मी या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बोलतो तसेच सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी जो वेळ दिला त्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : पुरवणी मागण्यांवरील चर्चेबाबतची वाक्संहिता वाचावयाची राहिली असून आता ती मी वाचून दाखवितो. पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज गुरुवार, दिनांक 19 मार्च 2009 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी यासबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रस्तुत करण्यात आली आहे.प्रत्येक सदस्यांने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्याच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. ही चर्चा होत असतांना सन्माननीय गृह राज्यमंत्री अजूनही सभागृहात आलेले नाहीत तेव्हा त्यांना सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधीचा निरोप पाठविण्यात यावा. आता विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी भाषण केले आहे. त्यामुळे त्यांच्या नंतर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी दिली जाईल.

माझ्याकडील यादीत पहिले नाव श्रीमती फौजिया खान यांचे आहे परंतु त्या आता सभागृहात उपस्थित नाहीत. ही चर्चा सुरु असतांना त्या जरी सभागृहात आल्या तरी त्यांना मध्येच बोलण्याची संधी मिळणार नाही सर्व सन्माननीय सदस्यांचे बोलून झाल्यानंतर त्यांना संधी देण्यात येईल. आता सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी भाषण सुरु करावे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. उषा दराडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवर सुरु असलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता मी उभी आहे. याठिकाणी बाब क्र. 23 आणि पृष्ठ क्रमांक 23 मध्ये श्री. अंकुश ठोंबरे, राहणार दहिफळ वडमाऊली, तालुका केज, जिल्हा बीड याची जमीन पावसाळयात अतिवृष्टीमुळे जास्त पाणी झाल्यामुळे सांडव्याच्या पाण्याने वाहून गेली. त्याबाबत केज तालुक्याच्या तहसीलदारांनी त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवून देखील तो अजून प्रलंबित आहे. त्या प्रस्तावाकडे बीडचे जिल्हाधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे श्री. अंकुश ठोंबरेला ताबडतोब नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी मागणी करते. तसेच, बाब क्रमांक 34, पृष्ठ क्रमांक 37 मध्ये परळी हद्दवाढीचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. बीड जिल्हयाच्या परळी तालुक्यातील परळी या शहराच्या हद्दवाढीचा प्रस्ताव शासनाने मंजूर करावा अशी माझी विनंती आहे. बाब क्र. 37, पृष्ठ क्रमांक 41 मध्ये परळी येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत नाही याबाबत आम्ही विधी व न्याय विभागाकडे मागणी केली होती. त्याप्रमाणे माननीय मंत्री नामदार श्री. हसन मुश्रीफ यांनी एक बैठक घेऊन तेथील पाटबंधारे विभागाचे विश्रामगृह न्यायालयाला दिले, त्याचा ताबा देखील न्यायालयाला दिला. त्या विश्रामगृहाच्या दुरुस्तीकरिता 55 लाख रुपये लागणार असल्यामुळे त्याबाबत माननीय अर्थमंत्र्यांकडे मागणी करुन सुध्दा हे पैसे विधी व न्याय विभागाला मिळाले नाहीत. ते विश्रामगृह दुरुस्त झाले नाही तर येणाऱ्या पावसाळयात परळीला न्यायालय भरु शकणार नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा विषयाचे गांभीर्य पाहून हे 55 लाख रुपये वित्त विभागाने ताबडतोब उपलब्ध करुन द्यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 96, पृष्ठ क्रमांक 115 च्या अनुषंगाने शासकीय तंत्र निकेतन बीड येथे मुद्रण शाखेचा डिप्लोमा कोर्स आहे, त्याठिकाणी डिग्री कोर्सची व्यवस्था करण्यात यावी अशाप्रकारची मागणी मी संबंधित मंत्रिमहोदयांकडे केली आहे. त्याच बाबीच्या अनुषंगाने आणखी एक महत्वाचा मुद्दा असा की, दिनांक 31 जुलै 2008 च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय अनुदानित व शासन मान्यताप्राप्त विना अनुदानित, कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी आदेश काढण्यात आलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

ॲड. उषा दराडे...

आहे. परंतु या आदेशामध्ये पदव्युत्तर औषध निर्माण शास्त्र आणि पदवी बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांचा समावेश नजरचुकीने करण्यात आला नसावा असे मला वाटते. त्यामुळे एम. फार्मसी आणि बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांना या शुल्काचा लाभ मिळत नाही. या बाबीची माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी गंभीरपणे दखल घ्यावी.

बाब क्र. 42, पृष्ठ क्रमांक 47 च्या अनुषंगाने बीड-परळी-गेवराई येथील बायपास रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी करते. त्याचप्रमाणे बाब क्र.48, पृष्ठ क्रमांक 56 च्या अनुषंगाने कासारी, पिंपरवडा, कपीलधार, बुटेनालाचें साठवण तलाव त्वरीत करण्यात यावेत. काल माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी टुकूर प्रकल्पाचा उल्लेख केला.हा प्रकल्प करण्यासाठी गुत्तेदारांना वर्कऑडर देऊन दोन वर्षे झाली. परंतु काही लोकांनी त्याठिकाणी अडचणीची भूमिका स्वीकारली आहे. संपादित संघ, बी.आय.डी., जलसंपदा विभाग, डिव्हिजन बीड यांनी दि.6.2.2009 रोजी बीड जिल्हाधिकाऱ्यांना विशेष भू संपादन कायद्यातील कलम 17 प्रमाणे ही जमीन संपादित करावी अशाप्रकारचा प्रस्ताव दिला आहे. तो प्रस्ताव मंजूर करुन टुकूर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरु करावे अशी मी या ठिकाणी विनंती करते. सभापती महोदय, बाब क्र. 54 आणि पृष्ठ क्र. 60 च्या बाबतीत माजलगाव-आंबेजोगाई, शिरुर, धारुर, वडवणी या गावांमध्ये न्यायालये आणि न्यायालयातील कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची बांधकामे लवकरात लवकर करावीत अशी मी विनंती करते.

बाब क्रमांक 60, पृष्ठ क्रमांक 67 च्या अनुषंगाने दहिफळ-वडमावली, तालुका केज याठिकाणी नवीन एम.आय.डी.सी. करण्याचा प्रस्ताव दाखल झाला असून तो मंत्रालयाच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्याठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्यासाठी दहिफळ या गावामध्ये 350 एकर गायरान जमीन शिल्लक आहे. त्यामुळे तो प्रस्ताव लवकरात लवकर पूर्णत्वास यावा अशाप्रकारची माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 70 आणि पृष्ठ क्र. 77 च्या अनुषंगाने बीड जिल्हयात धान्य पुरवठयाच्या संदर्भात मी दोन वर्षापूर्वी एक लक्षवेधी सूचना दिली होती. संबंधित गुत्तेदारांनी धान्य पुरवठा केला नाही, कमी प्रमाणात धान्य पुरवठा केला असल्याचा आरोप केला होता. त्यावेळी शासनाच्या राखीव कोटयातून धान्य वाटप केल्याचे शासनाने उत्तर दिले होते. तेव्हा त्या गुत्तेदाराने राखीव कोटयातील धान्य परत दिले की नाही? आणि तो कोटा पूर्ण झाला की नाही?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

ॲड. उषा दराडे...

याबाबतीत काहीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, बीड येथील धान्य पुरवठयाच्या संदर्भात संपूर्ण चौकशी करण्यात यावी.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे . . . .

सभापती महोदय, बाब क्र.79, पान क्र.93 ही आरोग्य विभागाशी संबंधित आहे. मला याबाबतीत विनंती करावयाची आहे की,पोहनेर, शिरसाळा आणि सादोळा येथील पी.एच.सी. गोदावरी नदीच्या पूर रेषेमध्ये येतात आणि दरवर्षी याठिकाणी पाणी शिरते.केवळ जागा उपलब्ध नाही या सबबीखाली पोहनेर येथील पी.एच.सी.चे बांधकाम केले जात नाही.तेव्हा यासाठी जागा संपादित करुन तेथे ताबडतोब पी.एच.सी.सुरु करणे गरजेचे आहे. तसेच शिरसाळा येथे पी.एच.सी.सुरु करण्याच्या बाबतीत निर्णय होऊनही ते काम केले जात नाही. तेथे डॉक्टरांना रहाण्यासाठी चांगल्या क्वॉर्टर्स् नाहीत. मी आरोग्य विभागाच्या बाबतीत सांगत असताना, माननीय मंत्री महोदया डॉ.शोभाताई बच्छाव येथे उपस्थित आहेत.मला त्यांना विनंती करावयाची आहे. बीड जिल्ह्यामध्ये फार अडचणी निर्माण झालेल्या आहेत.तेथील जिल्हा, ग्रामीण, उप जिल्हा व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा ताबडतोब भरणे अत्यंत गरजेचे आहे. अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यापूर्वी त्यासंबंधातील पूर्ण अधिकार उप संचालकांना देऊन सदर पदे भरताना संबंधित जिल्हयाच्या जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मागणी नुसार संबंधित तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे गरजेचे आहे.वरील संस्थांमध्ये वर्ग-3 ची पदे त्वरित भरणे गरजेचे आहे.नर्सेस, मिश्रक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आयुर्वेद वैद्यकीय अधिकारी यांची देखील पदे भरणे गरजेचे आहे. जिल्ह्याबाहेर प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या ताबडतोब रद्द करणे गरजेचे आहे.तसेच सर्व आरोग्य संस्थेमधील एक्सप्रेस फिडर बाबतचा मुद्दा फार महत्वाचा आहे.याबाबतीत बीड येथील सिव्हील सर्जन फार दिवसापासून प्रयत्न करीत आहेत.त्यानुसार सर्व आरोग्य संस्थांमध्ये एक्सप्रेस फिडरसाठी एन.आर.एच.एम.मधून अनुदान उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.श्वानदंश लस खरेदीसाठी देखील एन.आर.एच.एम.मधून अनुदान उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.राज्य पातळीवरुन औषध पुरवठा पुरेसा व वेळेवर होत नाही या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाच्या संबंधातील बाब मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेली आहेच. बीड जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय गेवराई, परळी येथे कायम स्वरुपामध्ये पोलीस चौकी असणे गरजेचे आहे.मी या सर्व महत्वाच्या बाबींकडे सभागृहाचे आणि माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधलेले आहे,याबाबतीत न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करते आणि सभापती महोदय, आपण मला भाषण करण्यासाठी वेळ दिला, त्याबद्दल मी आभारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये आल्या पासून पूरक मागण्यांवर आणि अर्थसंकल्पावर बोलताना, मी कोकणावर सातत्याने अन्याय होत आहे असा मुद्दा मांडलेला आहे आणि इतर बऱ्याचशा गोष्टींबाबत विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यामध्ये एकमत देखील झालेले आहे.पण अनेक वेळा कोकणाचा विषय आल्यानंतर हे शासन आणि शासनाचे प्रतिनिधी सातत्याने कोकणावर अन्याय करीत असल्याचे दिसून आलेले आहे. मग तो मच्छिमारांचा प्रश्न असेल, आंबा बागायतदारांचा प्रश्न असेल, अशा प्रकारे कोकणातील कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यानंतर त्याबाबत सातत्याने दुजाभाव करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे दिसून आले आहे.अर्थसंकल्पाच्या बाबतीत,पुरवणी मागण्यांच्या बाबतीत दुजाभाव करतात, पण त्याहीपेक्षा राजकारणामध्ये देखील दुजाभाव केल्याचे आमच्या अनुभवास आलेले आहे. तीन वर्षापूर्वी या पक्षातून त्या पक्षामध्ये रेडीमेड नेता गेला आणि तेथे गेल्यानंतर मुख्यमंत्री करु असे त्यांना सांगितले. पण प्रत्यक्षात मुख्यमंत्री केले नाही. मग आपण कसे चांगले आहोत आणि सरकार कसे निष्क्रिय आहे किंवा मुख्यमंत्री कसे तुच्छ आहेत हे सांगून, त्याठिकाणी मंत्री पदावर असलेल्या तेथील रेडीमेड नेत्यांनी हे सरकार कसे निष्क्रिय आहे आणि कोकणावर कसा अन्याय केला जात आहे ? हे सांगण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. पण कोकणी माणसाच्या ताठपणामुळे शेवटी मंत्रीपद गमवावे लागले. मुख्यमंत्रीपद नाही .....

श्री.चंद्रकांत हंडोरे(खाली बसून) : बाब क्रमांक काय आहे ?

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी सांगतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्र बोलतात.)

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय,मी बाबीच्या संबंधात बोलणार आहे. कोकणी भाषेमध्ये मुलाला "बाबी" असे देखील म्हणतात.मी त्याबाबत बोलतो.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : ठीक आहे.आता सन्माननीय सदस्यांनी बाब क्र.व पान क्र.सांगावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, त्यावेळी देखील तशा प्रकारे अन्याय केला. याठिकाणी कोकणाच्या संदर्भात बोलताना तेथील बागायतदार,मच्छिमार आणि शेतकरी यांचा उल्लेख करावयास पाहिजे. पण आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटना घडत आहेत.आज तेथील मच्छिमारांना देखील अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागत आहे.

यानंतर कु. थोरात....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.....

सभापती महोदय, मी पृष्ठ क्रमांक 15, बाब क्रमांक 11, सुरक्षिततेसाठी गस्ती नौका यासंदर्भात बोलू इच्छितो. दोन महिन्यापूर्वी कोकणचे डी.आय.जी. श्री. फाटक जिल्हयामध्ये गेले असता त्यांनी गस्ती नौका येणार अशा प्रकारची घोषणा केली पण अजूनही गस्ती नौका आल्या नाहीत. त्याचा दुष्परिणाम असा झाला की, आज सकाळी कर्नाटक राज्यातील जवळ जवळ 200 बोटी मच्छिमारी करण्यासाठी आल्या. त्यापैकी जवळ जवळ 29 बोटी पकडण्यात आल्या आहेत. त्या बोटींवर कारवाई करण्याची आणि त्यांच्यावर केसेस दाखल करण्याची गरज आहे. मत्स्य दुष्काळाच्या अनुषंगाने सानुग्रह अनुदान देण्याच्या बाबतीत शासनाने उपाययोजना केली आहे. त्याचा सिंधुदूर्ग जिल्हयातील 12,300 लोकांना फायदा झाला आहे. त्यापैकी फक्त 3000 लोकांना अनुदान मिळाले आहे आणि 9300 लोकांना अद्याप अनुदान मिळण्याचे बाकी आहे. त्यासाठी तेथील लोकांनी आंदोलन केलेले आहे. परंतु त्या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. त्याकडे लक्ष देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. केंद्रीय डिझेल जो परतावा येतो त्या परताव्यापोटी यावर्षी 2 कोटी रुपये आले पण सिंधुदुर्ग जिल्हयाच्या वाटयाला फक्त 11 लाख रुपये आलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे येणे जवळ जवळ 4 कोटी 25 लाख रुपये आहे. पण त्याठिकाणी केवळ 11 लाख रुपये देऊन शासन गप्प बसलेले आहे. सभापती महोदय, मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 23, बाब क्रमांक 23, पाणी पुरवठा याबाबत बोलू इच्छितो. आज सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयातील अनेक गावे टॅन्करमुक्त झाली आहेत. पण गावे टँन्करमुक्त झाली म्हणून आता त्याठिकाणी प्रशासनाकडून टँन्कर मिळत नाही, त्यामुळे तेथील लोकांना पाणी मिळत नाही. तेव्हा त्याठिकाणी टँन्कर देण्याची घोषणा करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 23, बाब क्रमांक 24 बाबत बोलू इच्छितो. हत्तीच्या प्रश्नावर या सभागृहात सातत्याने चर्चा झालेली आहे. हत्तीने जवळ जवळ पाच माणसांना मारलेले आहे. या हत्तीच्या उपायायोजनेसाठी दोरखंड लावणे,चर खणणे, दोरखंडाला मसाला लावणे किंवा सौर ऊर्जेचे कम्पाऊंड करणे वगैरे उपाययोजना केली जाते. या वर्षातील शेवटची उपाययोजना म्हणून श्री. चौधरी नावाच्या व्यक्तीला 31 लाख रुपये देऊन हत्तीला परत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.....

घालविण्याचे काम दिले पण त्याने हत्तीला जास्त डोस दिल्यामुळे दोन हत्ती मेले आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील बाकीचे हत्ती आहेत तसेच आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील हत्तींच्या बाबतीत ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. आजच वर्तमानपत्रात एक बातमी आलेली आहे की, गवा रेड्याने एका महिलेला उचलून मारले आणि जखमी केले. गवा रेड्यांच्या बाबतीत सुध्दा योग्य ती उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पर्यटनाच्या दृष्टीने विमानतळासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. पण पर्यटनस्थळांसाठी आलेला निधी त्या ठिकाणचे प्रशासन तेथे पायवाटा तयार करणे, 200 मीटरचे रस्ते करणे यावर खर्च करीत असल्यामुळे पर्यटनस्थळांच्या दुरुस्तीसाठी कोणत्याही तऱ्हेची उपाययोजना केली जात नाही. तेव्हा पर्यटनस्थळांच्या दुरुस्तीच्या दृष्टीकोनातून ठोस उपाययोजना करण्यात याव्यात अशा प्रकारच्या सूचना करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

पान क्रमांक 30 व 31, शालेय शिक्षणाच्या संदर्भातील बाब क्रमांक 1 ते 4 बाबत बोलू इच्छितो. सभापती महोदय, या निमित्ताने मला तीन महत्वाच्या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे सध्या. इयत्ता दहावीच्या परीक्षा सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी बीड जिल्हयात इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत कसा गोंधळ घातला गेला याची हकीकत सांगितली आहे. मुंबईच्या उत्तर विभागाचे शिक्षण निरीक्षक श्री. सुरेश पवार यांनी चेंबूरच्या कुमुद विद्या मंदिरमध्ये परीक्षा सुरु असताना त्या ठिकाणी येण्याचा त्यांना कोणताही अधिकार नसताना प्रवेश केला.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

आणि पर्यवेक्षकाने अडवल्यानंतर मला तू ओळखत नाहीस काय असा प्रश्न करुन त्याच्या बखोटीला धरुन खेचत बाहेर काढले. दहा पंधरा मिनिटे गोंधळामध्ये गेली. मुले घाबरली. शिक्षकाला मारहाण केली गेली. पण आजतागायत त्याच्यावर कोणतीही कारवाई केली गेली नाही. यापूर्वी असे जर गैरवर्तन घडले तर त्या अधिकाऱ्याला तात्काळ त्याच दिवशी निलंबित केले जावयाचे. आता सचिवांनी चौकशीचे आदेश दिलेले आहेत पण आजपर्यंत तरी त्याचा निर्णय लागणे अपेक्षित होते. परंतु श्री. सुरेश पवार यांच्यासारख्या बेमुर्वतखोर अधिकाऱ्याने आपली दादागिरी करत शिक्षकांना छळण्याचे काम करावयाचे, मुख्याध्यापकांना उन्हात उभे करण्याचे काम करावयाचे, त्यांचे पगार अडवावयाचे, त्यांची बिले पास करण्यासाठी पैसे मागावयाचे, अशा सगळ्या भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकाऱ्याची आज हद्द झालेली आहे आणि तरी देखील त्याला का संरक्षण मिळत आहे हे कळत नाही. याचा माननीय शिक्षण मंत्र्यांनी आज आपल्या उत्तरात खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गेल्या अनेक अधिवेशनांमध्ये आम्ही मुंबईतील शाळांच्या संदर्भामध्ये वारंवार प्रश्न उपस्थित केले होते. मुंबईतील शाळा आणि कॉलेजच्या जमिनीवर मोठ्या लोकांचा डोळा आहे. अंधेरीतील एल.यू.एम.व्ही. कॉलेजच्या ठिकाणी मॉल बांधण्यासाठी संस्था चालकाने पूर्ण कॉलेज बंद केले. आजपर्यंत सरकार त्यांच्यावर कारवाई करु शकले नाही. अंधेरी एज्युकेशन ट्रस्टच्या शेठ माधव अमरसी हायस्कूल मधील गुजराथी माध्यमाचे वर्ग बंद करण्यात आले आणि आता इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुध्दा बंद करण्यात आले. आता मुंबईमध्ये दोन प्रकार सुरु आहेत. ते म्हणजे मॉल बांधण्यासाठी अनुदानित शाळा बंद करावयाच्या किंवा आयसीएसई किंवा सीबीएसई बोर्डाच्या शाळा सुरु करण्यासाठी असलेल्या शाळा बंद करावयाच्या. कारण त्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण नाही. एस.एस. कोडचे नियंत्रण नाही. या नव्या पध्दतीच्या शाळा पैसे कमविण्याची वारेमाप संधी असलेल्या मनी मेकिंग मशीन्स बनलेल्या आहेत. त्यामुळे अनुदानित शाळा बंद करण्याचा प्रकार वाढलेला आहे. या दोन्ही बाबतीत ताबडतोबीने हस्तक्षेप करुन ते थांबविण्याची आवश्यकता आहे. शेठ माधव अमरसी ही अनुदानित शाळा का बंद केली याबाबत त्यांना नोटीस पाठविणे आवश्यकच आहे पण अशा प्रकारच्या कोणत्याही शाळांना यापुढे एन.ओ.सी. देत असताना एस.एस. कोड लागू केले पाहिजे. याबद्दल शासनाने लवकरात लवकर निर्णय करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 93 वरील बाब क्रमांक 79 कडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. राज्यातील जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयांना आवश्यक त्या औषधांचा पुरवठा करण्यासाठी अतिरिक्त तरतूद यासाठी 5 कोटी 91 लाख 33 हजार रुपयांच्या एकूण खर्चाचा समावेश आहे. पण हा निधी अपुरा आहे असे मला वाटते. त्याचे कारण असे की, रेबीज सारखे आजार असतील किंवा सर्पदंश असेल त्या रुग्णांवर ताबडतोबीने औषधोपचार करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे एखादा मोठा अपघात झाला तर त्याही रुग्णांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी तातडीच्या शस्त्रक्रिया कराव्या लागतात. पूर्वी महाराष्ट्रात इतर ठिकाणी अपघात झाला तर त्यातील जखमींना मुंबईतील के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये किंवा सायन हॉस्पिटलमध्ये आणले जात होते. जरी मुंबई महानगरपालिका स्वायत्त संस्था असली तरी या हॉस्पिटल्सची स्थिती तेवढ्या ताकदीची राहिलेली नाही. त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. सावंत भांडत आहेत आणि मी सुध्दा भांडत आहे. मुंबई महानगरपालिका स्वयंसिध्द असताना ती अशी लाचार का झाली ? या सगळ्या रुग्णांना जर आपल्याला मदत करावयाची असेल तर आपल्याला साधारणपणे तीन महिन्यांमध्ये पाच कोटी रुपये तरी वाढवून घ्यावे लागतील असे मला आपल्याला सूचित करावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 14 वरील बाब क्रमांक 7 कडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. 26 नोव्हेंबरला मुंबई शहरावर मोठा आघात झाला. त्या आघातामुळे पोलिसांचे नितीधैर्य खचले असेल असे मी म्हणणार नाही. परंतु गृह खात्याच्या बाबतीत मी सांगेन. मी मुंबई शहरामध्ये राहते. आपल्या लोकांची आपसामध्ये इतकी भांडणे आहेत, त्यांच्यामध्ये इतकी गटबाजी आहे, त्यांच्यामध्ये इतका नातेवाईकपणा आहे की त्यामुळे सामान्य माणूस भरडून जातो. हा माझा की तू माझा यामध्ये बुलेटप्रूफ जॅकेट घालण्याचे प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत सुध्दा अधिकारीवर्ग निष्क्रिय ठरला असे चित्र मुंबई शहराने बघितले.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे चित्र भूषणावह आहे असे माझ्यासारख्या कार्यकर्तीला वाटत नाही. जगामध्ये मुंबई शहराचा पहिला क्रमांक लागतो असे भारतातील मंडळी कंठशोष करीत असतात. मुंबई शहरावर आतंकवाद्यांनी हल्ला केला. हे आतंकवादी कोठून आले आणि मुंबई शहरामध्ये त्याना कोणी मदत केली याचे आकलन अद्यापर्यन्त कोणालाही झालेले नाही. मुंबईवर जेव्हा असे आघात होतात त्यावेळी आमच्या सारखे कायकर्ते हास्पिटलमध्ये जातात, जखमींना रक्ताचा पुरवठा व्हावा, त्यांना नीट ओषधोपचार व्हावा म्हणून 24-24 तास काम करीत असतात. परंतु मंत्रिमंडळातील मंडळी मात्र तेथे दर्शन देण्याइतपतच दिसतात ही शोकांतिका आहे. सभापती महोदय, मच्छिमारांसाठी होड्या घेण्याबाबत तरतूद केलेली आहे. गोव्यापासून मुंबईच्या बेटापर्यन्त फार मोठा समुद्र किनारा आपल्याला लाभलेला आहे. या समुद्र किना-यावरुन कोण केव्हा आणि कुठून येतो याचा पत्ता लागत नाही. केन्द्र सरकार सांगते की, आम्हाला काही ठाऊक नाही, महाराष्ट्र सरकारने आम्हाला काही कळविले नाही. तेव्हा या विस्तीर्ण सागरी किना-याच्या सुरक्षिततेसाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करावी आणि महाराष्ट्राचे पोलीस दल सक्षम करुन मुंबई व महाराष्ट्र सुरक्षित करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय सन 2008-2009 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभागाच्या पृ.क्र. 8 वरील बाब क्रमांक 8 आणि पृ.क्र. 16 वरील बाब क्रमांक 14 मध्ये पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी व कर्तव्य बजावित असताना जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस अधिका-यांना/पोलीस शिपायांना व त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी तरतूद केलेली आहे. बाब क्रमांक 8 मध्ये राज्य सुरक्षा दल स्थापन करण्याचा विषय आहे. मला माननीय मंत्री महोदयांना हे विचारावयाचे आहे की, आपण राज्य सुरक्षा दल स्थापन केलेले आहे काय ? असल्यास त्याचे ट्रेनिंग वगैरे सुरु केलेले आहे काय ? असेल तर त्याबाबत सभागृहाला माहिती द्यावी. दुसरा मुद्दा असा आहे की 1978मध्ये एक परिषद स्थापन करण्यात आलेली होती. 26 नोव्हेंबर 2008 रोजी झालेल्या हल्ल्यानंतर आजपर्यन्त या परिषदेची एकही बैठक होऊ शकलेली नाही. ती बैठक झालेली असेल तर त्याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.इण्टेलिजन्सच्या फेल्युअरमुळे हे सर्व झाले असे म्हटले जाते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की या हल्ल्यामध्ये पोलीस दलातील अनेक पोलीस/पोलीस अधिकारी आणि सीएसटीवरील अनेक लोक मृत्यूमुखी पडले आणि अनेक लोक जखमी झाले. जखमी झालेल्या पोलीस आणि लोकांची रुग्णालयामध्ये अतिशय चांगल्या प्रकारे काळाजी घेण्यात आली. त्याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु हे लोक डिस्चार्ज घेऊन घरी गेल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारची पॅरामेडिकल ट्रिटमेण्ट मिळालेली नाही. उदा. काही जखमी झालेल्या पोलिसांना व लोकांना फिझिओथिअरपी घ्यावी लागते. त्याची प्रतिपूर्ती झालेली नाही. फिजिओथेरपीसाठी प्रत्येक वेळी 100 ते 200 रुपयापर्यन्त खर्च येतो आणि महिन्यातून दोन-तीन वेळा तरी फिजिओथेरपी घ्यावी लागते. तेव्हा या जखमींना घ्याव्या लागणा-या पॅरामेडिकल ट्रीटमेण्टची देखील प्रतिपूर्ती करावी अशी माझी सूचना आहे.

पृ.क्र. 17 वरील बाब क्रमांक 17मध्ये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत असताना कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने होमगार्डचे देखील आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. होमगार्डची 57500 मंजूर पदे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असून प्रत्यक्षात 42000 पदे भरलेली आहेत. 15500 पदे का भरण्यात आली नाहीत ? दुसरा मुद्दा असा आहे की, होमगार्डमध्ये येण्यासाठी लोक इच्छुक नसतात. कारण प्रायव्हेट सेक्युरिटी कंपन्यामध्ये त्यांना दुप्पट पगार आणि अन्य सुविधा मिळतात. या होमगार्डचे मुख्य श्री. राऊत यांनी असे स्टेटमेंट केले होते की, होमगार्डचे मानधन 75 रुपयावरुन 150 रुपये केलेले आहे. बाहेर 150 रुपया पेक्षा जास्त पैसे मिळतात. त्यामुळे या होमगार्डच्या मानधनामध्ये वाढ करण्यासंबंधीचा विचार करणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग, बाब क्रमांक 31 मध्ये पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि " एक सूर एक ताल" कार्यक्रम यावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते आहे. परंतु एक गोष्ट मी या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, जिल्हा परिषदेच्या 65 टक्के शाळा मुख्याध्यापकाविना आहेत. जिल्हा परिषदांच्या अनेक शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत. जिल्हा परिषदेच्या 58214 शाळा आहेत. त्यापैकी 35 टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे पदोन्नतीने भरलेली आहेत. जिल्हा परिषदांकडून नवीन मुख्याध्यापक नेमले जात नाहीत. या ठिकाणी शिक्षण विभागातर्फे सांगण्यात येते की, उर्वरित शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून मुख्याध्यापक नेमले जात नाहीत. त्या शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांना काळजीवाहू मुख्याध्यापक म्हणून काम पाहण्यास सांगितले जाते. शिक्षकांकडे इतरही कामांची जबाबदारी असते. ती कामे शिक्षकालाच करावी लागतात, त्यामुळे तो शिक्षक मुख्याध्यापकपद कसे भुषविणार ? शिक्षकाला विषय तासिका घ्यावी लागते, त्याला शालेय पोषण आहाराचे काम करावे लागते, पुन्हा त्यास शिक्षण देण्याचे काम करावे लागते. राज्यात जिल्हा परिषदेच्या 65 टक्के शाळा मुख्याध्यापकाविना आहेत. या गंभीर बाबीकडे शासनाने लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय,उद्योग विभागाची बाब क्रमांक 60, पान क्रमांक 67- रोगनिदान अभ्यासक्रम चालविण्यासाठी तरतूद केली आहे. महाराष्ट्रामध्ये 15 समूह प्रकल्पाचा रोगनिदान अभ्यासक्रम आहे. ही बाब नेमकी काय आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. उद्योगामध्ये असलेले आजार व त्यामुळे उद्योग विकास का खुंटतो आहे, उद्योग चालविण्यासाठी काय काय अडचणी येत आहेत याची माहिती घेतली जाणार आहे. यासाठी केंद्र सरकारचे अनुदान मिळते आहे. नेमका हा कार्यक्रम काय आहे यासंबंधीची माहिती माननीय उद्योग मंत्र्यांनी सभागृहास सांगावी.

सभापती महोदय, पान क्रमांक 81,बाब क्रमांक 73 ही समाजकल्याण महाविद्यालयांना अतिरिक्त सहायक अनुदान देणे संबंधीची आहे. या विषयाच्या बाबतीत अनेक वेळा बैठका झाल्या. अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. आज सकाळी देखील या विषयावर चर्चा झालेली आहे. समाजकल्याण विभागाकडून महाविद्यालयांना अनुदान दिले जाते. मुंबईमध्ये मागासवर्गीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी दिली गेलेली नाही. हा विषय मी, तसेच माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील गेल्या दोन अधिवेशनापासून सभागृहात उपस्थित करीत आहोत. परंतु याबाबतीत शासन कोणत्याही प्रकारची हालचाल करताना दिसून येत नाही. चेंबूर येथील सोमय्या महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी फी मिळावी म्हणून धरणे धरले होते, ते विद्यार्थी उपोषणाला देखील बसले होते. त्यावेळी समाजकल्याण मंत्री माननीय श्री. चंद्रकांत हंडोरे यांनी विद्यार्थ्यांना आश्वासन दिले की, याबाबतीत मी व्यक्तिश: लक्ष घालतो. परंतु त्याबाबतीत या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली दिसून येत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची फी देणे बाकी आहे. तांबे यांच्या महाविद्यालयाची फी देणे बाकी आहे. विकास एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची फी बाकी आहे. ही शैक्षणिक फी देण्याच्या बाबतीत शासनाचे निश्चित धोरण काय आहे याचा माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी खुलासा करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 79, पान क्रमांक 93- राज्यातील जिल्हा व उप जिल्हा रुग्णालयांना आवश्यक त्या औषधांचा पुरवठा करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. औषधांचा पुरवठा या विषयाच्या बाबतीत मी लक्षवेधी सूचना देखील दिली होती. दुर्दैवाने ही लक्षवेधी सूचना चर्चेला येऊ शकली नाही. औषध खरेदीच्या बाबतीत रेट कॉन्ट्रॅक्ट केले जातात. आरोग्य विभागाने औषध खरेदीसाठी आतापर्यंत रेट कॉन्ट्रॅक्टवर किती रक्कम खर्च केली आहे, कोणकोणती औषधे खरेदी करण्यात आली आहेत या बाबतची माहिती संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडून मी मागितली होती. पण दुर्दैवाने या राज्याला संचालकच नाहीत. संचालक, आरोग्य सेवा, या पदावर पूर्वी डॉ.सुभाष साळुंखे कार्यरत होते. त्यानंतर डॉ.डोके हे संचालक म्हणून कार्यरत होते. ते निवृत्त झाल्यामुळे संचालक, आरोग्य सेवा या पदाचा अतिरिक्त चार्ज डॉ.डाकोरे यांच्याकडे देण्यात आलेला आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्याला एक चांगला आरोग्य सेवा संचालक मिळू शकत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पावसाळा जवळ आलेला आहे. पावसामुळे राज्यात साथीचे रोग पसरण्याची भीती असते. अशा साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील जाणकार माणसाची गरज भासते. संचालक, आरोग्य सेवा कार्यालयात कोणीही जाणकार अधिकारी नाही. डॉ.डाकोरे यांच्यावर अनेक केसेस आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे सी.आर.शासनाने पहावेत. अशा माणसाला संचालक, आरोग्य सेवा या पदावर नेमणार आहात काय ? नेमणार असाल तर त्यांना कधीपर्यंत नेमणार आहात ? राज्यात अनेक औषध कंपन्यांनी एक्सपायरी डेटची औषधे गेल्या वर्षी डम करुन ठेवली आहेत. परंतु याबाबतीत संबंधितांविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. कोणत्याही औषध कंपनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकले गेलेले नाही. त्यामुळे आरोग्य विभागाच्या बाबतीत मला दोन, तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. केंद्र शासनाच्या पी.एच.यू.ना प्राधान्य का दिले जाते ? ते कमिशन एजन्टचे काम करतात म्हणून प्राधान्य दिले जाते काय ? डब्ल्यू.एच.ओ. आणि जे.एम.पी. च्या नियमानुसार ज्या औषध कंपनीला औषधे खरेदी करण्यासाठी ऑर्डर दिल्या जातात. त्या औषध कंपन्यांनी स्वत:च्या औषधांची निर्मिती केली पाहिजे. या पी.एस.यू.स्वत: औषधांचे प्रॉडक्शन करीत नाहीत. कर्नाटक ॲन्टीबायोटिक्स, भारत ॲन्टीबायोटिक्स या औषध कंपन्या नियमात बसत नसतानाही 105 औषधांची ऑर्डर का दिली जाते ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

हा प्रश्न गेल्या दोन अधिवेशनात उपस्थित करुनही अद्याप उत्तर दिले जात नाही. एनआरएचएम अंतर्गत अमाप निधी राज्य शासनाला प्राप्त होत आहे. या निधीची वासलात कशी लागते हे कळून येत नाही. हा निधी औषधांसाठी खर्च करण्याऐवजी इमारती बांधण्यासाठी, इमारतींच्या दुरुस्तीसाठी वापरला जात आहे. इमारतींची दुरुस्ती होणे आवश्यक असले तरी उपकरणे देखील महत्वाची आहेत. केवळ चार भिंती उभ्या करुन चालणार नाही.

सभापती महोदय, साथरोग नियंत्रणाची देयके अद्याप प्रलंबित आहेत. साथरोग नियंत्रणाची देयके अद्याप का प्रलंबित आहेत? साथीचे रोग दरवर्षी पावसाळयाच्या काळात बळावतात. यावर्षी मे महिन्यात आचारसंहिता संपल्यानंतर आदेश दिले जातील किंवा 31 मार्चपूर्वी कोटा पूर्ण करण्यासाठी आदेश दिले असावेत, परंतु आतापर्यंत काय कार्यवाही केली?

सभापती महोदय, बाब क्रमांक-86, पृष्ठ क्रमांक 97 वर कस्तुरबा आरोग्य संस्थेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब नमूद केली आहे. राज्यामध्ये अनेक सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक यांची पदे रिक्त आहेत. कस्तुरबा आरोग्य संस्थेमधील खाटांची संख्या 200 पर्यंत वाढविल्यानंतर त्याठिकाणी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी तरतूद केली आहे. परंतु ही पदे केव्हा भरणार आहात? एखादा उमेदवार वॉक इन इंटरव्ह्यूसाठी येतो त्यावेळी त्याला पेरीफेरीला पाठविले जाते. मुंबईमध्ये कोणी यायला तयार नाही. मुंबईचा उमेदवार पेरीफेरीला जाणार आहे का? जे.जे.रुग्णालयाला 120 कोटी रुपये दिल्याचे प्रत्येक वेळी आम्हाला सांगण्यात येते. प्रत्यक्षात जे.जे.रुग्णालय आणि नागपूरच्या मेडिकल कॉलेजला किती निधी दिला हे कधीतरी सभागृहाला कळणे आवश्यक आहे. सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयाला आधुनिकीकरणासाठी 120 कोटी रुपये दिल्याचे आपणही ऐकले असेल. त्यापैकी आजपर्यंत किती रक्कम खर्ची पडली? याचा हिशोब का दिला जात नाही?

सभापती महोदय, मुंबईच्या डेन्टल कॉलेजचे डीन यांच्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पत्र पाठविण्यात आले आहे. त्या पत्राची चौकशी केली जाणार आहे का? मी त्या डीनचे नाव घेऊ इच्छित नाही. त्यांच्यावर अनेक आरोप झाले आहेत. ते चांगले काम करतात की वाईट काम करतात याची मला कल्पना नाही. परंतु या संदर्भातील चौकशी झाली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील माननीय मुख्यमंत्र्यांकडे या संदर्भात पत्र दिले आहे. त्या पत्राची चौकशी करणार आहात का? हा माझा माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे.

सभापती महोदय, शासनाकडून अनेक जी.आर.काढले जातात. एखादा जी.आर.काढल्यानंतर तो एकाला लागू होतो तर दुसऱ्याला तो लागू होत नाही. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमधील ग्रंथपालांच्या पदाबाबत जी.आर.काढण्यात आला आहे. जे.जे.रुग्णालयामध्ये ग्रंथालय असेल तर तेथील ग्रंथपालाला पदोन्नती लागू नाही. परंतु जे.जे.वैद्यकीय महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये काम करणाऱ्या ग्रंथपालाला पदोन्नती लागू आहे. या ॲनामोलीचा फायदा घेऊन अनेक ग्रंथपालांना पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील अनेक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये हा प्रश्न निर्माण झाला आहे. मी श्री.भूषण गगराणी यांना पत्र दिले आहे. माननीय मंत्रीमहोदयांना पत्र दिले आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या संचालकांना निवेदन दिले आहे. श्री.आल्हाद नावाचे उपसचिव यासंबंधीच्या फाईलवर बसून आहेत. ते या प्रकरणात राजकारण का करीत आहेत?

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

(नंतर श्रीमती मधु जैन यांचे हिंदी भाषण श्री.शर्मा यांचेकडे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, गृह विभाग की बाब क्रमांक 5, पेज क्रमांक 13 के अन्दर 350 करोड़ रुपए की तरतूद की गई है, ताकि पुलिस के लिए अधिक हथियारों की खरीदी कर सकें. यह अच्छी बात है और जरुरी भी है. लेकिन हम यह देखते हैं कि शहरी पुलिस को सुविधाएं देने के मामले में सरकार अधिक ध्यान देती है. ज्यादातर होता यह है कि अपराधी शहर में वारदात करने के बाद गांव में जाकर आश्रय लेते हैं और उनको पकड़ने के लिए ग्रामीण पुलिस के पास बंदूक के अलावा और कोई शस्त्र नहीं है. उनको हथियार चलाने की ट्रेनिंग नहीं दी जाती है. इसलिए इस विषय में शासन को अधिक ध्यान देने की आवश्यकता है.

सभापती महोदय, यानंतर महसूल व वन विभागाच्या बाब क्र. 23 व 24, पान क्र. 24 कडे मी शासनाचे लक्ष वेधून असे निदर्शनास आणून देत आहे की, "नैसर्गिक आपत्तीचे नियोजन करताना जळगांव जिल्ह्यात व खान्देशात दरवर्षी केळी पिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होते, त्यांना न्यायोचित नुकसान भरपाई मिळावी अशी माझी विनंती आहे. यासंदर्भात मी आणखी एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, हाच मुद्दा मागील अधिवेशनात उपस्थित करुन मी ही मागणी केली होती. त्यावेळेस माननीय सभापतींनी निदेश दिले होते की, ज्यावेळी केळीच्या रोगाचा विषय येतो त्याबाबत एखादी समिती नियुक्त करावी आणि या नुकसानीबाबतचा निर्णय घ्यावा व काही नुकसान भरपाई द्यावयाची अथवा काय करावयाचे यासंदर्भात विचार करता येईल, असेही त्यावेळेस सांगण्यात आले होते. मला या निमित्ताने शासनाला असे विचारावयाचे आहे की, माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार समिती नियुक्त झाली काय ? असल्यास त्या समितीने कोणता निर्णय घेतला ? तसेच इतर पिकांच्या बाबतीत नुकसान भरपाई मिळते. जसे मुसळधार पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना औरंगाबाद, नागपूर अथवा अमरावती विभागात नुकसान भरपाई दिली जाते पण खान्देशमध्ये काहीच नुकसान भरपाई मिळत नाही. म्हणून यासंदर्भात शासनाने उचित कार्यवाही करावी.

यानंतर बाब क्र. 26 व 27, कृषी विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, फलोत्पादन करणाऱ्या विदर्भातील शेतकऱ्यांना सहाय्य देताना खान्देशातील विशेषत: जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या लिंबू, केळी व मोसंबी बागांचाही प्राधान्याने विचार करण्यात यावा. यासाठी सुध्दा शासनाने 288 कोटीची तरतूद पूरक मागण्यांच्या माध्यमातून केलेली आहे. पुन्हा नागपूर, भंडारा,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधू जैन .....

गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी मदत दिली जाते असे म्हणण्याची वेळ येते. खान्देशकडे मात्र नेहमीच दुर्लक्ष असते. यासंदर्भात मागील वेळेस मी आणि अनेक सनमाननीय सदस्यांनी मागणी केली होती की अतिवृष्टी तथा अनावृष्टीसारख्या कारणांनी नुकसान झाले, गारपीट झाली तरी देखील खान्देशातील शेतकऱ्यांना कुठलीच मदत दिली गेली नाही. इतर विभागात अशी मदत दिली जाते परंतु शासनाचे खान्देशकडेच दुर्लक्ष का होते हे समजत नाही, याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

सभापति महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग के बारे में काफी लोगों ने बोला है. मैं बाब क्र. 79, पृष्ठ क्र. 93 के बारे में मैं शासन का ध्यान जिला उप रुग्णालय में औषधि पुरवठा और खास तौर से उसकी क्वालिटी के बारे में आकर्षित करना चाहती हूँ. शासनाचे लक्ष वेधून मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, जिल्हा व उप रुग्णालयांना औषध पुरवठा करताना औषधांचा दर्जा व औषधांच्या साठवणुकीसाठी स्वतंत्र सुविधा निर्माण करण्यासाठी स्वतंत्र तरतूद करावी, अशी मी सूचना करीत आहे. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

....3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

प्रा. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

महोदय, पृ.क्र.32, बाब क्र. 30, खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील पाच वर्षाचे व्याज देण्याच्या संदर्भात 34,97,56,000 एवढी तरतूद करण्यात आली आहे. हे व्याज पाच वर्षाचे एकदम देत असताना ते उशिरा दिले जात आहे म्हणून माझी अशी सूचना आहे की, किमान मागील वर्षीचे व्याज पुढील वर्षात देण्याची तरतूद या माध्यमातून होणे आवश्यक आहे. आज राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जी वेतन पथक कायालये आहेत त्यांच्याकडे हे जीपीएफचे हिशेब ठेवले जातात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

अनेक ठिकाणी वेळेवर पावत्या मिळत नाहीत. पावत्या न मिळण्याची अनेक कारणे आहेत. यासाठी जेवढा स्टाफ शासनाने मंजूर केलेला आहे, जो आकृतिबंध मंजूर केलेला आहे तेवढा स्टाफ त्या ठिकाणी उपलब्ध नसल्यामुळे कामे होत नाहीत. अनेक कार्यालयांना तर जागा सुध्दा उपलब्ध नाहीत. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ठाणे येथील वेतन पथकाच्या कार्यालयात शिक्षकांच्या वेतनाचे महत्वाचे रेकॉर्ड ठेवले जाते. भविष्य निर्वाह निधीचे रेकॉर्ड या कार्यालयात असते, परंतु गेल्या पावसाळयात अनेक वेळेला या कार्यालयाच्या स्लॅबमधून पाणी आत आले व संपूर्ण रेकॉर्ड भिजले होते. परवा तर ठाणे येथील वेतन पथकाच्या कार्यालयाचा स्लॅबच कोसळला. हा स्लॅब रात्री कोसळल्यामुळे सुदैवाने जीवित हानी झाली नाही परंतु हा स्लॅब दिवसा कोसळला असता तर दोन-तीन कर्मचारी नक्कीच मृत झाले असते. इतका गंभीर प्रश्न या कार्यालयाच्या बाबतीत निर्माण झालेला आहे. स्लॅब कोसळल्यामुळे हे वेतन पथक कार्यालय दुस-या जागेवर हलवावे लागले. त्यामुळे वेतन पथक कार्यालयाला जागा उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक झाले आहे. त्याच बरोबर भविष्य निर्वाह निधीच्या खात्याच्या संदर्भात मी अनेक वेळेला सभागृहात विषय मांडलेला आहे. भविष्य निर्वाह निधीचे ऑडीट होणे आवश्यक आहे. अनेक जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात सस्पेन्स अकाऊंटस्मध्ये रक्कमा पडलेल्या आहेत. त्यामुळे या रकमेची वर्गवारी होणे आवश्यक आहे. या कार्यालयाचे संगणकीकरण होणे आवश्यक आहे. परंतु अद्यापही संगणकीकरण झालेले नाही. नगरपालिकांच्या ज्या शाळा आहेत त्यातील शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीची जी रक्कम आहे ती नक्की कोठे ठेवावयाची, त्या रकमेवर व्याज कशा प्रकारे मिळणार यासंदर्भात शासनाकडे अनेक वेळा पत्र व्यवहार करुनही शासनाने अद्यापही याबाबतचा निर्णय घेतलेला नाही. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत यासंदर्भात काल आणि आज अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. शिक्षकांचे पगार एक तारखेला होणे आवश्यक आहे, परंतु शासनाकडून मिळणारे अनुदान व ट्रेझरीमध्ये जमा होणारी रक्कम आणि ट्रेझरीकडून वेतन पथकाला मिळणारा चेक यामध्ये प्रशासकीय दिरंगाई होत असल्यामुळे शिक्षकांना वेळेवर पगार मिळू शकत नाहीत. राज्यातील सर्व शिक्षकांचे वेतन हे जिल्हा सहकारी बँकेमार्फत होत असते. या बँकेकडे करोडो रुपये पडलेले आहेत. या बँकाना शासनाकडून हमी मिळाल्यावर या बँका शिक्षकांचे पगार देण्यास

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

तयार आहेत. त्याकरिता या बँकानी ट्रेझरी कडून चेक घेण्याऐवजी शासनाने ही संपूर्ण रक्कम बँकेला परस्पर दिली तर बँक शासनाच्या गॅरंटीवर शिक्षकांना एक तारखेला वेतन देऊ शकेल. त्यामुळे शिक्षकांच्या वेतनामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडणार नाही. त्याकरिता बँकेच्या अधिकायांशी चर्चा करुन अशा प्रकारची योजना आखता येईल काय याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अंशदायी पेन्शन योजनेच्या संदर्भातील दि. 26 फेब्रुवारी, 2008 च्या शासन निर्णयातील त्रुटींच्या संदर्भात मागील अधिवेशनात मी विषय उपस्थित केला होता. त्यावेळेस तत्कालीन माननीय शिक्षण मंत्र्यांनी "आठ दिवसात या संदर्भातील सुधारित आदेश काढतो" असे उत्तर दिले होते. परंतु सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिल्यानंतरही यासंदर्भातील आदेश अद्यापपर्यंत निघालेले नाहीत. सुदैवाने आम्हाला चांगले सन्माननीय मंत्री महोदय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील तसेच सन्माननीय मंत्री महोदय श्री.पंचबुध्दे साहेब लाभलेले आहेत. चांगले काम करणारे हे मंत्री आहेत. तरी सुध्दा ते अजून चांगले काम करु शकतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, 18 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयानुसार 401 तुकडया अनुदानास पात्र ठरविण्यात आल्या. शासनाकडून एक तर वेळेवर अनुदान दिले जात नाही, ज्या तुकडया अनुदानास पात्र ठरविल्या आहेत त्याची यादी लवकर घोषित केली जात नाही. आता ऑगस्टमध्ये यादी घोषित करण्यात आलेली आहे. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये देखील या तुकडयांना अनुदान देण्याबाबत निर्णय झाला नाही. तसेच या अधिवेशनामध्येही तुकडयांना अनुदान देण्याचा निर्णय झालेला नाही. आता जुलै मध्ये अनुदान मंजूर केल्यानंतर आणि ते अनुदान ऑगस्ट, सप्टेंबर पासून लागू करणार. शासन कधीही पूर्वलक्षी प्रभावाने अनुदान देत नाही, व तसे शासनाकडून आदेश निघत नाहीत. अनुदानास पात्र असलेल्या तुकडया घोषित केल्यानंतर त्या तुकडयांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे. या तुकडया अनुदानास पात्र असूनही आपण तरतूद केलेली नाही. पुढील अधिवेशनात जेव्हा केव्हा तरतूद होईल त्यावेळी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे ऑगस्ट, 2008 पासून अनुदान द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये नवीन पद निर्माण झाले की, त्याला खात्याची मान्यता घेण्याची आवश्यकता असते, परंतु ही प्रथा अन्य कोणत्याही खात्यात नाही. माननीय शिक्षण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण या संदर्भातील फेरविचार करावा. सन 2005-2006, 2006-2007, 2007-2008 आणि 2008-2009 या चार वर्षाची जी पदे आहेत त्या पदांना शासनाने अद्यापही मान्यता दिलेली नाही. हे सर्व शिक्षक अनुदानित संस्थामध्ये कामे करीत आहेत. चार-चार वर्षापासून त्यांना वेतन मिळालेले नाही. आपण नवीन पदे मंजूर केली नाही व शासनाने या पदांना मान्यता दिली नाही म्हणून या शिक्षकांना वेतन मिळत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शासनाने पायाभूत पदांच्या संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, आता मी जो विषय मांडणार आहे, तो अनेकांनी मांडलेला आहे. त्या विषयाची मी फक्त आठवण करून देणार आहे. रात्रंदिवस आम्हाला एकच विषय सतावत आहे तो म्हणजे कायम विनाअनुदानित शाळासंबंधी जी.आर.काढण्याचा यासंबंधी आपण आम्हाला आश्वासन दिले आहे. झोपेमध्येसुद्धा आम्हाला श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आणि श्री.पंचबुद्धे साहेब दिसतात. तसेच कायम विनाअनुदानासंबंधी आंदोलन करणारे शिक्षक दिसतात. तेव्हा त्यांना आपण तातडीने दिलासा द्यावा व जी.आर.काढावा अशी मी विनंती करीत आहे.

महोदय, पान क्र.34, बाब क्रमांक 32 यावर मी बोलणार आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस साठी आपण रूपये 22.00 लाख इतकी तरतूद केलेली आहे. ही रक्कम केव्हाची आहे ? ही रक्कम सन 2000 पासून 2007 पर्यंतची आहे. सामाजिक काम करणारी ही चांगली संस्था आहे. या संस्थेला सुद्धा आपण 7-7, 8-8 वर्ष अनुदान देत नाही. झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती आपण करीत नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. वेळेवर या संस्थेला अनुदान मिळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

बाब क्र.83, पान क्रमांक 94 मी बोलणार आहे. साथरोग नियंत्रण योजनेखाली खरेदी केलेल्या औषधांच्या प्रलंबित देयकासाठी रूपये 1,91,50,000 ची तरतूद केली आहे. कोणत्या आजारासाठी आपण औषधे घेतली आहेत ? कोणत्या प्रकारची औषधे घेतली आहेत, केव्हा घेतली आहेत ? ही बिले केव्हापासून प्रलंबित आहेत ? याची पण माहिती मिळणे आवश्यक आहे.

बाब क्र.90,पान क्रमांक 103 वर मी आता बोलणार आहे. आदिवासी विभागाचा हा प्रश्न आहे. फक्त दोनच तुकड्यांना आपण अनुदान दिलेले आहे. आजही आमच्या आदिवासी भागामध्ये अशा तुकड्या आहेत की ज्या अनुदानास पात्र आहेत. अनेक वर्ग,शाळा अनुदानास पात्र आहेत. अद्यापही या शासनाने आदिवासी भागातील शाळांना, तुकड्यांना अनुदान दिलेले नाही. आदिवासी भागातील शाळांना, कायम विनाअनुदानित शाळा असली तरी सुद्धा अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. अनुसूचित जनजाती कल्याण समितीने निर्णय घेतला आहे की, अशा आदिवासी शाळांना पाच वर्षानंतर 100 टक्के अनुदान द्यायचे. त्यासंबंधी अद्यापि शासनाने निर्णय घेतलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

नाही. विचार सुरू आहे, अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे दिले जाते. ज्या दोन तुकड्यांना आपण अनुदान दिले आहे, त्या दोन तुकड्या कुठल्या शाळेतील आहेत, कोणत्या तालुक्यातील आहेत, कोणत्या जिल्ह्यातील आहेत, दोनच तुकड्यांना अनुदान का दिले यासंदर्भातील माहिती मिळणे आवश्यक आहे.

बाब क्र.96, पान क्रमांक 115 वर माझे विचार मी मांडणार आहे. सोलापूर विद्यापीठासाठी भूसंपादन करण्याकरिता नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठी 3 कोटी 47 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. हा खर्च होणे अत्यंत आवश्यक आहे. पण याच बरोबर मुंबई विद्यापीठाचे केंद्र ठाणे आणि कल्याण येथे कार्यालय होण्यासाठी, उप केंद्र होण्यासाठी वर्षानुवर्षे आम्ही प्रयत्न करीत आहोत. जागाही उपलब्ध झालेली आहे. तो भूखंड राखीव होता. त्याचे आरक्षणसुद्धा आता उठविले आहे. अद्यापही या उपकेंद्रासाठी शासनाने ही जमीन आपल्याकडे वर्ग करून घेतलेली नाही. अद्यापि आपल्याकडे उपकेंद्र सुरू केलेले नाही. आता वर्तमानपत्रात बातमी आली की, सन 2011 मध्ये उपकेंद्र सुरू करणार आहोत. आता जागा उपलब्ध झाल्यामुळे शासनाने ती लवकरात लवकर आपल्या ताब्यात घ्यावी आणि सोलापूर सारखेच मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र ठाणे, कल्याण येथे सुरू करण्यासंबंधी आपण निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करणार आहे. शासनाने किमान एका तालुक्यामध्ये एक तरी अनुदानित कॉलेज असावे असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. आज राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये महाविद्यालये सुरू झालेली आहेत. परंतु, जे एकमेव अनुदानित महाविद्यालय सुरू झाले आहे, ते शहरी भागामध्ये आहे. खरे म्हणजे ही योजना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आहे. ग्रामीण भागातील मुले, शेतकऱ्यांची मुले, कष्टकऱ्यांची मुले, शहरी भागामध्ये जाऊन शिक्षण घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ग्रामीण भागामध्ये महाविद्यालये सुरू केली. त्यांना जर शासनाचे अनुदान मिळाले नाही तर त्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर शुल्क भरावे लागेल. म्हणून शासनाने तालुक्यातील किमान एका कॉलेजला अनुदान दिले जाईल असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तेव्हा आपण ग्रामीण भागाचा विचार करावा. शहरी भागामध्ये कॉलेज आहे म्हणून ग्रामीण भागाला वगळणे हे बरोबर ठरणार नाही. ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

कल्याण तालुक्यातील गोविलेचे कॉलेज ग्रामीण भागामध्ये आहे. ते ग्रामीण भागातील एकमेव कॉलेज आहे. त्याला अद्यापि अनुदान मिळत नाही. तळ्याला एकमेव कॉलेज आहे. त्याला देखील शासनाने अद्यापि अनुदान दिलेले नाही. या महाविद्यालयांना अनुदान देण्यासंबंधी शासनाने विचार करावा असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, कोकण विभागासाठी स्वतंत्र बोर्ड करण्याचे शासनाने घोषित केले. त्याचा जी.आर.अद्याप निघालेला नाही. जमीन आता मिळाल्याचे म्हटले जाते. पण कोकण बोर्ड अद्याप तयार झालेले नाही. कोकण बोर्डासंबंधी देखील आपण तातडीने निर्णय घ्यावा अशा प्रकारची मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

कोकण बोर्डामध्ये कोण कोणते जिल्हे आणि कोण कोणते तालुके समाविष्ट करण्यात येणार आहेत यासंबंधीचा देखील निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा कोकण बोर्ड निर्माण होईल परंतु त्यांचे केन्द्र कोणत्या ठिकाणी असावे किंवा कोणत्या ठिकाणी नसावे यासंबंधी पुन्हा एकदा वाद सुरु होईल तेव्हा हे केन्द्र कोठे राहणार आहे तसेच कोणते जिल्हे आणि तालुके त्यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत याचा देखील निर्णय तातडीने घेण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्र्यांना विनंती करतो. सभापती महोदय, मला या चर्चेत भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महसूल आणि वन विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 24 पान नंबर 23 - लष्करी आळयांचा जोरदार हल्ला, मुसळधार पाऊस आणि गारपीट यामुळे सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, जळगाव, धुळे आणि नंदूरबार या जिल्हयात 2005, 2006, 2007, 2008 व 2009 साली गारपीट, वादळ आणि करपा रोगामुळे केळीच्या पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे.वास्तविक देशातील सर्वात जास्त केळी उत्पादन करणारा जळगाव जिल्हा आहे. त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या केळी पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान होऊन देखील त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. तेव्हा या शेतकऱ्यांना देखील नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो. त्याचबरोबर नंदूरबार, धुळे आणि जळगाव जिल्हयातील कापसावर लाल्या रोग पडल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे त्या शेतक-यांनासुध्दा नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय,यानंतर मला शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या पूरक मागण्यांसबंधी बोलावयाचे आहे. पान नंबर 32, बाब क्रमांक 30 मध्ये 2003-2004 च्या वर्षाकरिता खाजगी प्राथमिक शाळांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज आणि शासन अनुदानित अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या कर्मचारी वर्गाच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज यांचा खर्च भागविण्यासाठी 34 कोटी 97 लाख 56 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. परंतु सर्वसाधारण शिक्षणाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची पूरक मागणी करण्यात आलेली नाही. सर्वसाधारण शिक्षणाच्या संदर्भात राज्य अर्थसंकल्पातील स्थान अत्यंत चिंताजनक वाटते. राज्य अर्थसंकल्पामध्ये सर्वसाधारण शिक्षणावरील खर्च प्राथमिक, माध्यमिक, प्रौढ, भाषा विकास व शिक्षणाशी सबंधित असलेल्या खर्चाच्या प्रमाणात सातत्याने कमी होत आहे. 2008-2009 मध्ये देखील तुलनेने हा खर्च कमी झाला आहे असे दिसून येत आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आघाडी सरकारने 2000 साली किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या 7 टक्के निधी शिक्षणासाठी राखून ठेवला जाईल आणि त्यातील 75 टक्के खर्च प्राथमिक शिक्षणासाठी प्राधान्याने केला जाईल असे म्हटले होते मात्र प्रत्यक्षात फक्त 2.34 टक्के खर्च केल्याचे दिसून येत आहे प्राथमिक शिक्षणाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असून 75 टक्के खर्च केला जात नाही त्यामुळे शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावयास पाहिजेत. या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके , शिष्यवृत्ती दिली गेली पाहिजे त्याचप्रमाणे प्रसाधनगृहांची , पिण्याच्या पाण्याची सोय केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी होणार नाही. तेव्हा गळतीचा आणि स्थलांतरणाचा प्रश्न सोडविण्यासाठी वसतीगृहांची निर्मिती करणे आवश्यक आहे. 1 लाख 77 हजार विद्यार्थी पालकांबरोबर स्थलांतरित होत असतात. त्यामुळे वर्गामध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी दिसून येते त्यातूनच तुकडया टिकविण्याचा प्रश्न निर्माण होत असतो.

सभापती महोदय, फेब्रुवारी महिन्यात असा जी.आर. काढण्यात आला होता की ,वर्ग तुकडया टिकविण्यासाठी 25-30-15 विद्यार्थी संख्या हा निकष चालू वर्षासाठी राबविण्यात येईल अशा प्रकारे त्यावेळी असे सांगण्यात आले होते. परंतु मार्च महिन्यात असे सांगण्यात आले की, 2009-2010 या वर्षासाठीच तो निकष लागू राहणार आहे तेव्हा हा निकष नंतरच्या वर्षासाठी लागू करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. ही मागणी मान्य केली तरच वर्ग तुकडया संबंधीचा प्रश्न सुटू शकेल .

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत पूरक मागण्यांमध्ये तरतूद करणे आवश्यक होते .

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप सोनवणे...

परंतु ते झालेले दिसत नाही, म्हणून वेतनेतर अनुदानाची तरतूद होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्र. 54 आणि बाब क्र. 49 मध्ये मोठया व मध्यम पाटबंधारेवरील भांडवली खर्च याकरिता फार कमी प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. याकरिता जेवढया तरतुदीची अपेक्षा होती तेवढा निधी उपलब्ध केला जात नाही. कर्मचाऱ्यांवरील आस्थापन खर्चामुळे म्हणा, शासनाने हाती घेतलेले प्रकल्प पुरेशा निधीअभावी मागे राहिले आहेत. अशा प्रकल्पांमध्ये उदाहरण म्हणून जळगाव जिल्हयाच्या अमळनेर तालुक्यातील पाडळसरे येथील प्रकल्पाचे नाव सांगता येईल. या प्रकल्पाचे काम तरतुदीअभावी रखडले आहे. हे प्रकल्प पूर्ण झाले तर निश्चितपणे शेतकऱ्यांचा फायदा होईल आणि राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होईल.

सभापती महोदय, बाब क्र, 79 व पृष्ठ क्र. 93 मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा व उप जिल्हा रुग्णालयांना सामग्री व औषधे पुरवठा करण्यासाठी पूरक मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे करण्यात आलेल्या मागणीनुसार त्याठिकाणी त्वरित औषधांचा पुरवठा झाला पाहिजे. त्याचप्रमाणे या आरोग्य केंद्रामध्ये अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे त्याठिकाणी त्वरित नेमणुका झाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे जुनी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यांच्याकरिता नव्याने इमारतींची बांधकामे करण्यात आली पाहिजेत आणि त्याकरिता तरतूद करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 23, बाब क्रमांक 24 च्या बाबत सांगू इच्छितो की, पूर आणि चक्रीवादळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शासनाने मदत केली पाहिजे अशी आपली अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे पृष्ठ क्रमांक 97 व बाब क्रमांक 85 मध्ये वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन यामध्ये आयुर्वेदिक पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी तरतूद केली नाही. अशाप्रकारे इतर विद्यार्थ्यांचे विद्या वेतन परत करण्यासाठी तरतूद व्हावी अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 65 वर ग्रामोद्योग व लघु उद्योग या शीर्षकाखाली तरुण उद्योजकांना अल्प व्याज दरात कर्ज पुरवठा व अनुदान मिळते. तसेच, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये त्यांनी उत्पादित केलेल्या मालावरील जकात कर माफ होतो, काही ठिकाणी तो माफ करण्यात आला आहे. परंतु काही ठिकाणी तो सक्तिने वसूल केला जात आहे. एका बाजूला तरुण उद्योजकांना अर्थ सहाय्य उपलब्ध करुन व अनुदान देऊन उद्योग काढण्यासाठी त्यांना उद्युक्त केले जाते आणि दुसऱ्या बाजूला त्यांनी उत्पादित केलेल्या मालावर जकात कर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. दिलीप सोनवणे...

लावला जातो तो लावू नये. महानगरपालिका किंवा नगरपालिका त्याठिकाणी जकात कर लावण्यास सक्ती करीत असेल तर त्यांनी ती करु नये, यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती करतो. आपण मला या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांमधील गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 16 वरील बाब क्र. 12 मध्ये सागरी सुरक्षिततेसाठी 18 मच्छीमार होडया भाडयाने घेण्यासाठी 99 लक्ष 66 हजाराची तरतूद करण्यात आली आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. शासनाने या होडया भाडयाने घेऊन सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केला असला तरी या 18 होडया सुध्दा आपल्याला कमी पडणार आहेत. महाराष्ट्राला मोठा सागरी किनारा लाभला आहे, हे लक्षात घेऊन आपण जास्तीत जास्त तरतूद केली पाहिजे. त्याचप्रमाणे सागरी किनाऱ्यावरील मच्छिमार बांधवांना विश्वासात घेऊन त्यांच्या तरुण मुलांना होमगार्डच्या धर्तीवर रोजगार देऊन त्यांना प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. काल अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना मी या संदर्भात मागणी केली होती. आज सकाळी माननीय अर्थमंत्र्यांनी सभागृहामध्ये उत्तर देतांना सांगितले की, समुद्र किनाऱ्यावर रहाणाऱ्या मच्छिमारांच्या तरुण मुलांना होमगार्डच्या धर्तीवर प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देऊ. सभापती महोदय, ही सुशिक्षित बेरोजगार मुले आहेत, ती चांगल्या प्रकारे समुद्रामध्ये पोहू शकतात व चांगले काम करु शकतात. आणि म्हणून सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या तरुणांना प्रशिक्षण दिले तर त्याचा चांगला उपयोग होईल.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे नवी मुंबई आणि मुंबई ही कोळी आणि आगरी समाजाच्या त्यागावर उभी राहिली आहे. आज आपण या सभागृहामध्ये बसलेलो आहोत हे सभागृह देखील मच्छिमारांच्या त्यागावर उभे राहिले आहे. या मच्छिमारांसाठी शासनाने विमा उतरविला पाहिजे. हे लोक ज्यावेळी भर समुद्रात मच्छिमारी करण्यासाठी जातात त्यावेळी ते अपघातात सापडल्यानंतर त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होते.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

सभापती महोदय, मला असे वाटते की, शासनाने मच्छिमारांना विमा योजना लागू करण्याच्या बाबतीत विचार केला पाहिजे. त्याचबरोबर मच्छिमार व्यवसायाला देखील संरक्षण द्यावयास पाहिजे. गेल्या अनेक वर्षापासून किनाऱ्यावरील सुरक्षा ही बाब चिंतेची ठरलेली आहे. अशा वेळी मुंबई शहराला सुरक्षित ठेवावयाचे असेल तर किनारपट्टीवरील दक्षता पथकांची संख्या वाढविली पाहिजे, तसेच असुरक्षित किनारपट्टीचा सर्व्हे करुन बंदराच्या ठिकाणी देखील सुरक्षितता वाढविली पाहिजे.

सभापती महोदय,मला पान क्र.23 आणि बाब क्र.23 व 24 बाबत सांगावयाचे आहे.कोकण परिसरात नैसर्गिक आपत्तीमुळे झळ पोहोचलेली आहे.तसेच अवेळी पडलेल्या पावसामुळे मोठया प्रमाणात आंबा पिकांचे नुकसान झालेले आहे.त्यामुळे त्याबाबतही शासनाने विचार करावयास पाहिजे. ही नैसर्गिक आपत्ती असल्याने, शासनाने तेथील शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मला बाब क्र.34, पान क्र.37 बाबत सांगावयाचे आहे. या राज्यातील लहान आणि मध्यम शहरांमध्ये केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करीत असताना, या शहरांच्यालगत असलेल्या लहान खेडयांमध्ये देखील पायाभूत विकास करावा लागेल. कारण कालांतराने सदर गावांचे शहरामध्ये विलिनीकरण होते आणि मग लोकसंख्या वाढीमुळे तेथील सोयी-सुविधांवर ताण पडतो. त्यामुळे शहरालगतच्या छोट्या-छोट्या खेडयांचा विकास करण्याच्या बाबतीत शासनाने दृष्टीकोन ठेवला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.100, पान क्र.117 बाबत सांगावयाचे तर नवी मुंबई परिसरामध्ये अनेक शैक्षणिक संस्था, विविध विद्यालये, उच्च शिक्षणाच्या सुविधा निर्माण होत आहेत आणि आज पुण्यानंतर नवी मुंबईला "शिक्षणाचे माहेरघर" असे म्हटले जात आहे. नवी मुंबईमध्ये देशातून, विविध राज्यांतून अनेक संस्था आलेल्या आहेत.पण आज तेथे मुलींचे वसतीगृह नाही.त्यामुळे शासनाने त्याठिकाणी मुलींसाठी वसतीगृह बांधण्याकरता प्राधान्य द्यावे.सदनामध्ये संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत.त्यांनी ही बाब लक्षात घ्यावी की, पुण्यानंतर नवी मुंबई हे मोठे शहर म्हणून विकसित होत असताना, त्याठिकाणी शैक्षणिक नगरी निर्माण होत असताना तेथे विविध भागातून मुली शिक्षणासाठी येत आहेत. पण त्यांना भाड्याची खोली घेऊन रहावे लागते. आज सकाळीच सदनामध्ये रॅगिंगच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. हा सगळा विचार करुन शासनाने नव्या मुंबईमध्ये मुलींसाठी एक वसतीगृह असावे यादृष्टीने प्रयत्न करावेत अशी शासनाकडे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

सभापती महोदय, मला आणखी एका मुद्याचा उल्लेख करावयाचा आहे. विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना त्यांच्या नियोजित विकास निधी ऐवजी अनेक वेळा मतदार संघनिहाय अतिरिक्त निधी दिला जातो. तशा प्रकारे विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना देखील असा निधी देण्यात यावा याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, बाब क्र.104, पान क्र.121 बाबत सांगावयाचे आहे. याठिकाणी "जपणूक व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदाने" यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे. विशेषत: शहरी भागामध्ये आणि नव्या मुंबईमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात शहरीकरण झालेले आहे. याठिकाणी सुध्दा अशा संस्थांची जास्तीतजास्त गरज आहे असे मी शासनाला सांगू इच्छिते. सभापती महोदय, मला याठिकाणी भाषण करण्याची संधी दिली, त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद.

. . . .3 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पान क्र.5, बाब क्र.3 बाबत सांगावयाचे तर लोकसेवा आयोगातर्फे निरनिराळया स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात आणि त्या परीक्षेला हजारो विद्यार्थी बसतात. या स्पर्धा परीक्षेच्या कालावधीमध्ये आपण तरुणांकरता लोकसेवा आयोगातर्फे परीक्षा घेण्यासाठी खर्च करीत असतो. पण बऱ्याच वेळेला को-ऑर्डिनेशन नसल्यामुळे बँकांमार्फत, एल.आय.सी.मार्फत, लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा एकाच दिवशी होतात. अशा वेळी या तरुणांना निरनिराळया परीक्षेला बसावयाचे असते, पण ते सर्व परीक्षांना बसू शकत नाही, त्यापासून ते वंचित होतात. म्हणून याबाबतीत को-ऑर्डिनेशन करण्यात आले तर विविध परीक्षांना बसणाऱ्या तरुणांच्या दृष्टीने सोयीचे होईल. यावर्षी देखील असाच प्रकार घडला. लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी परीक्षा, बँकेमार्फत घेतली जाणारी परीक्षा, एल.आय.सी. मार्फत घेतली जाणारी परीक्षा आणि गृह विभागामार्फत घेतली जाणारी परीक्षा देखील एकाच दिवशी होत्या. मुळात हा उपक्रम अतिशय चांगल्या प्रकारचा आहे, परंतु जर यामध्ये को-ऑर्डिनेशन ठेवले तर विविध परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या राज्यातील तरुणांना सर्व परीक्षांना बसण्याची संधी मिळेल.

सभापती महोदय, पान क्र.14 वर गृह विभागाच्या संबंधातील बाब आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर राज्य शासनाने राज्य सुरक्षा दल स्थापन करण्याचे ठरविले. आपल्या राज्यामध्ये कोकण किनारपट्टी आहे. तेथील प्रत्येक जिल्ह्यामध्ये पोलीस दलाबरोबरच नागरी सुरक्षा दल स्थापन करण्यात आले. मात्र त्यांना पुरेसे साहित्य देण्यात आले तर नागरी सुरक्षा दलाचा चांगल्या प्रकारे उपयोग होईल. काही जिल्हयांमध्ये नागरी सुरक्षा दल आहे. तसे ते ठाणे जिल्हयामध्ये देखील आहे. पण त्यांच्याकडे स्ट्रेचर सुध्दा नाही. उदाहरण द्यावयाचे तर जर महापूर आला किंवा दुसरी एखादी घटना घडली तर अशा वेळी आम्हाला एन.जी.ओ.च्या मार्फत स्ट्रेचर उपलब्ध करुन द्यावे लागते.

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. संजय केळकर..

ठाणे जिल्हयामध्ये सिव्हिल डिफेन्स आहे परंतु त्यांच्याकडे साधे स्ट्रेचर सुध्दा नाहीत. महापूर आला किंवा अशा दुस-या काही घटना घडल्या तर त्यासाठी लागणारे स्ट्रेचर आम्ही त्यांना एन.जी.ओ. मार्फत दिलेले आहेत. मग गाडी आणि बाकीच्या साहित्याचा प्रश्न वेगळाच आहे. त्यामुळे नागरी सुरक्षा दलाला सक्षम केले तर त्याचा आपल्याला निश्चितपणे उपयोग होऊ शकतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 28, बाब क्रमांक 28 बाबत बोलू इच्छितो. शहापूर तालुक्यामध्ये 300 जनावरे अज्ञात रोगाने मरण पावली त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावयास पाहिजे असे शासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ही जनावरे मरत असतांना जिल्हयातील पशुवैद्यकीय अधिकारी त्या त्या केंद्रावर उपस्थित नव्हते त्यामुळे त्या जनावरांना औषधोपचार मिळालेला नाही. त्यामुळे 300 च्यावर जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. याबाबतची नुकसानभरपाई देण्यात यावी अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 34, बाब क्रमांक 32 बाबत बोलू इच्छितो. शासन निरनिराळया योजना राबविते. शाळांना क्रीडांगण असावे अशा प्रकारची एक योजना आहे. परंतु या योजनेसाठी असलेली तरतूद कमी असते त्यामुळे ग्रामीण भागातील शाळांना क्रीडांगणाची व्यवस्था करण्याकरिता पैसेच राहात नाहीत. विशेषत: ग्रामीण भागातील मुलांसाठी तेथील शाळांच्या क्रीडांगणासाठी विशेष अशा निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 37, बाब क्रमांक 34 बाबत बोलू इच्छितो. निरनिराळया राज्यातील लहान व मध्यम शहरांचा विकास होत आहे. नागरीकरण मोठया प्रमाणात होत असल्यामुळे ज्या ठिकाणी ग्रामपंचायती होत्या त्या ठिकाणी आपण नगरपरिषदा करीत आहोत. परंतु त्यांचा नियोजन आराखडा योग्य वेळी तयार केला गेला नाही तर ती शहरे बकाल होतील. यासंबंधीचे उदाहरण द्यावयाचे झाले तर ठाणे जिल्हयातील डहाणू शहराचा विकास आराखडा जवळ जवळ 15 वर्षापासून राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. त्या विकास आराखडयाला मंजुरी मिळाली नसल्यामुळे त्या शहराचा विकास योजनाबध्द पध्दतीने करता येत नाही. त्यामुळे विकास

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

आराखडे तातडीने मंजूर होण्याची आवश्यकता आहे. ठाणे जिल्हयामध्ये अशा काही ग्रामपंचायती आहेत की, त्या ग्रामपंचायती आता नगरपरिषदा आणि नगरपालिका होण्याच्या मार्गावर आहेत एवढी त्यांची लोकसंख्या वाढलेली आहे.त्या ग्रामपंचायतींचे योग्य वेळी नगरपरिषदांमध्ये रुपांतर केले आणि त्यांचा विकास आराखडा शासनाकडे देऊन तो मंजूर केला तर आज ग्रामपंचायतींची जी वेडीवाकडी वाढ होत आहे ती होणार नाही व नियोजित पध्दतीने आणि योग्य दिशेने त्यांचा विकास होऊ शकेल.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 47, बाब क्रमांक 40, शासकीय इमारतींची दुरुस्ती याबाबत बोलू इच्छितो. वेतनपथक कार्यालयाच्या बाबतीत अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. या वेतनपथक कार्यालयामध्ये 16000 शिक्षक आणि शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांची वेतन आणि भत्त्याची पत्रके तयार होतात. हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर लोकांची त्याठिकाणी वर्दळ असते. ठाणे जिल्हयातील वेतनपथक कार्यालयाची सन 2008 साली स्लॅब कोसळली होती त्यावेळी मी त्याठिकाणी गेलो होतो. मी ज्यावेळी त्या ठिकाणी भेट दिली त्यावेळी ती स्लॅब माझ्या समोरच कोसळली. ती माझ्या डोक्यावर पडली नाही हे नशीब. या बाबतीत आम्ही शासनाकडे गेले एक वर्षभर पाठपुरावा करीत आहोत पण अद्याप वेतनपथक कार्यालय तेथून दुसरीकडे हलविण्यात आलेले नाही. या वेतनपथक कार्यालयातील स्लॅब पुन्हा मागच्या महिन्यात दुसऱ्यांदा कोसळली आहे. कर्मचाऱ्यांच्या सुदैवाने ती रात्री कोसळली. नाही तर दोन-तीन कर्मचारी जागच्याजागीच मृत्युमुखी पडले असते. आजही वेतनपथक कार्यालयाची अवस्था वाईट आहे. जेथे 16000 कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते आणि बाकीच्या गोष्टींची कागदपत्रे तयार होतात त्या वेतनपथक कार्यालयाचे ताबडतोब स्थलांतर केले गेले पाहिजे. त्यांना योग्य व आवश्यक ती जागा मिळाली पाहिजे तसेच आवश्यक तो निधी दिला गेला पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 56, बाब क्रमांक 49, पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च याबाबत बोलू इच्छितो. .ठाणे जिल्हयामध्ये 16 पाटबंधारे प्रकल्प वन जमिनीमुळे गत 20 वर्षापासून अर्धवट स्थितीत आहेत. विचारणा केली असता असे सांगितले जाते की, वन जमिनीमुळे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

हे पाटबंधारे प्रकल्प अपूर्ण आहेत. ते प्रकल्प अद्याप पूर्णत्वास नेता आलेले नाहीत. ज्यावेळी मुंबईचा मध्यवैतरणा प्रकल्प झाला त्यावेळी वन जमिनीचा काही प्रश्न आला नाही. तो प्रकल्प ताबडतोब मंजूर झाला. परंतु ठाणे जिल्हयाकरिता असलेले प्रकल्प वन जमिनीमुळे अडवले जातात. त्यामुळे वन जमिनीसाठी लागणारी रक्कम भांडवली खर्चातून उभी करावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 85, बाब क्रमांक 76, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम याबाबत बोलू इच्छितो. घटनादत्त अधिकारान्वये आमदार त्यांच्या मतदारसंघात शासकीय निकषाच्या आधीन राहून विकास कामे सूचवत असतात.

यानंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

परंतु कामाच्या पूर्ततेसाठी असलेल्या ज्या संबंधित एजन्सीज आहेत मग जिल्हा परिषद असेल, सार्वजनिक बांधकाम विभाग असेल त्यामध्ये ज्या भागात विकास करावयाचा असेल त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेकडून नाहरकत प्रमाणपत्र मागविले जाते. परंतु काही ठिकाणी जरी आम्ही निधी दिलेला असला तरी राजकीय हेतूने नाहरकत प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे विकास कामांकरिता निधी दिलेला असताना ती कामे रखडतात किंवा तो निधी वाया जातो. त्यामुळे आमदारांच्या वैधानिक अधिकारांवर जी गदा येत आहे ती येऊ नये. आमदारांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याच्या अनुषंगाने शासनाने स्पष्टपणे सूचना द्याव्यात अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला या पूरक मागण्यांवर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेला असलेल्या पूरक मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 22 बाबत बोलू इच्छितो. मुंबईमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात या बाबीमध्ये 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या दहशतवादी हल्ल्यामध्ये शेकडो लोक जखमी झालेले आहेत. त्यातील अनेक जखमींवर अजूनही उपचार चालू आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये काही तरी तरतूद करावी अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 47 वरील बाब क्रमांक 42 बाबत बोलावयाचे आहे. रस्ते व पुलांच्या परिरक्षणासाठी व दुरुस्तीसाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी साधारणत: 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यावेळी पावसाळ्यापूर्वी रस्ते दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी ठेवण्यात यावा. गाव रस्ते, जिल्हा रस्ते, राज्य रस्ते यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले असतात. आपण त्यांच्या दुरुस्तीसाठी पावसाळ्यापर्यंत थांबलो तर ते खड्डे आणखी मोठे होतील. त्या ठिकाणी रोड पॅचिंगचे काम करण्यात यावे. आता निवणुकीमध्ये आपल्याला गाड्या घेऊन फिरावे लागणार आहे. त्यासाठी आताच तरतूद करता आली तर ती करण्यात यावी अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 48 वरील बाब क्रमांक 44 बाबत बोलावयाचे आहे. मुंबईमधील वरळी, नायगाव, शिवडी व डिलाईल रोड येथील बी.डी.डी. चाळींच्या परिरक्षणाकरिता व दुरुस्तीकरिता अतिरिक्त निधीची तरतूद करणे यासाठी साधारणत: 11.63 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, वरळी, नायगाव, शिवडी, डिलाईल रोड हा विभाग पूर्वीपासून गिरणी कामगारांचा विभाग आहे. त्या विभागात जास्तीत जास्त गरीब, दलित, मागासवर्गीय समाजातील लोक राहतात. त्या भागातील 85 ते 90 टक्के चाळी जुन्या झालेल्या आहेत आणि दुरुस्तीला आलेल्या आहेत. शासनाच्या नवीन धोरणानुसार त्यांची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. एमएमआरडीए आणि महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ यांच्या माध्यमातून मुंबईमध्ये घरांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT

श्री. सुभाष चव्हाण ....

उपलब्धता करुन या चाळींच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधीची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 56 वरील बाब क्रमांक 48 बाबत बोलावयाचे आहे. पाटबंधारे विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंहामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांना भागभांडवली अंशदान देण्यासाठी 23 कोटी 60 लाख रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. सन 1983 मध्ये चितळे समितीने कोकणातील सिंचनाबाबत महत्वाच्या शिफारशी केलेल्या होत्या. त्या शिफारशींचा आधार घेऊन त्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याची तातडीची गरज होती. कोकणातील सिंचनाबाबत सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे. कोकण पाटबंधारे महामंडळ हे फक्त कागदोपत्री राहिलेले आहे. आतापर्यंत फक्त आस्थापनेवरच खर्च करण्यात आलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये धामापूर हा सुंदर तलाव आहे. त्या तलावाची उंची अजून सापडलेली नाही. यासंदर्भात मध्यंतरी माननीय मंत्रिमहोदयांकडे बैठक घेतली होती. त्यावेळी महत्वाचे अभियंते उपस्थित होते. तो शिवकालीन तलाव आहे. त्या ठिकाणी कालवे, उपकालवे असल्याचा रेकॉर्ड आहे. जर या धामापूर तलावातील गाळ काढला, त्याची उंची वाढवली तर आजूबाजूच्या जिल्ह्यांना पाणीपुरवठा होईल. म्हणून या शिवकालीन तलावाच्या बाबतीत नोंद घेऊन कोकणातील सिंचन क्षमतेमध्ये वाढ व्हावी

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासाठी पाटबंधारे प्रकल्पांतर्गत कालवे, पोट-कालवे काढण्यासाठी तरतूद करावी अशी मी विनंती करतो. मी केलेल्या विनंतीचा शासन दरबारी विचार होईल अशी आशा करतो.

नियोजन विभागाच्या पृ.क. 85 वरील बाब क्रमांक 76 मध्ये आमदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी 5.3 कोटीची मागणी करण्यात आलेली आहे. आमदारांच्या निधीवर आमदारांचा काही अधिकारच नाही. हा निधी जणू काही माझाच आहे अशा त-हेने जिल्हा नियोजन अधिकारी वागत असतो.. तेव्हा या वृत्तीमध्ये बदल होण्यासाठी सिस्टिममध्ये बदल होणे आवश्यक आहे. काल मी या मुद्याचा या ठिकाणी उल्लेख केला होता. आता या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने पुनश्च एकदा यासंबंधी उल्लेख करीत आहे. हा स्थानिक विकास कार्यक्रमाचा निधी मंजूर करुन घेण्यासाठी जो विलंब होतो किंबहुना त्यासाठी ज्या अनेक खेपा घालाव्या लागतात त्या घाल्याव्या लागू नयेत म्हणून सिस्टिममध्ये बदल करण्यात यावा अशी माझी सूचना आहे. तसेच 1 कोटी असलेला स्थानिक विकास निधी 2 कोटी करण्यात यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृ.क्र.115 वरील बाब क्रमांक 96 मध्ये सोलापूर विद्यापीठासाठी भूसंपादन करण्याकरिता नुकसानभरपाई देण्यासाठी 3.47 कोटीची मागणी करण्यात आलेली आहे. सोलापूर विद्यापीठासाठी कोंडी-केडगाव, तालुका उत्तर सोलापूर या गावातील 600 एकर जमीन संपादित करावी लागणार आहे. जमिनीचे व्यवहार काही कारणास्तव अजून प्रलंबित आहेत. याबाबतीत त्वरित कार्यवाही करुन जमिनी ताब्यात घेण्यासंबंधी भूसंपादन अधिका-यांना सूचना देण्यात याव्यात आणि विद्यापीठाची इमारत व अन्य परिसर लवकरात लवकर विकसित करावा. यासाठी पुरवणी अर्थसंकल्पामध्ये अतिरिक्त तरतूद करुन सोलापूर विद्यापीठ लवकरात लवकर तयार करावे अशी मी शासनाला विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सन 2008-2009च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी उभा आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या पृ.क्र.97 वरील बाब क्रमांक 85 मध्ये राज्यातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतनाच्या संबंधातील खर्चासाठी 79.39 लाख रु.ची मागणी करण्यात आलेली आहे. फक्त शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने तरतूद केलेली आहे. मला असे वाटते की, अशासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील विद्यावेतन देण्याची आवश्यकता आहे. कारण हे शिक्षण अतिशय महागडे होत चालले आहे. आयुर्वेदामध्ये संशोधनाची गरज असताना त्या शाखेमध्ये विद्यार्थी उच्च शिक्षण घेत नाहीत. म्हणून अशासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील विद्यावेतन देण्यासाठी या तरतुदीमध्ये वाढ करावी अशी माझी सूचना आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र. 49 वरील बाब क्रमांक 45 मध्ये राज्यातील 8 जिल्हयांच्या ठिकाणी व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती बांधण्याकरिता मागणी करण्यात आलेली आहे. सांगली जिल्ह्यामध्ये व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिका-याचे कार्यालय आजही खाजगी इमारतीमध्ये भरत आहे. त्या कार्यालयासाठी तरतूद केलेली दिसत नाही. तेव्हा 8 कार्यालयामध्ये या सांगलीच्या कार्यालयाचाही समावेश करुन त्याचे बांधकाम करावे अशी माझी सूचना आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृ.क्र. 34 वरील बाब क्रमांक 32मध्ये महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् व गाईडस् मुंबई यांना सहायक अनुदान देण्यासाठी मागणी केलेली आहे. महाराष्ट्र छात्र सेना योजना सुरु करुन 10-12 वर्षाचा काळ लोटला. त्याठिकाणी शिकविणारा शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी यांना नवीन कपडे व बूट दिले जात नाहीत. जुने कपडे आणि बूट यावरच त्यांचा कारभार चाललेला आहे. या महाराष्ट्र छात्र सेनेसाठी देखील तरतूद करावी अशी माझी सूचना आहे.

बाब क्रमांक 34 मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धासाठी 30 कोटीची मागणी केलेली आहे. हे सर्व करीत असताना शाळांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा शिक्षणासाठी अथवा शारीरिक शिक्षणासाठी कोणतीही तरतूद करण्यात येत नाही. क्रीडा स्पर्धांच्या बाबतीत एनजीओजना मदत

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भगवान साळुंखे...)

केली जाते. परंतु शालेय क्रीडा शिक्षणासाठी मदत केली जात नाही. तेव्हा यासाठी देखील तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

गृह विभागाच्या पृ.क्र. 13 ते 18 वरील बाब क्रमांक 5 ते 18 संबंधी मी काही मुद्दे मांडू इच्छितो. मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाचे आधुनिकीकरण, बळकटीकरण, शस्त्र तसेच दारुगोळा खरेदी, इमारतीचे बांधकाम या गोष्टी करण्याचे शासनाने ठरविलेले असून त्यासाठी मागण्या करण्यात आलेल्या आहेत. हे सर्व आधुनिकीकरण आणि अन्य गोष्टी केल्या तरी दहशतवाद्यांशी मुकाबला करण्याच्या संदर्भात पोलिसांना प्रशिक्षण नसेल, अधिकारयांना प्रशिक्षण नसेल, त्यांचे काम संघटित नसेल तर दहशतवादाला ते प्रभावीपणे प्रतिरोध करु शकणार नाहीत असे मला वाटते.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

केवळ आधिभौतिकवादी दृष्टीकोन ठेवून गृह खात्याची सुधारणा होईल ही आपली भाबडी समजूत आहे. गृह विभागांतर्गत काम करणा-या आय.पी.एस. पासून जिल्हा, तालुका, गाव पातळीपर्यंतचे जे पोलीस कर्मचारी आहेत त्यांना दहशतवादी हल्ल्याशी मुकाबला करण्यासंदर्भातील अतिशय चांगले प्रशिक्षण दिले पाहिजे. पोलीस दलातील सर्व अधिकारी आणि पोलीस कर्मचा-यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशी माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, बाब क्रमांक 10 ही गृह विभागाशी संबंधित बाब आहे. या बाबी अंतर्गत पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मुंबई शहरात 26 नोव्हेंबर, 2009 रोजी दहशतवादी हल्ला झाला, त्यामुळे पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे आणि त्या अनुषंगाने नवीन अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज राज्यातील पोलीस कर्मचा-यांकडे अत्याधुनिक शस्त्रे शासनाने उपलब्ध करुन दिलेली नाहीत, त्यांच्याकडे फक्त लाकडी दंडुका दिलेला आहे. पोलीस कर्मचा-यांच्या हातातील दंडुका काढून घेऊन प्रत्येक पोलीस कर्मचा-यांना अत्याधुनिक शस्त्रे शासनाने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. पोलीस कर्मचा-यांना कोणत्या प्रकारची शस्त्रे द्यावयाची हा निर्णय राज्य सरकारने आपल्या स्तरावर घ्यावा. परंतु यापुढे पोलीस कर्मचा-यांकडे अत्याधुनिक शस्त्रे दिली गेली पाहिजेत आणि त्यांच्या हातातील दंडुका काढून घेतला पाहिजे अशी माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यात येईल, त्यांना अत्याधुनिक शस्त्रे तसेच दारुगोळा मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु आज पोलीस अधिकारी आणि कर्मचा-यांच्या मानसिकतेमध्ये बदल करण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण विभागातील एखादा सामान्य नागरिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी गेला तर तेथील पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी तक्रार नोंदवून घेत नाहीत. त्या सर्वसामान्य माणसाला पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवून घेण्यासाठी कोणाचा तरी राजाश्रय घ्यावा लागतो. एखाद्या राजकीय नेत्याला दूरध्वनी करावा लागतो, त्यावेळी त्याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये नोंदवून घेतली जाते ही अतिशय खेदजनक बाब आहे. म्हणून महाराष्ट्रातील सर्व पोलीस स्टेशन्स व्ही.डी.ओ.कॉन्फरन्सिगव्दारे जोडण्याचा मोठा कार्यक्रम राज्य शासनाला हाती घ्यावा लागणार आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये काय चालले आहे या गोष्टी राज्यातील पोलीस प्रमुखांना मुंबई येथील कार्यालयात दिसल्या पाहिजेत अशा प्रकारची व्यवस्था भविष्यात निर्माण करणे गरजेचे आहे व तशी यंत्रणा सत्वर कार्यान्वित करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, कृषि विभागाची बाब क्रमांक 24 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. लष्करी अळयांचा जोरदार हल्ला, मुसळधार पाऊस आणि गारपीट यामुळे पिकांचे

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

नुकसान झाल्याने शेतक-यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. शेतक-यांना सातत्याने मदत करणारे हे सरकार आहे. ज्या ज्या वेळी शेतक-यांवर संकटे येतात, त्या त्या वेळी शेतक-यांना आर्थिक सहाय्य देण्याचे काम या सरकारकडून केले गेले आहे. पिकांवर मोठा रोग पडला, गारपीट झाली, अतिवृष्टी झाली अशा कारणांमुळे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झाले तर त्यावेळी शासनाकडून नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत दिली जाते. लष्करी अळी प्रादुर्भाव झाला त्यामुळे सोयाबीन पिकाचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाडा विभाग, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हयात लष्करी अळीमुळे शेतक-यांचे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणच्या नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाने आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. परंतु अशा प्रकारची मदत करण्यापूर्वी सरकारने संपूर्ण राज्यातील सर्व पिकांच्या बाबतीत सर्व्हे केला पाहिजे आणि ज्या ज्या ठिकाणी पिकांची हानी झालेली आहे, तेथील नुकसानग्रस्त शेतक-यांना देखील आर्थिक मदत केली पाहिजे. राज्यातील सर्व शेतक-यांना शासनाकडून समान न्याय दिला गेला पाहिजे अशी मी या निमित्ताने शासनाकडे अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय,शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 31 वर मी माझे विचार व्यक्त करु इच्छितो. आज राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण सेवकांची भरती केली जाते. शिक्षण सेवक भरती करताना काही प्रमाणात गोंधळ होत होता. तो गोंधळ दूर व्हावा म्हणून राज्य शासनाने शिक्षण सेवक भरतीसाठी सी.ई.टी.परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

ही जी सेवापूर्व परीक्षा लागू केली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु आज शिक्षण सेवक भरतीबाबत सीईटी परीक्षा घेतली जाते, तिचा निकाल जिल्हानिहाय जाहीर केला जातो. त्यामुळे पालकांना व उमेदवारांना या राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये खेटे घालावे लागतात. त्यांचा नंबर कुठे आला आहे हे स्वत: जाऊन पहावे लागते. ज्याप्रमाणे इंजिनिअरिंग व मेडिकल प्रवेशाबाबत सीईटी परीक्षा घेऊन संपूर्ण राज्यस्तरावर निकाल जाहीर केला जातो, सर्वसामान्य विद्यार्थी किंवा पालक कॉम्प्युटरच्या माध्यमातून क्लिक केल्यानंतर निकाल पाहू शकतात, त्याच धर्तीवर येणाऱ्या 2009-2010 च्या शैक्षणिक वर्षापासून शिक्षण सेवकांच्या सीईटी परीक्षेबाबत बदल करुन संपूर्ण राज्याचा एकत्रितपणे निकाल जाहीर करावा. शालेय शिक्षण विभागाने यापुढील काळात अशी व्यवस्था करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-32, पृष्ठ क्रमांक-34 वर भारत स्काऊट गाईड आणि छात्रसेनेसाठी लातूर विभागाकरिता तरतूद केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रहित, राष्ट्रप्रेम जागृत व्हावे, त्यांच्या मनामध्ये तशी भावना निर्माण व्हावी यादृष्टीने भारत स्काऊट गाईड आणि छात्रसेना महाराष्ट्र शासनाने सुरु केली होती. परंतु मध्यंतरीच्या काळात ही योजना बंद झाली. जे काही तुटपुंजे अनुदान मिळत होते ते देखील शासनाने बंद केले. एक चांगली योजना शासनाच्या वतीने सुरु झाली होती. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रभावना निर्माण होत होती. विद्यार्थ्यांना खाकी ड्रेस व डोक्यावर टोपी घातल्यानंतर मिलिटरी सेवेत असल्याचा आनंद घेता येत होता. 26 जानेवारी, 15 ऑगस्ट या महत्वाच्या दिवशी विद्यार्थी सुटाबुटात पहावयास मिळत होते. भारत स्काऊट आणि गाईड व छात्रसेना हा विषय भविष्यकाळात ऑप्शनल न ठेवता शाळांमध्ये सक्तीचा केला पाहिजे. शिक्षणमंत्री निश्चितपणे या योजनेचा आढावा घेऊन ही योजना पुन्हा सुरु करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-45, पृष्ठ क्रमांक-49 वर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हयातील तालुक्याच्या ठिकाणी आय.टी.आय. स्थापन झाली असून त्यांच्या इमारतींचे बांधकाम सुरु आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद सुध्दा केली आहे. अशा पध्दतीने प्रत्येक तालुक्यामध्ये आय.टी.आय.स्थापन झाले पाहिजे व त्यासाठी स्वतंत्र इमारती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

देखील बांधल्या पाहिजेत. कारण ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याठिकाणी तंत्रशिक्षण घेण्याची सोय उपलब्ध होते. त्यांना याचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-73, पृष्ठ क्रमांक-81 वर समाजकल्याण विभागाच्या वतीने सामाजिक महाविद्यालये चालविली जातात त्या सामाजिक महाविद्यालयांना वेतनासाठी अनुदान दिले जाते. परंतु त्या ठिकाणी काम करणाऱ्या प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी भविष्य निर्वाह निधीची तरतूद केलेली नाही. महाराष्ट्रात सर्वच शिक्षण संस्थांबाबत आपण एकच तत्व स्वीकारतो. इतर महाविद्यालयांसाठी वेगळे तत्व आणि सामाजिक महाविद्यालयाबाबत वेगळे तत्व स्वीकारता येणार नाही. समान काम, समान हक्क या तत्वानुसार सामाजिक महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू केली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-98, पृष्ठ क्रमांक-116 वर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्याचा क्रांतीकारक निर्णय भारत सरकार आणि राज्य सरकारने घेतला आहे. आज हा निर्णय घेत असताना आपल्याला असा मर्यादित निर्णय घेऊन चालणार नाही. 20 हजार विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती देण्यात येणार असे म्हणून चालणार नाही. महाराष्ट्र राज्यात जेवढे अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्या सर्व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत मिळाली पाहिजे. यासाठी आदेशामध्ये बदल करणे गरजेचे आहे. भविष्यकाळात जून महिन्यातील अधिवेशनात यासाठी बजेटमध्ये तरतूद करावी आणि सर्वच शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जावी अशी विनंती करतो. खऱ्या अर्थाने अल्पसंख्याक समाजाचा विकास करावयाचा असेल तर अल्पसंख्याक समाजातील ज्या विद्यार्थ्यांचे वय आज 14 ते 15 वर्ष आहे, ज्यांचे शिक्षण घेण्याचे वय आहे असे विद्यार्थी शाळाबाह्य आहेत. बालकामगार म्हणून काम करीत आहेत. त्या सर्व लहान विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम भविष्यकाळात करावयाचे असेल, या समाजाला न्याय द्यायचा असेल तर आज प्रत्येक विभागाला पब्लिक स्कूल आहे त्याच धर्तीवर या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुध्दा चांगले पब्लिक स्कूल शासनामार्फत प्रत्येक जिल्हयामध्ये सुरु करावे. विचार शासनाने पुढील काळात करावा अशी विनंती करतो आणि मला संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या रु. 4644 कोटी 36 लाख 15 हजाराच्या खर्चाच्या पूरक विवरणपत्राला पाठिंबा देण्यासाठी व अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या निमित्ताने ज्या वाढीव तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यासंदर्भात मी काही सूचना मांडू इच्छितो. त्यात बाब क्र. 32, 2204-क्रीडा व युवक सेवा, मागणी क्रमांक, ई-3 या अनुषंगाने शासनाने स्काऊट गाईडसाठी चांगल्या प्रकारची तरतूद केली आहे. 100 टक्के पगार देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे जे नवीन जिल्हे तयार झाले आहेत त्या ठिकाणी नवीन स्टाफ नेमण्याची गरज आहे त्याचाही विचार व्हावा, अशी माझी सूचना आहे. कारण भारत स्काऊट गाईड हा अत्यंत चांगला उपक्रम आहे. त्या अनुषंगाने अत्यंत चांगल्या प्रकारच्या संस्था, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटसाठी वाढीव तरतूद करावी अशी माझी विनंती आहे. तसेच ज्या शिक्षकांना राष्ट्रपती पुरस्कार मिळतो असे आदर्श शिक्षक सुध्दा स्काऊट गाईडमध्ये असतात म्हणून या शिक्षकांना सुध्दा टिचर्स ॲवॉर्ड मिळावा म्हणून एखादे सेक्शन तयार करणे आवश्यक आहे, त्याचा शासनाने विचार करावा. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, स्काऊट गाईडसाठी आमदार निधीतून पैसे देण्यासाठी शासनाने परवानगी दिलेली आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

यानंतर क्र. 2235-एक्स-1, बाब क्र. 104, महिला व बालविकास विभागाच्या अनुषंगाने मला असे सूचित करावयाचे आहे की, मुलींच्या आधाराश्रमासाठी स्वयंसेवी संस्था काम करीत आहेत त्याच धर्तीवर नाशिकमध्ये अत्यंत चांगली एक संस्था कार्यरत आहे. त्या संस्थेत डेस्टिटयुट, ज्यांना पालक नाहीत अशा मुलांची काळजी घेतली जाते, अशा संस्थांना शासन या मागणीच्या माध्यमातून अनुदान देणार आहे त्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे. परंतु या अनुषंगाने मी अशी सूचना करु इच्छितो की, नाशिक येथे शासकीय मुलींच्या वसतिगृहाची मागणी जी अनेक वर्षांपासून केली जात आहे त्याला अजूनही मुहूर्त लागलेला नाही, याबाबत शासनाने नोंद घ्यावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर उद्योग, उर्जा व कामगार विभागातील लेखा शीर्ष क्र. 2801-वीज, के-6, बाब क्र. 59, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनी मर्यादित यांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही 108 कोटीची मागणी येथे करण्यात आली आहे. तसेच लेखा शीर्ष क्र. 6801, के-11 या मागणीच्या अनुषंगाने दाभोळसाठी 113 कोटीची तरतूद केली आहे. या दोन्ही मागण्यांचे मी स्वागत करतो आणि शासनाकडून अशी अपेक्षा करतो की, राज्यात शेतकऱ्यांना लोड शेडिंग मान्य आहे परंतु किमान दिवसाला आठ तास तरी कंटिन्युअसली वीज पुरवठा त्यांना व्हावा, कारण आठ तास वीज दिली तरच शेतकऱ्याला फायदा होऊ शकतो. त्या अनुषंगाने जी गरज आहे ती 32 के.व्ही.ए.चे सब स्टेशन्स, ट्रान्सफार्मर्स यांची व ती तातडीने पूर्ण करावी. त्यानंतर विजेची गळती आणि चोरी या दोन्ही गोष्टी तेवढ्याच महत्वाच्या आहेत. कारण "एक मेगावॅट विजेची बचत म्हणजेच एक मेगावॅट विजेची निर्मिती" असे आहे. म्हणून ही विजेची गळती थांबविणे आवश्यक आहे.

त्यानंतर 2245-महसूल व वन विभागाच्या संदर्भात मागणी क्रमांक, सी-6, बाब क्र.-24, नैसर्गिक आपत्ती निवारण यासाठी मी शासनाला खास धन्यवाद देणार आहे. प्रत्येक वेळेस जो मुसळधार पाऊस होतो, गारपीट होते आणि त्यासाठी ही 103 कोटीची तरतूद या मागणीच्या अनुषंगाने शासनाने सभागृहासमोर आणलेली आहे. काल सुध्दा सभागृहात मी सांगितले होते की, द्राक्ष, गहू आणि हरभरा या पिकाचे अवेळी पावसाने नुकसान झाले .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ SBT/ ST/ प्रथम श्री. खर्चे... 15:55

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदय, नाशिकमध्ये पडलेल्या अवेळी पावसामुळे व गारपिटीमुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले आहे त्यामुळे यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करुन येथील शेतक-यांना दिलासा द्यावा अशी विनंती करतो. या ठिकाणी ज्या पूरक मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत त्यांना पाठिंबा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आता विनियोजन विधेयक घेण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : खरे म्हणजे विनियोजन विधेयक चर्चेच्या शेवटी घेतले जाते त्यामुळे यासंदर्भात विरोधी पक्षाला कल्पना दिली तर बरे होईल.

उपसभापती : सभागृहात विरोधी पक्ष नेते उपस्थित असल्यामुळे विरोधी पक्षाला विनियोजन विधेयकाच्या संदर्भात कल्पना देण्याचा प्रश्न येत नाही.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (पुरवणी) विनियोजन विधेयक

L. A. BILL NO.I OF 2009

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2009.)

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 1- महाराष्ट्र(पुरवणी) विनियोजन विधेयक, 2009 विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारसी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L. A. BILL NO.II OF 2009

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2009-10)

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 2- महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2009 विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारसी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर यांना विनंती अर्ज सादर करावयाचा आहे. तो त्यांनी मांडावा.

पृ.शी./मु.शी.: विनंती अर्ज सादर करणे.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय, शॅम्पेन इंडिया, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे, रेनायसन्स वाईनरी प्रा.लि., ओझर, ता.निफाड, जि.नाशिक, सिग्राम इंडिया प्रा.लि., वलखेड, दिंडोरी, जि.नाशिक व युनाईटेड स्पीरिट लि.बंगलोर, व्हॅलिडीविन, सांजेगाव, ता.इगतपुरी,जि.नाशिक या कंपन्यांनी नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदारांची फसवणूक केल्यासंबंधी सर्वश्री नकूल दामू घुमरे, श्रीमती सिंधुबाई शिवाजी घुमरे, सर्वश्री तुकाराम नाना घुमरे, काशिनाथ नागू पवार व अन्य शेतकरी यांच्या स्वाक्षरीचा विनंती अर्ज मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

उपसभापती : विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

.....

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिस अहमद, मंत्री, यांनी दूरध्वनीवरून पोलीस अधिकाऱ्यांना केलेली दमदाटी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यातील एक मंत्री श्री.अनिस अहमद यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्यासंबंधीचा विषय या सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. तो विषय मी स्वत: मांडला आहे. खालच्या सभागृहामध्ये निवेदन होणार असेल तर ते येथे सुद्धा झाले पाहिजे.

श्री.जयंत पाटील : माझ्या माहितीप्रमाणे खालच्या सभागृहात निवेदनाची मागणी केलेली आहे. या सभागृहात मागणी केलेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही मागणी केलेली आहे. मी स्वत: सकाळी चर्चा उपस्थित केलेली आहे. कै.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर चप्पल घालून ते गेले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी पोलिसांना दमदाटी केली अशा प्रकारचा उल्लेख मी केला होता. एवढेच नव्हे तर त्यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल झाला होता, त्या विरोधात कोर्टामध्ये गेले होते, ते म्हणतात तो गुन्हा तसाच आहे, अशा प्रकारचा उल्लेख केला होता. कालचा गुन्हा तर फारच आहे. हा सगळा विषय आम्ही सदनामध्ये मांडलेला आहे. त्यामुळे येथे देखील निवेदन झाले पाहिजे.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सन 2008-2009 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.जयंत पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सभागृहासमोर 346 कोटी 65 लाख 3000च्या पूरक मागण्यांना मंजुरी देण्यासाठी चर्चा झाली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. 26 नोव्हेंबर रोजी झालेल्या हल्ल्याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. त्यातील उणिवा, सुधारणा यासंबंधी त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबत जो अनुभव आला त्याप्रमाणे जी सुधारणा करणे आवश्यक आहे, त्यासाठी विशेष बाब म्हणून निधी देण्याचा निर्णय झाला. त्यातून नवीन हत्यारे उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आणि ज्या काही त्रुटी आहेत, हे त्या घटनेनंतर लक्षात आले त्यात सुधारणा करण्यासाठी विशेष बाब म्हणून वित्त विभागाने काही निधी उपलब्ध करून दिला. त्या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. सागरी गस्ती नौका हा विषय मागणीत आहे. परंतु, आता केंद्र सरकारने समुद्र किनाऱ्याची जबाबदारी स्वत:कडे घेतलेली आहे. पूर्वी बारा नॉटीकल माईलपर्यंतची जबाबदारी राज्य शासनाकडे होती. या जबाबदारीच्या अनुषंगाने आपण अतिवेगवान नौका सागरीगस्तीसाठी वापरण्याचे ठरविले होते. त्यानुसार 12 गस्तीनौका घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. उरलेल्या नौका भविष्यकाळात घ्यायच्या असे ठरले. पण केंद्र सरकारने सागरीगस्तीचे काम त्यांच्या एका विभागाकडे देण्याचा निर्णय घेतला. केंद्र सरकारने आता समुद्रात गस्त घालण्याची व्यवस्था कोस्ट गार्डकडे देण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

तथापि सागरी गस्ती नौका खरेदी करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर ज्या काही नौका उपलब्ध होणार आहेत त्यांचा वापरसुध्दा गस्त घालण्यासाठी अधिक इफेक्टीव्हली करण्यासाठी राज्य सरकारने बराच विचारविनिमय केलेला आहे. अशा प्रकारे सागरात गस्ती घालण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या नौका घेण्याचा शासनाने निर्णय घेतला असून समुद्रात जर एखादा प्रसंग उद्‌भवला तर त्या प्रसंगालासुध्दा तोंड देण्याचे सामर्थ या गस्ती नौकामध्ये राहणार आहे. याचा अर्थ या नौका युध्दासाठी पूर्णपणे सज्ज असतील असा माझा दावा नाही. परंतु या नौकांचा वेग चांगला असेल त्याचबरोबर या नौकेमधील सैनिक अधिक प्रोटेक्शन असलेल्या व्यवस्थेत असतील अशा प्रकारच्या नौका शासन खरेदी करणार आहे व सागरी गस्तीसाठी या नौकांचा वापर करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रशिक्षणाच्या संदर्भातील मुद्दा मांडला आहे. सन्माननीय सदस्य श्री भगवान साळुंखे यांनीसुध्दा हा मुद्दा उपस्थित केला होता. उत्तम प्रकारचे प्रशिक्षण संबंधित पोलिसांना देणे आवश्यक आहे परंतु ज्यावेळी एखाद्या व्यक्तिची निवड पोलीस दलामध्ये होते त्यावेळी त्याला प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाते त्यानंतरच्या काळात त्यांना फक्त राबविण्यात येते. त्यांना अधुनमधून योग्य ते प्रशिक्षण देणे आवश्यक असते परंतु हया प्रशिक्षणापासून पोलीस वंचित राहतात. त्यामुळे फोर्स वन नावाचा सिक्युरिटी गार्डचा एक ग्रुप अलीकडे तयार करण्यात आला आहे आणि त्यांना विशेष स्वरुपाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात येत आहे. फोर्स वनच्या सैनिकांना जगातील सर्वोत्तम प्रशिक्षण मिळावे असा शासनाचा प्रयत्न आहे. हे प्रशिक्षण मिळाल्यानंतर असा प्रसंग पुन्हा घडला तर प्रशिक्षित जवान या प्रसंगाला चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकतील जेणेकरुन एन.एस.जी.ची वाट आपल्याला पहावी लागणार नाही.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांकडून अनेक चांगले मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. होमगार्ड संघटनेचा येथे उल्लेख करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या वतीने मी सांगू इच्छितो की, होमगार्ड संघटना ही मानसेवी स्वरुपाची आहे. समुद्र किना-यावरील जी गावे आहेत त्या गावातील सर्व तरुणांना होमगार्ड संघटनेचे सदस्यत्व देण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

यावे अशी मागणी करण्यात आली त्याबाबत मी खुलासा करु इच्छितो की, ज्यांची इच्छा असेल आणि जे शारीरिक दृष्टया पात्र असतील त्यांना निश्चितपणे या संबंधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. 18 ते 50 वर्षापर्यतच्या व्यक्तिना होमगार्डमध्ये सहभागी होता येईल अशी अट आहे तेव्हा त्यातील काही जणांचा होमगार्ड मध्ये समावेश करुन त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यानी यासंबंधीची विनंती केली होती त्या प्रमाणे या व्यक्तिांना होमगार्ड संघटनेचे सभासदत्व मिळण्याची संधी दिली जाईल.

सभापती महोदय, मच्छिमारांच्या मुलांपैकी इच्छुक मुलांची या संघटनेत भरती करण्यासाठी विशेष भरती मोहिम राबविण्यासाठी संचालनालयाला ताबडतोब निदेश देण्यात यावेत अशी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मागणी केली होती त्यांनी केलेली मागणी रास्त आहे त्यामुळे या संदर्भात संचालनालयाला ताबडतोब निदेश देण्यात येतील.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्या सर्वच सूचनांचा उल्लेख मी करु इच्छित नाही. एके 47 चे ट्रेनिंग 1985 पूर्वी झाले होते .आज एके 47 पोलीस दलात आहे किंवा नाही असे सन्माननीय सदस्यांकडून विचारण्यात आले होते त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, पोलीस दलाकडे एके 47 आहे. रेग्युलर पध्दतीने त्याबाबत प्रशिक्षण देण्यासाठी आणि त्यांना ॲम्युनेशनाचा पुरवठा करण्यासाठी वित्त विभागाने गृह खात्यासाठी खर्च मंजूर केलेला आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे गन आहे, रिव्हॉल्वर आहे , 302 रायफल आहे अशा पोलीस दलातील व्यक्तिला वर्षातून विशेष प्रशिक्षण मिळावे म्हणून आता ॲम्युनेशनकरिता काही महिन्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ज्यावेळी माननीय वित्त मंत्री पुढचा अर्थसंकल्प मांडतील त्यावेळी पुढच्या वर्षाच्या अखेरीपर्यत ॲम्युनेशनची व्यवस्था करण्यासाठी त्यांच्याकडून तरतूद केली जाईल याबद्दल मला खात्री आहे.

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

श्री. जयंत पाटील...

आपल्या पोलीस दलातील सर्वांकडे हत्यारे आहेत, परंतु त्यांनी बंदूक कधीच उडविलेली नाही अशा अवस्थेतून हे पोलीस दल बाहेर निघाले पाहिजे. आणि म्हणून ज्यांच्याकडे हत्यारे आहेत त्यांना वर्षाला विशिष्ट असे टारगेट ठरवून त्याप्रमाणे प्रशिक्षण देणे आवश्यक केले जाईल. त्यासाठी आवश्यक असलेल्या या राज्यातील सर्व फायरींग रेंजेस आज ऑपरेशनल नाहीत. त्यामुळे विशेष करुन क्लिन असलेल्या व ज्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा अडथळा नाही, आजूबाजूला कोणतीही वसाहत नाही अशा फायरींग रेजेंसवर लक्ष केंद्रीत करुन त्या ऑपरेशनमध्ये आणल्या आहेत. काही दोन-तीन फायरींग रेंजेसच्या ठिकाणी अडचण असल्यामुळे त्या पुन्हा वापरणे धोक्याचे आहे. त्यामुळे अशाठिकाणी आपल्याला ताबडतोब फायरींग रेंजेस सुरु करता येणार नाही. अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व ठिकाणी फायरींग रेंजेस सुरु करुन त्या त्या विभागातील पोलिसांना वर्षातून एकदा त्याठिकाणी जाऊन प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाईल. जेणेकरुन या राज्यातील हत्यारे असलेल्या पोलिसांना आमच्या बंदुकीतून गोळीच उडाली नाही अशाप्रकारची मुलाखत बाहेर देता येऊ नये. म्हणून सर्वांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था व महत्वाचा कार्यक्रम आम्ही स्वीकारला आहे. मला आनंद वाटतो की, राज्याच्या माननीय अर्थमंत्र्यांनी सुध्दा यासाठी सी.एफ. ॲडव्हान्समधून पैसे देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे या संदर्भात उत्तम व्यवस्था झाली आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये अतिरेकी येतील आणि त्यांच्या हल्ल्याला आपल्याला तोंड द्यावे लागेल यादृष्टीने विचार करुन आपल्या पोलीस दलाची रचना आपण केली नव्हती. आपल्या पोलिसांकडे असलेली हत्यारे आधुनिक व सक्षम असली पाहिजेत. त्यादृष्टीने एके-47 बरोबरीचे दुसरे कोणते हत्यार आहे? त्यामध्ये एमपी-5, एमपी-9 सारखी हत्यारे असतील. अशी चांगल्या प्रकारची हत्यारे ताब्यात घेणे हा कार्यक्रम सुध्दा राज्य सरकारने हातात घेतला आहे. याठिकाणी आपण पुरवणी मागण्यांना मान्यता देत असतांना आणि त्याकरिता गृहीत धरलेले पैसे या हत्यारांसाठी खर्च करीत असतांना केंद्र शासनाची या हत्यारांच्या खरेदीसाठी परवानगी आवश्यक असते. या संदर्भात मी सकाळी माननीय केंद्रीय गृह मंत्र्यांशी बोललो. त्यांनी आपल्याला बऱ्याच प्रकरणांमध्ये परवानगी देण्याचे मान्य केले आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, यामधील प्रोसिजरमुळे थोडा मागे-पुढे उशीर होण्याची शक्यता आहे. आणि म्हणून आपण हत्यारे घेण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

श्री. जयंत पाटील...

इच्छा व्यक्त केली असली तरी ती 31 मार्चच्या आत येतील काय? यामध्ये इंपोर्टचे प्रोसिजर पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून विचारल्या जाणाऱ्या सर्व प्रश्नावलींना उत्तर देण्यासाठी थोडासा वेळ मागे-पुढे जाईल. त्यामुळे माझ्या माहिती प्रमाणे जास्तीत जास्त एप्रिल किंवा मे अखेरपर्यंत हे होईल असे गृहीत धरले आहे. त्यावेळेपर्यंत आपली यंत्रणा शस्त्रसज्ज करण्याची आपण व्यवस्था केली आहे. त्यासाठी मध्यंतरीच्या काळात 126 कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला. त्यामधून आपणास अपेक्षित असलेली हत्यारे राज्याच्या पोलीस दलामध्ये समाविष्ट होतील.

सभापती महोदय, मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यासंदर्भात माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत व काही चांगल्या सूचना केल्या आहेत. आपण केलेल्या चांगल्या सूचनांचा विचार पोलीस दलामध्ये सुधारणा आणण्यासाठी निश्चितपणे करु. त्याचप्रमाणे माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी देखील नांदेड बाबत सूचना केली आहे. दहशतवादी हल्ल्याचा बिमोड करण्यासाठी आपल्याकडे स्पेसिफिक स्ट्रॅटेजी नव्हती असा उल्लेख इ ाला आहे. सभापती महोदय, 26 नोव्हेंबरला झालेल्या हल्ल्याच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये सविस्तरपणे चर्चा झाली आहे. त्यामुळे मी सभागृहाचा अधिक वेळ न घेता आपल्या माध्यमातून याठिकाणी ज्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत त्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, टाटा इंस्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसने सन 2001-06 पर्यंतचा अहवाल दिला होता. त्यामध्ये 343 कोटीपैकी फक्त 66 लाखाची खरेदी केली असल्याचे म्हटले आहे. तो फलनिष्पत्ती अंतरिम अहवाल मंत्रिमंडळासमोर आला, परंतु या सभागृहासमोर मांडण्यात आला नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांना यासंबंधात काय अपेक्षित आहे ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहासमोर सदरहू अहवाल ठेवावयास पाहिजे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी सदरहू अहवाल सभागृहासमोर ठेवण्याबाबत जी मागणी केलेली आहे,त्याबाबत मी आज डायरेक्ट कमिटमेंट देत नाही.हा अहवाल जुना असल्यामुळे तो सदनासमोर मांडावयास काहीच हरकत नाही.आपण तो अहवाल पुढील अधिवेशनामध्ये सुरुवातीला सादर करु,त्याबाबत चर्चाही करु.पण या अहवालातील बऱ्याचशा बाबींची अंमलबजावणी झालेली आहे.या अहवालातील काही बाबी स्विकारण्यासारख्या आहेत आणि काही बाबींच्या बाबतीत सांगावयाचे तर त्या काळातील तत्कालीन व्यवस्थेला, आपण त्या बाबी पूर्ण करु शकतो असे वाटले नाही. त्यामुळे या अहवालाच्या संबंधात पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही.पण अंशत: काही प्रमाणात अंमलबजावणी झालेली आहे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला विनंती करतो की, सभागृहा-समोर गृह विभागाच्या सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्या संमत करण्यात याव्यात.

. . . .3 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगरविकास, नागरी जमीन कमाल धारणा, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय,अल्पसंख्यांक विकास (औकाफसह) व विधी व न्याय या खात्याच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मच्छिमार बांधवांचा विमा उतरविण्याबाबत सूचना केलेली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, सध्या ही योजना सुरु आहे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी शहापूर येथे साथीच्या रोगाने 300 जनावरे दगावली असल्याने, संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशा प्रकारची सूचना केलेली आहे. जी जनावरे साथीच्या रोगामुळे दगावतात, त्यासंदर्भात नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण नाही. त्यामुळे यासंदर्भात धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, विकास आराखडे प्रलंबित आहेत. तसेच ठाणे जिल्ह्यातील ग्राम पंचायतीचे नगरपालिकेमध्ये रुपांतर करावे अशीही त्यांनी सूचना केलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासनाचे त्याबाबतही धोरण आहे.

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जे अल्पसंख्यांक विद्यार्थी आहेत,त्यापैकी 20 हजार विद्यार्थ्यांपर्यंत शिष्यवृत्ती द्यावी, अशी जी अट आहे,ती असता कामा नये.याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील आणि सर्वच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबतचे धोरण आखेल.तसेच पब्लिक स्कूलची स्थापना करावी अशीही सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे.अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या बाबतीत सांगावयाचे तर हे विद्यार्थी मेन स्ट्रीममध्ये यावेत म्हणून शासनाने विविध योजना आखलेल्या आहेत.त्यासाठी शासनाने जवळजवळ 147 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. म्हणून मी सभागृहाला नगरविकास, नागरी जमीन कमाल धारणा,पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, अल्पसंख्यांक विकास (औकाफसह) व विधी व न्याय इ.विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

. . . .3 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय,सदनासमोर शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र.30,31 व 32 या पूरक मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत.यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील,सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथजी मोते,सन्माननीय सदस्य श्री.विक्रमजी काळे,सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनावणेसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात बऱ्याच सूचना केलेल्या आहेत.त्यामध्ये विशेष करुन शिक्षण सेवकांच्या भरतीबाबत मागण्या केलेल्या आहेत.त्यासंदर्भात अनुदान देण्याच्या बाबतीत जो विलंब होतो,त्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.यामध्ये विशेष करुन ठाणे जिल्ह्यातील वेतनपथक कार्यालयाच्या स्थलांतराचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.या कार्यालयाच्या संदर्भात सांगावयाचे तर यासाठी माननीय जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करुन देऊन, सदरहू कार्यालय ताबडतोब दुसऱ्या ठिकाणी सुरु करण्याबाबत आम्ही कार्यवाही करीत आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी शिक्षण सेवकांच्या बाबतीत मागणी केली आहे.त्याबरोबरच संगणकाव्दारे निकाल उपलब्ध व्हावेत अशीही मागणी केली आहे. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, 2009-2010 मध्ये अशा प्रकारची कार्यवाही करण्याचा शिक्षण विभागाचा मानस आहे. तसेच माध्यमिक शाळांची तुकडी टिकविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या पटसंख्येबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणेसाहेबांनी मुद्दा उपस्थित केला.

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

त्याचबरोबर शिक्षणावर 7 टक्के खर्च करण्याचे धोरण असताना फक्त 2 टक्के तरतूद करण्यात आली आहे, अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. वास्तविक पाहता शिक्षण विभागामध्ये 16 ते 18 टक्के खर्च होत आहे. तुकडया टिकविण्याच्या संदर्भातही एकूण पटसंख्येच्या निकषाच्या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आलेला आहे आणि त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी उत्तर मुंबई विभागातील निरीक्षकाबद्दल या ठिकाणी तक्रार केलेली आहे. इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा सुरु असतांना पहिल्यांदाच कॉपीच्या संदर्भात किंवा त्या अनुषंगिक बाबीमध्ये शासनाने अतिशय गांभीर्याने पाऊल उचलेले आहे. या राज्यामध्ये जवळजवळ 400 पेक्षा जास्त लोकांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला आहे. जवळजवळ 2000 प्रकरणांच्या बाबतीत अधिकाऱ्यांच्या सहकार्याने कार्यवाही करण्यात आलेली आहे. या ठिकाणी श्री. पवार यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यांचा कार्यभार तात्पुरता काढून त्यांची बदली करण्यात यावी अशा प्रकारची शिफारस विभागाने केलेली आहे.

श्री. कपिल पाटील : परीक्षा केंद्रावर कोणालाही प्रवेश करता येत नाही. या अधिकाऱ्याने बेकायदा प्रवेश केला आणि शिक्षकाच्या बखोटीला धरुन त्याला फरफटत बाहेर नेले. त्यामुळे परीक्षेच्या काळात मुलांच्या मनावर तणाव निर्माण झाला. 10 ते 15 मिनिटे परीक्षा होऊ शकली नाही. इतका गंभीर गुन्हा केल्यानंतर केवळ त्याचा चार्ज काढून घेण्याचे काम मंत्रिमहोदय करीत आहेत. त्या अधिकाऱ्याला कां प्रोटेक्ट करण्यात येत आहे हे कळले पाहिजे. त्याला आजच्या आज निलंबित केले पाहिजे. त्या अधिकाऱ्या विरुध्दची चौकशी पूर्ण होऊन अहवाल आलेला आहे असे असताना त्या अधिकाऱ्याला संरक्षण कां देण्यात येत आहे हे कळत नाही. इतर सर्वांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तो अधिकारी असे म्हणत आहे की, "माझे सगळे तेथे बसलेले आहेत, मला कोणीही हात लावू शकत नाही," इतके उद्दामपणे तो बोलत आहे. इतक्या भ्रष्ट आणि उद्दाम अधिकाऱ्याला संरक्षण कां देण्यात येत आहे ? त्याला आजच्या आज निलंबित करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे. आम्ही आणखी किती दिवस वाट पाहणार ? शिक्षकांचा अवमान करणारे काम जर शासन करणार असेल तर ते योग्य नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कॉपीच्या बाबतीत ज्या पध्दतीने कारवाई करण्यात आलेली आहे, त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करण्यासाठी मी त्यांच्या बंगल्यावर फोन केला होता. शासनाने संस्था चालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. शासन एवढे चांगले काम करीत असताना एका बेकायदेशीर काम करणाऱ्या अधिकाऱ्याला शासनाने पाठीशी घालू नये. त्या अधिकाऱ्याला सस्पेंड करण्यात यावे. परीक्षा थांबवणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षेत घोळ करणे आणि एका अधिकाऱ्याने शिक्षकाची कॉलर धरुन फरफटत नेऊन मारामारीची परिस्थिती एका परीक्षा केंद्रावर निर्माण करणे ही साधी गोष्ट नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी जाणतो. सरकारने याबाबतीत बऱ्याच ठिकाणी कारवाई करतांना पहिल्यांदाच केंद्र प्रमुखांनाच जबाबदार धरुन कारवाई केलेली आहे.

श्री. कपिल पाटील :बाकीच्या सगळयांना सस्पेंड करण्यात आलेले आहे, असे असताना या अधिकाऱ्याविरुध्द एफ.आर.आय. नोंदवून कारवाई करण्यात यावी.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :सभापती महोदय, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता कोणालाही पाठीशी घालण्याचा सरकारचा हेतू नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :बऱ्याच ठिकाणी भरारी पथक पाठवतो. वरिष्ठ अधिकारी पाठवतो.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यचा प्रयत्न करतात)

श्री. अरविंद सावंत : माननीय मंत्रिमहोदयांनी हा विषय डायव्हर्ट न करता त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार ते सांगावे. आम्ही या ठिकाणी निलंबनाची मागणी केलेली आहे. शासन त्या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करणार आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना मी जाणतो. त्या अधिकाऱ्याकडील चार्ज काढून घेण्यात आलेला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती :सन्माननीय मंत्रिमहोदय, हा जो प्रकार झालेला आहे तो गंभीर आहे. एखाद्याची ओळख पटली नाही म्हणून त्याने शिक्षकांना अशा पध्दतीने हाताळणे चांगले नाही. म्हणून आपण याबाबत जरुर फेरविचार करुन निर्णय घ्यावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता त्या अधिकाऱ्याच्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेनुसार यासंबंधीचा जो चौकशी अहवाल आलेला आहे...

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. पांडुरंग फुंडकर : चौकशी अहवाल आलेला असेल तर तो सभागृहासमोर ठेवला पाहिजे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : जो गुन्हा घडलेला आहे त्यासंदर्भामध्ये त्या अधिकाऱ्याचा तो अधिकार होता की नाही ही बाब गौण आहे. शेवटी परीक्षेमधील गैरप्रकार टळावेत ....

श्री. अरविंद सावंत : त्या अधिकाऱ्याला निलंबित करणार की नाही याबाबत सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत असताना त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याची शासनाची अजिबात भूमिका दिसत नाही. एखादा अहवाल आल्यानंतर, एखाद्या गोष्टीची मागणी झाल्यानंतर आलेला अहवाल मानवतेच्या दृष्टीकोनातून तपासून पाहिला पाहिजे. तो अहवाल तपासून बघून जर ते दोषी असतील तर कारवाई केली पाहिजे. परंतु त्यांना संधी दिली पाहिजे. संधी न देता तसे करता कामा नये.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केलेल्या आहेत तसेच आपणही या विषयाच्या संदर्भात गांभीर्याने सूचना केलेली आहे. यामध्ये जो संबंधित अधिकारी आहे त्याला निलंबित करण्यात येईल आणि त्यानंतर त्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, या सगळ्या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यामध्ये सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत वर्गखोल्यांच्या बांधकामाचा विषय आहे. विना अनुदानाच्या धोरणाबाबत सभागृहात चर्चा झाली होती. त्यासंदर्भात निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर शासन लवकर धोरण आणणार आहे. शाळांच्या वेतनेतर अनुदानाचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. मी शालेय शिक्षण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या आमच्यासमोर आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुख्याध्यापकांच्या पदांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. बऱ्याच शाळांमध्ये मुख्याध्यापक नाहीत असे त्यांनी सांगितले. त्यासंदर्भात विभागाला सूचना दिलेल्या आहेत. शिक्षण विभागामध्ये बरीच प्रभारी पदे आहेत. त्यामुळे सेवा नियमातील अट शिथिल करुन प्रभारी पदे कशी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

कमी करता येतील आणि कायमस्वरुपी नेमणुका कशा होतील यासंदर्भात विभागाचा दृष्टीकोन राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत शासन विचार करील आणि आवश्यक असेल त्या ठिकाणी आम्ही कारवाई करु. शालेय शिक्षण विभागाच्या ज्या पूरक मागण्या आहेत त्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : कोकणासाठी वेगळे शालांत परीक्षा मंडळ करण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ज्या वैधानिक बाबी या सभागृहामध्ये मांडल्या गेलेल्या आहेत त्यासंदर्भात सध्याच्या आचारसंहितेचा विचार करता असे सांगू इच्छितो की, आपल्या ज्या मागण्या आहेत त्या शासनाच्या विचाराधीन आहेत. त्यासंदर्भात जो निर्णय करावयाचा असेल तो निर्णय आवश्यक असेल त्यावेळी शासन करील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी चार वर्षाच्या पायाभूत पदांबाबतचा विषय मांडलेला होता. चार वर्षापासूनची पदे प्रलंबित आहेत. त्या त्या वर्षात त्या पदांची मान्यता व्हावयास पाहिजे परंतु चार वर्षापासून मान्यता दिलेली नाही. यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे ? पायाभूत वाढीव पदे चार वर्षापासून मंजूर नाहीत. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी काहीही उल्लेख केलेला नाही.

यानंतर श्री. शिगम ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : कोकण विभागीय मंडळाच्या बाबतीत सभागृहामध्ये घोषणा झालेली आहे.

सभापती : त्यावेळी जागेचा प्रश्न होता असे सांगण्यात आले होते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, जागा तात्पुरती भाड्याने देखील घेता येईल.

श्री. भास्कर जाधव : या सभागृहामध्ये शासनाच्या वतीने अशीही घोषणा करण्यात आलेली आहे की, येणारी परीक्षा, म्हणजे आता सुरु असलेली परीक्षा देखील कोकण परीक्षा मंडळा मार्फतच घेतली जाईल. असे असताना त्यासंदर्भातील अंमलबजावणीच्या संदर्भात आचारसंहितेचा प्रश्न कुठे येतो ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : कोकण विभागाच्या स्वतंत्र मंडळाच्या बाबतीत सरकारने काही धोरण घेतले असेल तर ते धोरण काय आहे, त्यासंदर्भातील कार्यवाही का अपूर्ण राहिली, पुढे कशी कार्यवाही करता येईल या गोष्टींचा विचार सुरु आहे. शासनाने जाहीर केलेल्या एखाद्या धोरणासंबंधीची अंमलबजावणी राहिली असेल तर ती अंमलबजावणी करण्यात येईल. 4 वर्षापासून जी काही पदे रिक्त आहेत ती भरण्याच्या संदर्भात किंवा अनुदान देण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन, सार्वजनिक बांधकाम व ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 75 व 76 आणि वित्त विभागाच्या बाब क्रमांक 37 ते 39 तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 40 ते 47 यावर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी रस्ते व पूल यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पैशाची अतिरिक्त मागणी केलेली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपल्या रेग्युलर बजेटमध्ये 1038 कोटी रु. यासाठी ठेवलेले होते. डिसेंबरच्या आणि या पुरवणी मागण्यांमध्ये 305 कोटी रुपये असे एकूण 1690 कोटी रुपये रस्ते व पूल यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी खर्च केलेले आहेत. इमारत देखभाल दुरुस्तीसाठी रेग्युलर बजेटमध्ये 229 कोटी रु. आणि पुरवणी मागण्यामध्ये 150 कोटी रु. असे जवळ जवळ 543 कोटी रु. खर्च केलेले आहेत. रस्ते व पूल तसेच इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी एकूण 2233 कोटी रु. खर्च केलेले आहेत. दरवर्षी जवळ जवळ 45 हजार कि.मी. रस्त्याचे नुतनीकरण आवश्यक असते. परंतु पैशाची उपलब्धता पाहता फक्त 9 किंवा 10 हजार कि.मी. रस्त्याचे नुतनीकरण होऊ शकेल एवढाच निधी प्राप्त होतो. त्यामुळे सहाजिकच हा अनुशेष दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही उपलब्ध निधीतून खड्डे भरण्यासाठी व पूरहानी दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 40 ते 47 तसेच उर्जा विभागाच्या बाब क्रमांक 58,59, 61, 62 आणि 63 या अंतर्गत असलेल्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा रणजितसिंह पाटील (महसूल व पुनर्वसन, सामान्य प्रशासन, उद्योग व संसदीय कार्य आणि माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी क्लस्टर डेव्हलपमेंटसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. केन्द्र शासनाकडून 20.25 लाख रु. इतके अनुदान आपल्याला मिळाले होते. मायक्रो आणि स्मॉल इण्टरप्रायझेससाठी असलेली ही एक चांगली योजना आहे. कॉमन इफ्रास्ट्रक्चरसाठी 80 टक्के अनुदान केन्द्र सरकारने देऊ केलेल आहे. क्लस्टर डेव्हलपमेण्टच्या संदर्भात डायग्नोस्टिक स्टडी करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये छोट्या छोट्या उद्योगांचे जे क्लस्टर असतील त्याचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला पैसे मंजूर झालेले आहेत. जवळ जवळ 15 क्लस्टर्सना सन 2008-2009मध्ये मान्यता मिळालेली आहे. अजून 5 क्लस्टर्स यामध्ये समाविष्ट करण्याचा विचार आहे. कोकणामध्ये काजूवर तसेच चामडयावर प्रक्रिया करणारे जे छोटे छोट उद्योग आहेत त्यांचा यामध्ये अंतर्भाव केलेला आहे.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 60 व 61 तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1, 2 व 3, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 19 ते 25, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 48 व 49, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 106 ते 109 या सर्वबाबींशी संबंधीत असलेल्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

.....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पुरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 72 आणि 73 च्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागाच्या आस्थापनेवर जो कर्मचारीवर्ग आहे, त्यांचे वेतन आणि भत्ते देण्यासाठी 40 लाख रुपयांची तरतूद कमी पडते. तसेच अपंग कल्याण आस्थापनेवर असणा-या कर्मचा-यांचे वेतन आणि भत्ते देण्यासाठी 70 लाख रुपये कमी पडतात. समाजकल्याण महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या वेतनाकरिता काही निधी कमी पडतो व त्यासाठी 1 हजार रुपयांची लाक्षणिक पूरक मागणी केलेली आहे. सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 72 आणि बाब क्रमांक 73 च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी काही सूचना केलेल्या आहेत. समाजकल्याण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांकरिता भविष्य निर्वाह निधी योजना सुरु करावी, अशीही एक सूचना त्यांनी केली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा योग्य तो विचार करण्यात येईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण फी ची पूर्तता करण्यासंबंधीच्या सूचनेचा देखील विचार करण्यात येईल. सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 72 आणि 73 च्या अनुषंगाने असलेल्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण व खार जमीन राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या बाब क्रमांक 77 व 78, मागणी क्रमांक क्यू-2 व क्यू-4 सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या आहेत. गृहनिर्माण विभागातील कर्मचा-यांचे वेतन व भत्ते तसेच इतर कार्यालयीन खर्चासाठी एकूण 35 लाख 59 हजार रुपयांच्या पूरक मागण्या मांडण्यात आल्या आहेत, त्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, खार जमीन विभागाची बाब क्रमांक 48 यामध्ये खारभूमी परिरक्षण व दुरुस्ती याकरिता 6 कोटी 37 लाख 50 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. ही पूरक मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी माझी विनंती आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (ग्रामविकास व फलोत्पादन राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 64 मध्ये रुपये 26 कोटी 44 लाख 60 हजार तसेच बाब क्रमांक 66 मध्ये 2 कोटी 64 लाख 87 हजार रुपये, बाब क्रमांक 69 मध्ये 59 लाख 26 हजार रुपये एवढया रकमेच्या पूरक मागण्या सभागृहात मांडण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे फलोत्पादन विभागाच्या बाब क्रमांक 27 मध्ये 56 कोटी रुपयांची पूरक मागणी मंजुरीसाठी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. ग्रामविकास विभागाच्या व फलोत्पादन विभागाच्या पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पूरक मागण्यांच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दोन, तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. जे.जे.हॉस्पीटलच्या आधुनिकीकरण प्रकल्पाच्या कामासाठी केंद्र शासनाने 120 कोटी रुपये मंजूर केले होते. यात 100 कोटी रुपये केंद्र सरकारचा सहभाग आहे आणि 20 टक्के सहभागाची रक्कम महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन द्यावयाची आहे. महाराष्ट्र शासनाने आपला हिस्सा म्हणून त्यांना 20 कोटी रुपये प्रत्यक्षात उपलब्ध करुन दिले आहेत. केंद्र सरकारने 100 कोटी रुपयांपैकी प्रत्यक्षात 27 कोटी रुपये मंजूर केले आहेत. केंद्र सरकारने 14.16 कोटी रुपयांचे चेक महाराष्ट्र शासनाकडे पाठविले आहेत. उर्वरित जी रक्कम राहिली आहे. त्या रकमेच्या किंमतीएवढया इक्विपमेंटस्चा केंद्र शासन जे.जे.रुग्णालयास पुरवठा करणार आहे. 20 कोटी रुपये इन्फ्रास्ट्रक्चरसाठी खर्च करावयाचे आहे ती रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे खर्च केली जात आहे. केंद्र सरकार 25 ते 26 टक्के रक्कम कॅश स्वरुपात देणार आहे आणि बाकी रकमेचे इक्विपमेंटस् उपलब्ध करुन देणार आहे. या सभागृहात नागपूरच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी नागपूर येथील हॉस्पिटलच्या अपग्रेडेशनच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. केंद्र सरकारने नागपूर येथील हॉस्पिटल अपग्रेडेशनसाठी 150 कोटी रुपये मंजूर केले आहेत...

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

त्याचा कार्यक्रम नागपूर येथे संपन्न झाला. 25 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाचा हिस्सा असणार आहे. 125 कोटी रुपये नियमाप्रमाणे नागपूरच्या हॉस्पिटलला अपग्रेडेशनसाठी मिळणार आहेत. डॉक्टर्स आणि लेक्चरर्सच्या व्हॅकन्सीचा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, एमपीएससीकडे पदांची मागणी सादर केली असून काही पदांबाबतच्या मुलाखती झाल्या आहेत. पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी ही सर्व पदे भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्रंथपालाबाबत एक मुद्दा उपस्थित केला आहे. हॉस्पिटल्स आणि मेडिकल कॉलेजमधील ग्रंथपालांच्या प्रमोशनसंबंधीचा मुद्दा नसून त्यांच्या पे स्केलसंबंधीचा मुद्दा आहे. या संदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने वित्त विभागाबरोबर चर्चा केलेली आहे. परंतु वित्त विभाग मान्य करावयास तयार नाही.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाबाबत बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी सोलापूर विद्यापीठासंबंधीचा मुद्दा मांडला आहे. जमीन संपादन करण्यासंबंधी महसूल विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे. यावर्षी पैसे देखील दिले गेले आहेत. लवकरात लवकर सोलापूर विद्यापीठाचे काम पूर्ण होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र ठाणे येथे सुरु करण्यासंबंधीचा मुद्दा मांडला आहे. ठाण्यामध्ये लवकरच मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु होणार आहे. त्यासाठी जागा उपलब्ध झाली आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून उपकेंद्र सुरु होईल. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अनुदानित कॉलेज असावे असाही एक मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला आहे. प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित कॉलेज देण्याचा निर्णय घेतला आहे. आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स पैकी आर्टस् आणि सायन्स असेल परंतु कॉमर्स नाही अशा ठिकाणी कॉमर्स फॅकल्टी सुरु केली जाईल. ज्या ठिकाणी आर्टस् आणि कॉमर्स आहे परंतु सायन्स फॅकल्टी नाही तेथे सायन्स फॅकल्टी सुरु केली जाईल. ग्रामीण भागात नवीन कॉलेज सुरु करावे, शहरी भागात सुरु करु नये असा सन्माननीय सदस्यांचा मुद्दा होता. सर्वच तालुक्यातून अर्ज मागविले आहेत. ज्याठिकाणी अनुदानित कॉलेज नाही त्याची माहिती मागविली आहे. त्यासाठी एक समिती नियुक्त केली असून त्या समितीमार्फत ज्या शिफारशी केल्या जातील त्या शिफारशींचा स्वीकार करु.

श्री.रामनाथ मोते : माझा विषय नवीन कॉलेजना मान्यता देण्याचा नव्हता.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर मी प्रश्न विचारण्यास संधी देणार आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासनाने असा निर्णय घेतला आहे की, ज्या तालुक्यामध्ये अनुदानित कॉलेज नसेल तेथे आपण नवीन कॉलेज देऊ शकतो. एक्झिस्टिंगना सुध्दा देऊ शकतो. प्रत्येक तालुक्यामध्ये एक अनुदानित आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज असावे असा शासनाने निर्णय घेतला आहे. आयुर्वेदिक कॉलेजमधील पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना स्टायपेंड देण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. मी सन्माननीय सभागृहाला विनंती करतो की, वैद्यकीय शिक्षण व उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, जे.जे.हॉस्पिटलला 20 कोटी रुपये देणार आहोत. 20 कोटी रुपये वर्ग झाले का? नागपूरच्या मेडिकल कॉलेजसाठी देखील पैसे वर्ग झाले का? ग्रंथपालांच्या पदोन्नतीबाबत सांगू इच्छितो की, संपूर्ण महाराष्ट्रात अशी फक्त 14 पदे आहेत, ज्या पदांवर काम करणारे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित आहेत. जे कर्मचारी मेडिकल कॉलेजमध्ये काम न करता हॉस्पिटलच्या ग्रंथालयामध्ये काम करीत आहेत. सभागृहात माननीय वित्त राज्यमंत्री बसलेले आहेत. ते स्वत: डॉक्टर आहेत. फार मोठा आर्थिक बोजा पडणार नाही. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे, ते स्वत: ही बाब मंजूर करु शकतात. त्यासाठी फार मोठी रक्कम लागणार नाही.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / परिशुध्दीपूर्वी नाही

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, जे.जे. हॉस्पिटलसाठी राज्य शासनाचा 20 कोटीचा हिस्सा आहे तो 20 कोटीचा चेक ऑलरेडी शासनाकडून डिपॉझिट केला आहे. तसेच या ठिकाणी इमारतीचे भूमीपुजन होऊन कामही सुरु झाले आहे. नागपूरसाठी जे 25 कोटी रुपये द्यावयाचे आहेत त्याची तरतूद पुढील अधिवेशनात करण्यात येणार आहे. कारण आचारसंहिता लागण्यापूर्वी 15 दिवस अगोदर याला मंजुरी मिळाली होती म्हणून ही तरतूद करणे शक्य झाले नाही. ही 25 कोटीची तरतूद जून महिन्यात करण्यात येईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण उपस्थित केलेल्या 15 ग्रंथपालांच्या प्रश्नासंदर्भात आपण पर्सनली बसून माननीय वित्त मंत्र्यांबरोबर चर्चा करु.

प्रा. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा असा मुद्दा होता की, प्रत्येक तालुक्यात एक तरी अनुदानित कॉलेज असावे, नवीन कॉलेजेसना मान्यता देण्यासंबंधीचा माझा विषय नव्हता. तर ज्या भागात कॉलेजेसना परवानगी दिलेली आहे त्या भागात एक तरी अनुदानित कॉलेज असावे हे जे शासनाचे धोरण आहे त्या अनुषंगाने एक कॉलेज अनुदानित असावे. उदा. कल्याण तालुक्यात अनुदानित कॉलेजेस आहेत पण कल्याणपासून 30 कि.मी. अंतरावर ग्रामीण भागात एकही अनुदानित कॉलेज नाही, म्हणून मी हा मुद्दा उपस्थित केला होता.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, ही बाब तपासून पाहिली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/

डॉ. सतीश पाटील (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, मदत व पुनर्वसन, कृषी, महिला व बालकल्याण, परिवहन आणि जलसंधारण या विभागाच्या बाब क्र. 22, 33, 104, 105, 15, 65, 66 व 67 या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/

श्रीमती शोभा बच्छाव (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाच्या बाब क्र. 79, 80, 81, 82, 83 व 84 त्याचप्रमाणे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 70 व 71 यासंदर्भात चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनावणे यांनी आपले विचार व्यक्त केले. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अस्थायी नेमणुकीच्या अधिकारासंदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, हे अधिकार आपण उप संचालकांना दिलेले आहेत. तसेच पीएलए आणि एनआरएचम मधून एक्स्प्रेस फिडर्स बसविण्याचे अधिकार सिव्हील सर्जन यांना दिलेले आहेत. त्याचप्रमाणे नियमित विशेषज्ञ मिळत नसल्याने कंत्राटी बेसिसवर घेण्याचे अधिकारही आपण सिव्हील सर्जन आणि उप जिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अनेक चांगल्या सूचना केल्या आहेत. तसेच काही प्रश्नही त्यांनी उपस्थित केले आहेत. त्यानुसार श्रमजीवी संघटनेच्या ठाणे जिल्ह्याच्या पाहणीत एक्सपायरी डेटची औषधे असल्याची जी बातमी पेपरमध्ये आली होती. त्या अनुषंगाने सहसचिव, सार्वजनिक आरोग्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीने चौकशी केली असता असा प्रकार घडला नसल्याचे आढळून आले. एनआरएचएम कार्यक्रमामध्ये आणि केंद्राच्या गाईडलाईन्सनुसार राज्याच्या गरजांप्रमाणे प्रोग्राम तयार केला जातो आणि त्याला केंद्रशासनाची मंजुरी घेतली जाते. त्याचप्रमाणे इतरही योजना राबविल्या जातात. उदा. जननी सुरक्षा योजना, आरोग्य संस्था बळकटीकरण योजना, शालेय आरोग्य, तज्ज्ञांची नेमणूक या अनुषंगाने औषधांवर खर्च सुध्दा करण्यात येतो. एवढे सांगून सार्वजनिक आरोग्य व अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पुरवणी मागण्यांना मंजुरी द्यावी अशी विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर (कृषी राज्यमंत्री) माननीय सभापती महोदय, कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यावर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे, सन्माननीय सदस्य श्री. सोनावणे, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी ज्या सूचना केल्या त्या निश्चितपणे विचारात घेण्यात येतील. कृषी विभागाची मार्च 2009 च्या पूरक विवरणपत्रातील, पृष्ठ क्रमांक 27 वरील, बाब क्रमांक 26 मंजूर करावी अशी मी सभागृहास विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : माननीय सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी कोणत्या 2 तुकडयांना मान्यता दिलेली आहे ? असे विचारले होते. याबाबत त्यामुळे मी आपणास सांगू इच्छितो की, 11 वी आणि 12 वी च्या तुकडयांमध्ये वाढ दिली व त्यामुळे या दोन तुकडयांना एकंदर 47 हजार रुपये अपुरे पडले होते. आणि म्हणून आपण कमला नेहरु उच्च माध्यमिक विद्यालय नंदूरबार, जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय,भारीव ता.जि.यवतमाळ यांना निधी देण्यासाठी ही आर्थिक तरतूद केलेली आहे. एवढे सांगून आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 87 ते 93 या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

सभापती : सन 2008-2009 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

सभापती : मी खालील घोषणा करतो :-

"राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन, सोमवार, दिनांक 1 जून, 2009 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे.

पृ.शी./मु.शी.: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे.

" मी, एस.सी.जमीर, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याद्वारे गुरुवार, दिनांक 19 मार्च 2009 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधान परिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(सायंकाळी 4.53 वाजता सत्र संस्थगित झाले.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही